म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. १६३
१९६५

REFBK-0016272

म. ग्रं. सं. ठाणें

मुलांच्या उपयोगासाठीं.

# हिंदुस्थानचा सोपा व संक्षिप्त इतिहास.

भास्कर धोंडदेव गोखले

कल्याण येथील इंग्रजी शाळेचे [illegible]

यांनीं

निरनिराळ्या ग्रंथांच्या आधारानें तयार केला

तो

मुंबई येथें

“जगदीश्वर” छापखान्यांत छापविला.

आवृत्ति सातवी.

तारीख १ नवंबर १८८९ इसवी.

किंमत १० आणे, टपालखर्च १ आणा.

( ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क आपणाकडे ठेविले आहेत. )

ग्रंथ संग्रहालय
सं० 3237

मुलांच्या उपयोगार्थ.

# हिंदुस्थानचा सोपा व संक्षिप्त इतिहास.

भास्कर धोंडदेव गोखले

कल्याण येथील इंग्रजी शाळेचे हेड मास्तर

यांनीं

निरनिराळ्या ग्रंथांच्या आधारानें तयार केला.

तो

मुंबई येथें

"जगदीश्वर" छापखान्यांत छापविला.

REFBK-0016272

तारीख १ नवंबर १८८९ इसवी.

किंमत १० आणे, टपालखर्च १ आणा.

( ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क आपणाकडे ठेविले आहेत. )

## या पुस्तकाविषयीं अभिप्राय.

हिंदुस्थानाचा सोपा व संक्षिप्त इतिहासः– रा. रा. भास्कर धोंडदेव गोखले ह्यांनीं केलेला. चवथी, पांचवी आणि सहावी ह्या इयत्तांतल्या विद्यार्थ्यांस फार उपयोगीं पडेल. भाषा चांगली, सरळ आणि शुद्ध आहे. ( बालबोध. )

# हिंदुस्थानचा इतिहास.

## भाग १ ला.

## देशवर्णन.

इतिहास व भूगोल यांचा संबंध.

इतिहास व भूगोल या दोहोंचा फार निकट संबंध आहे. यास्तव कोणत्याही देशाचा इतिहास लिहिण्यास आरंभ करण्यापूर्वीं त्या देशाची भूगोलसंबंधीं माहिती देण्याचा बहुतेक इतिहास लिहिणारांचा सर्वसाधारण परिपाठ आहे. यापासून इतिहास शिकण्यास फार मदत होते, हें सांगावयास नकोच. याजकरितां आपल्या हिंदुस्थान देशाचा इतिहास शिकण्यास आरंभ करण्यापूर्वीं प्रथमतः हिंदुस्थान देशाचें भूपृष्ठ स्वरूप व त्याचे राज्यकारभार चालविण्याकरितां कसकसे भाग केले आहेत यांची माहिती करून घेणें फार अवश्यक आहे.

स्थान.

एशिया खंडाचा नकाशा पाहिला असतां आपणास असें आढळून येईल कीं, एशिया खंडाचे दक्षिणेस जे तीन दक्षिणाभिमुख द्वीपकल्प आहेत, त्यांतील मधला मध्य एशियापासून दक्षिणेकडे समुद्रापर्यंत जाणारा जो थोरला द्वीपकल्प तो हिंदुस्थान देश होय.

देशमर्यादा.

हिंदुस्थानचे उत्तरेस सर्व पृथ्वींत अत्यंत उंच असा हिमालय पर्वत; पश्चिमेस अफगाणिस्थान,

बलुचिस्थान आणि अरबीसमुद्र; दक्षिणेस हिंदी-महासागर आणि पूर्वेस बंगालचा उपसागर आणि ब्रह्मदेश.

अक्षांश व रेखांश.

ब्रिटिश सरकारचे अमलांतील हिंदुस्थानच्या प्रदेशाचे उत्तर अक्षांश ८°– ३७° आणि पूर्व-रेखांश ६६°– ९२° हे आहेत.

विस्तार.

हिंदुस्थानचें अतिशय दक्षिणेकडील टोंक जें केप कामोरिन त्यापासून काश्मीरचे उत्तरेपर्यंत हिंदुस्थानची दक्षिणोत्तर लांबी सुमारें १९०० मैल व कराची पासून आसामपर्यंत त्याची रुंदी सुमारें १८०० मैल आहे. आणि त्याचें क्षेत्र-फळ सुमारें १५००००० चौरसमैल आहे.

लोकसंख्या.

या देशाची लोकसंख्या इ. स. १८८१ चे खानेसुमारीवरून सुमारें २५,५०,००, ००० आहे. यापैकीं ब्रिटिश सरकारचे खुद्द अमला-खालीं सुमारें २०,५०,००,००० आणि ब्रिटिश सरकारचे आश्रयाखालचे एतद्देशीय संस्थानिकांचे अमलाखालीं सुमारें ५,००,००,०००आहे.

हिंदुस्थानचे स्वाभाविक भाग.

विंध्याद्रि पर्वताचे योगानें हिंदुस्थानचे दोन मोठे स्वाभाविक भाग होतात. उत्तरेचे भागास हिंदुस्थान किंवा उत्तरहिंदुस्थान व दक्षिणे-कडील भागास दक्षिण किंवा दक्षिणहिंदुस्थान असें ह्मणतात.

हिंदुस्थान किंवा उत्तरहिंदुस्थान.

हा भाग हिमालय पर्वताचे उतरणीवरचा प्रदेश, उत्तरेकडील मोठें मैदान आणि अरवली पर्वत व सिंधुनदी यांजमधील मैदान मिळून झालेला आहे.

हिमालयाचे उतरणीवरचा प्रदेश फार विस्तीर्ण आहे. हा प्रदेश हिमालय व त्याच्या दक्षिणदिशेस त्याशीं समांतर असणाऱ्या शिवालिक पहाडादि ज्या लहान लहान डोंगरांच्या ओळी आहेत यांच्यामध्यें आहे.

हिमालयाचे उतरणीवरचा प्रदेश.

ह्या प्रदेशांत आसाम, सिकीम, भूतान, नेपाळ, कमाऊन, गरवाल आणि सुप्रसिद्ध काश्मीर प्रांताची रमणीय दरी हे मोठ मोठे प्रांत आहेत. उत्तरहिंदुस्थानांतून वाहणाऱ्या सर्व लहान मोठ्या नद्यांचे उगम ह्या प्रदेशांत आहेत.

ह्या प्रदेशांतील मोठमोठे प्रांत.

हें मोठें मैदान पूर्वेकडील ब्रह्मपुत्रानदीपासून पश्चिमेकडे सिंधुनदीपर्यंत व उत्तरेकडील हिमालय पर्वताचे उतरणीवरचे प्रदेशापासून दक्षिणेकडे दक्षिणहिंदुस्थानचे द्वीपकल्पाचे उंचवट प्रदेशापर्यंत पसरलें आहे. यांत ब्रह्मपुत्रानदीचे कांठचा प्रदेश, गंगानदीचे कांठचा प्रदेश व सिंधुनदीचे कांठचा प्रदेश हे येतात.

उत्तरेकडील मोठें मैदान.

या प्रदेशांत बंगाल, बहार, ओरिसा प्रांताचा कांहीं भाग, अयोध्या, अलाहाबाद, आग्रा, दिल्ली, पंजाब, आणि सिंधप्रांताचा कांहीं भाग हे मोठमोठे प्रांत आहेत.

उत्तरेकडील मोठे मैदानांतील प्रांत.

या प्रदेशांतून ब्रह्मपुत्रा, गंगा व तिला मिळणाऱ्या यमुनादि नद्या आणि सिंधु व तिला मिळणाऱ्या काबूल व पंजाब प्रांतांतील पांच नद्या जेहेलम, चिनाब, रावी, बिया आणि सतलज या नद्या वाहतात.

या प्रदेशांतून वाहणाऱ्या नद्या.

अरवली पर्वत आणि सिंधुनदी य.तील मैदान.

अरवली पर्वत व सिंधुनदी यांतील मैदान हें पूर्वी सांगितलेले उत्तरेकडील मैदानाचाच भाग आहे. परंतु याचें स्वरूप उत्तरेकडील मैदानाचे स्वरूपाहून अगदीं भिन्न आहे. याचा बहुतेक भाग उजाड व भणभणीत आहे. यांत रजपुताना आणि सिंधप्रांताचा कांहीं भाग येतो.

दक्षिण किंवा दक्षिणहिंदुस्थान.

दक्षिण किंवा दक्षिण हिंदुस्थान हा एक उंचवट्याचा सपाट प्रदेश आहे. याचे सभोंवार पूर्वसह्याद्रि व पश्चिमसह्याद्रि या दोन पर्वतांच्या रांगा आहेत. त्या दोन्ही नीलगिरि या नांवांचे पर्वतांचे योगानें एकत्र होतात.

दक्षिणेंतील मोठमोठे प्रांत.

या प्रदेशांत मुंबई इलाख्याचा बहुतेक भाग, निजाम सरकारचे अमलांतील मुलूख, म्हैसूर व दुसरीं लहान लहान संस्थानें आणि मद्रास इलाखा हे मोठे प्रांत आहेत.

पूर्व पश्चिम सह्याद्रि आणि समुद्रकांठ यांतील प्रदेश.

पूर्वसह्याद्रि व पश्चिमसह्याद्रि आणि समुद्रकांठ यांमधील सखलवट प्रदेशही दक्षिणेंत येतो. महानदीचे मुखापासून कृष्णानदीपर्यंत असलेला उत्तरसरकार प्रांत, कृष्णानदी आणि पूर्वसह्याद्रि व नीलगिरीपासून दक्षिणेस केपकामोरिनपर्यंत जाणारा कर्नाटक प्रांत, पश्चिमसह्याद्रि आणि समुद्रकांठ यांतील अरुंद पट्टींत कोंकण, गोवें, कानडा, मलबार, त्रावणकोर आणि कोचीन हे सर्व या प्रदेशांत येतात.

दक्षिणेंतील मुख्य मुख्य नद्या.

या प्रदेशांत गोदावरी, कृष्णा, महानदी आणि पनियार या नद्या पूर्ववाहिनी आहेत आणि त्या बंगालच्या उपसागरास मिळतात. नर्मदा

आणि तापी ह्या पश्चिमवाहिनी आहेत आणि त्या खंबायताच्या आखातास मिळतात.

## हिंदुस्थानचा राज्यकारभार व तो चालविण्या करितां केलेले विभाग.

फार प्राचीन काळीं हिंदुस्थानांत जीं निरनिराळीं राज्यें होतीं, त्यांतील राज्यकारभार चालविण्याची पद्धति कोणत्या प्रकारची होती हें मनूचे ग्रंथाधारें कळून येतें. प्राचीन राज्यकारभार चालविण्याची पद्धति.

राज्याचा मुख्य अधिकारी राजा असे. याला ब्राह्मणांनीं दिलेली सल्लामसलत मात्र मान्य करावी लागत असे. ही गोष्ट शिवाय करून तो स्वतंत्राधिकारी असे. जसजसें ब्राह्मणांचें महत्व राज्यांत वाढत गेलें त्या त्या मानानें राजांचा अंमल अधिकाधिक कडक होत चालला; ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. राजमंडळ.

राजाचे खालचे दरजाचे सहस्रग्रामाधिकारी हे असत. प्रत्येक सहस्रग्रामधिकाऱ्याचे हाताखालीं शतग्रामाधिकारी असत. या विभागास हल्लीं परगणा ह्मणण्याचा प्रघात आहे. प्रत्येक शतग्रामाधिकाऱ्याचे हाताखालीं दशद्वय ग्रामाधिकारी व प्रत्येक दशद्वय ग्रामधिकाऱ्याचे हाताखालीं दशग्रामधिकारी आणि प्रत्येक दशग्रामाधिकाऱ्याचे हाताखालीं मंडल अथवा पाटील या नांवाचे एकग्रामाधिकारी असत. अशा प्रकारची राज्यकारभार चालविणाऱ्या कामगारांची संगतवार मालिका होती. या सर्वांस राजसेवक असें मानीत असत.

ग्रामकारभार चालविण्याची प्राचीन पद्धत.

हिंदुस्थानांत फार प्राचीन काळापासून प्रत्येक गांवचा कारभार चालविण्याचें काम ग्राममंडळाकडे सोंपविण्याची चाल आहे. याच पद्धतीस अनुसरून मनूचे वेळींही व्यवस्था होती. असें दिसतें.

ग्रामकारभार चालविणारी मंडळी.

प्रत्येक गांवचा मुख्य अधिकारी त्या गांवाबद्दल राजास किती वसूल द्यावयाचा याचा ठराव करीत असे. ही रकम तो गांवचे रहिवाशांवर हिसेरशीनें वांटून देत असे. या वसुलाचे रकमेबद्दल आणि गांवचे बंदोबस्ताबद्दल तो जबाबदार असे. या कामगिरीबद्दल त्याजला कांहीं जमीन फुकट मिळत असे आणि लोकांकडूनही त्याला कांहीं बार्बा मिळत असत. कधीं कधीं सरकारांतून त्याला वेतनही मिळे. सर्व कज्जांचा निकाल वादी प्रतिवादींनीं पसंत केलेल्या पंचांमार्फत करण्याचा अधिकार त्याजकडे असे.

उपग्रामाधिकारी.

मुख्यग्रामाधिकाऱ्याचे हाताखालीं दुसरे कित्येक कामदार असत. त्यांत ग्रामलेखक ( कुळकर्णी ) आणि ग्रामरक्षक हे मुख्य होत. ह्या सर्व कामगारांचे रोजमुऱ्याची व्यवस्था मुख्यग्रामाधिकाऱ्याप्रमाणेंच असे.

मुसलमान लोकांचे कारकीर्दींतील राज्यरीति.

मोगल घराण्याचे बादशाहांचे वेळेस राज्यकारभार कसा चालत असे याची माहिती औरंगजेब बादशाहाचे कारकीर्दीचे अखेरीस दिली आहे ती वाचावी.

## इंग्लिश लोकांची राज्यरीति.

हल्लींचे राज्य-

हल्लींचे या देशाचे राज्यकर्ते इंग्लिश लोक

प्रथमतः या देशांत सोळावे शतकाचे अखेरीस व्यापार करण्याकरितां आले. या लोकांचे दोन मंडळयांना या देशाशीं व्यापार करण्याची परवानगी देण्याकरितां इंग्लड देशाचे निरनिराळे राज्यकर्त्यांनीं निरनिराळे वेळीं निरनिराळया सनदा दिल्या. या दोन व्यापारी मंडळया इ. स. १७०८ या वर्षीं युनैटेड ईस्टइंडियाकंपनी या नांवानें एकत्र झाल्या. ( भाग १४ पहा ) पुढें हळूहळू त्यांजला आपले व्यापाराचे बचावा करितां या देशांतील निरनिराळे राजांचे राज्यकारभारांत हात घालणें भाग पडलें.

कर्ते इंग्लिश लोक यांचें या देशांत आगमन.

या देशांतील इंग्लिश लोकांचे राज्याचा आरंभ इ. स. १७५७ पासून झाला असें ह्मणतां येईल. ही मंडळी इंग्लडचे राजाचे वतीनें राज्यकारभार चालवीत असे.

इंग्लिश लोकांचे राज्याचा आरंभ.

इ. स. १७७४ पर्यंत हिंदुस्थानांतील इंग्लिश लोकांचे ताब्यांतील मुलूख एका अधिकाऱ्याचे अधिकाराखालीं नव्हता. यावर्षी रेग्युलेटिंग आक्ट ( भाग २० पहा ) या नांवाचा कायदा ठरला. या कायद्याअन्वयें बंगाल इलाख्याचा गव्हरनर यास गव्हनरजनरल असा किताब मिळाला व तो हिंदुस्थानांतील इंग्लिश लोकांचे ताब्यांतील सर्व मुलखाचा मुख्य अधिकारी झाला.

इंग्लिश लोकांचे ताब्यांतील हिंदुस्थनांतील सर्व प्रदेश एका अधिकाऱ्याचे अधिकाराखालीं येतो.

या ईस्ट इंडिया कंपनीचा राज्यकारभार चालविण्याकरितां इंग्लंडांत बोर्ड आफ् डैरेक्टर्स या नांवाची एक सभा होती. या सभेचे कामाची

बोर्ड आफ् डैरेक्टर्स आणि बोर्ड आफ कंट्रोल.

तपासणी करण्याकरितां बोर्ड आफ् कंट्रोल या नांवाची सभा होती. ( भाग २० पहा )

हिंदुस्थानचा राज्यकारभार खुद्द चक्रवर्तिनी महाराणीसाहेब आपले ' ताब्यांत घेतात.

ही व्यवस्था इ. स. १८५८ नवंबर महिन्याचे पहिले तारखेपर्यंत चालली. सदर तारखेस आपल्या परम दयाळू व स्वप्रजापालनदक्ष चक्रवर्तिनी महाराणीसाहेब (सर्व शक्तिमान् प्रभु त्यांचें निरंतर कल्याण करो) यांनीं या देशाचा राज्यकारभार आनूरेबल ईस्ट इंडिया कंपनीकडून खुद्द आपले ताब्यांत घेतला व तो अद्यापि तसाच चालला आहे. या प्रसंगीं यांनीं हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल यांस आपले प्रतिनिधि ( व्हाइसराय ) असा नवीन किताब दिला. गव्हरनर जनरल यांस व्हाइसराय हा किताब सरकारी कागदोपत्रीं बहुशा लावीत नाहींत.

महाराणीसाहेब हिंदुस्थानच्या चक्रवर्तिनी ( एम्प्रेस आफ्इंडियां ) हा किताब धारण करितात.

इ. स. १८७७ चे जानेवारी महिन्याचे पहिले तारखेस दिल्ली ( कित्येक इतिहास कर्त्यांचे मताप्रमाणें प्राचीन हस्तिनापूर ) येथें मोठ्या थाटमाटाचा दरबार झाला. त्याप्रसंगीं महाराणी साहेबांनीं हिंदुस्थानच्या चक्रवर्तिनी(एम्प्रेस आफ् इंडिया ) हा किताब आपण धारण केल्याचें सर्वांस जाहिर केलें.

चक्रवर्तिनी महाराणीसाहेबांचे तर्फे हिंदुस्थानचा राज्यकार-भार चालविणारी-कामदारमंडळी.

चक्रवर्तिनी महाराणीसाहेबांचे तर्फे हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविण्याकरितां खालीं लिहिलेले कामगारांची योजना केलेली आहे. इंग्लंडांत स्टेट सेक्रेटरी या नांवाचे एक मोठे मंत्री असतात. हेच हिंदुस्थानचे सर्व राज्यकारभाराचे श्रेष्ठाधिकारी. यांचे खालचे हुद्देदार

हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल, गव्हरनर जनरल यांचे हाताखालीं इलाख्यांचे गव्हरनर, लेफ्टे- नेन्ट गव्हरनर, चीफ कमिशनर्स, आणि एतद्देशीय संस्थानिकांचे दरबारीं ठेविलेले रेसि- डेन्ट व पोलिटिकल एजन्ट हे कामदार असतात.

स्टेटसेक्रेटरी (विलायत स- रकार) यांजकडे सोंपविलेलें काम.

हिंदुस्थानचा राज्यकारभार आनरेबल ईस्ट- इंडिया कंपनीकडे होता. त्या वेळीं कोर्ट आफ् डैरेक्टर्स व बोर्ड आफ् कंट्रोल या सभांकडे जें हिंदुस्थानचे राज्यकारभारासंबंधी काम असे, तेंच हल्लींचे स्टेट सेक्रेटरी यांजकडे सोंपविलेलें आहे. तें काम हिंदुस्थानचे राज्यकारभारावर देखरेख ठेवणें हें होय. यांस मदत करण्याकरितां एक कौन्सिल असतें.

इंडिया कौन्सिल.

या कौन्सिलास इंडिया कौन्सिल असें ह्मणतात. यांत पंधरा सभासद असतात. या कौन्सिलांतील जागा खालीं पडली तर त्या जाग्याची भरती करण्याचा अधिकार स्टेट्- सेक्रेटरींस असतो. या कौन्सिलांतील बहुतेक सभासद हिंदुस्थानांत दहा वर्षेपर्यंत सरकारी काम केलेले, किंवा तितक्याच मुदतीपर्यंत या देशांत दुसरा व्यापारधंदा करण्याकरितां राहिलेले आणि नेमणूक होतेवेळीं हिंदुस्थानदेश सोडून दहा वर्षांहून अधिक मुदत न झालेले अशा प्रकारचे पाहिजेत. अशा प्रकारची लायकी नस- लेल्या मनुष्याची नेमणूक वर सांगितल्या प्रकारचे नऊ सभासद असल्याशिवाय करितां येत नाहीं. ह्या नेमणुकीची मुदत दहा वर्षांची असते, परंतु पार्लमेन्ट सभेनें यांपैकीं एकाद्या

सभासदास कामावरून दूर करण्यास सांगितलें असतां तसें केलें पाहिजे. कोणत्याही सभासदाची दहा वर्षांची मुदत भरल्यावर त्यास पुन्हा कांहीं विशेष कारण असल्यास आणखी पांच वर्षेंपर्यंत पुन्हा नेमण्याचा अधिकार स्टेट सेक्रेटरी यांस आहे.

या कौन्सिलाकडे सोंपविलेलीं कामें.

स्टेटसेक्रेटरींचे देखरेखीखालीं विलायतेंत हिंदुस्थानचे राज्यकारभाराचे संबंधानें चालणारीं कामें चालविणें व हिंदुस्थान सरकाराशीं पत्रव्यवहार करणें हीं या सभेचीं कामें आहेत. परंतु हिंदुस्थानांत पाठवावयाचे प्रत्येक हुकमावर स्टेट सेक्रेटरींची सही लागते. हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल व मुंबई आणि मद्रास या इलाख्यांचे गव्हरनर यांजकडून जाणारे सर्व खलीते स्टेट सेक्रेटरींचे नांवें पाठवावे लागतात.

स्टेट सेक्रेटरी या सभेंतलि सभासदांच्या निरनिराळ्या कमेट्या करितात. प्रत्येक कमेटीनें कोणकोणत्या खात्यांचें कोणकोणत्या रीतीनें काम करावें हें ठरवितात. ह्या सभेचे स्टेट सेक्रेटरी हे अध्यक्ष असतात, आणि वेळोवेळीं त्यांना उपाध्यक्षाची नेमणूक करावी लागते. जेव्हां जेव्हां स्टेट सेक्रेटरी हुकूम फर्मावितील, तेव्हां तेव्हां त्यांचे सूचनेप्रमाणें या सभेच्या सभा भरतात. परंतु कमींत कमी दर आठवड्यास एक सभा झालीच पाहिजे व तींत किमानपक्ष पांच सभासद सभेचें काम चालण्यास हजर असलेच पाहिजेत.

गव्हरनरजनरल-

गव्हरनर जनरल हे हिंदुस्थानचे सर्वाधिकारी

आहेत. यांची नेमणूक चक्रवर्तिनी महाराणीसाहेब करितात. यांच्या नेमणुकीची मुदत पांच वर्षांची असते. यांस सालिना २,५०,०००रुपये पगार मिळतो. याशिवाय त्यांस सर्व कच्चा खर्च मिळतो; त्याची रकम सालिना सुमारें १,२०,०००रुपये होते. चक्रवर्तिनी महाराणीसाहेब यांच्या अमलांतील प्रदेशांत राहणारे सर्व इंग्लिश व एतद्देशीय लोक, त्याचप्रमाणें या देशांत असणारे सर्व परदेशांतील लोक यांजकरितां कायदे करण्याचा अधिकार गव्हरनर जनरल यांस आहे.

रलयांजकडे सोंपविलेला अधिकार.

गव्हरनर जनरल यांस राज्यकारभार चालविण्याचे कामीं मदत करण्याकरितां एक कौन्सिल ( मंत्रीमंडळ )असतें. त्यास सुप्रीम एक्झिक्युटिव्ह ( श्रेष्ट राज्यकारभार चालविणारी मंडळी )अशी संज्ञा आहे. या कौन्सिलांत खुद्द गव्हरनर जनरल, हिंदुस्थानांतील सैन्याचे मुख्य अधिकारी आणि दुसरे कौन्सिलर असतात.

सुप्रीम एक्झिक्युटिव्हकौन्सिल.

राज्यकारभार सुयंत्रपणें चालण्याकरितां परराष्ट्रसंबंधी काम चालविणें, देशाचे वसूलाची व्यवस्था करणें, देशांतील व्यवस्था राखणें, लष्करी कारभार व लोकोपयोगीं कामें अशीं निरनिराळीं खातीं केलेलीं आहेत. प्रत्येक खात्याचें काम कोणत्या तरी एका मंत्र्याकडे सोंपविलेलें असतें.

राज्यकारभार चालविण्याकरितां केलेलीं निरनिराळीं खातीं.

खुद्द गव्हरनर जनरल, व मुंबई आणि मद्रास येथील गव्हरनर आणि यांचे कौन्सिलांतील कौन्सिलरयांच्या नेमणुका खुद्द हिंदुस्थानचे चक्रवर्तिनी महाराणीसाहेबांकडून होतात.

ग० जनरल, गव्हरनर आणि कौन्सिलर यांच्या नेमणुका.

सुप्रिम लेजिस्लेटिव्ह कौन्सिल.

एक्झिक्युटिव्ह कौन्सिलांतील मंडळी व दुसरे सुद्धा पासून बारा सभासद मिळून लेजिस्लेटिव्ह कौन्सिल ( कायदे करणारी मंडळी ) होते या कायदे करणारे मंडळींत एक्झिक्युटिव्ह कौन्सिलांतील कौन्सिलरांशिवाय जे बाकीचे कौन्सिलर असतात त्यांची नेमणूक गव्हरनर जनरल व इलाख्याचे गव्हरनर यांजकडून होते. या सर्व कौन्सिलरांस आनरेबल ( नामदार ) हा किताब असतो. गव्हरनर जनरल यांचे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलास सुप्रीम लेजिस्लेटिव्ह कौन्सिल असें ह्मणतात. या कौन्सिलानें केलेले कायदे सर्व हिंदुस्थानास लागू होतात.

ले. गव्हरनर आणि चीं. कमिशनर यांच्या नेमणुका.

लेफ्टेनेन्ट गव्हरनर आणि चीफ कमिशनर यांच्या नेमणुका स्टेटसेक्रेटरींचे मंजुरीनें गव्हरनरजनरल करितात.

मुंबई आणि मद्रास येथील गव्हरनरांना देखील गव्हरनर जनरलां प्रमाणें राज्यकारभार चालविण्याचे कामीं मदत करण्याकरितां व कायदे करण्याकरितां दोन कौन्सिलें असतात. बंगालचे लेफ्टेनेन्ट गव्हरनरांस फक्त कायदे करणारें कौन्सिल आहे या कौन्सिलांनीं केलेले कायदे हिंदुस्थान सरकारचे मंजूरीनें त्या त्या इलाख्यांत लागू होतात. बाकीचे इलाख्यांचे लेफ्टेनेन्ट गव्हनरांनां राज्यकारभार चालविण्यास मदत करण्याकरितां कौन्सिलें नाहींत, व त्यांस कायदे करण्याचाही अधिकार नसतो. जरी गव्हरनर जनरल हे सर्वाधिकारी आहेत तथापि इलाख्यांचे गव्हरनरां

स राज्यकारभारांत बराच स्वतंत्राधिकार असतो.

इलाखाधिपतींचे हाताखालची कामदार मंडळी.

इलाखाधिपतींचे ( गव्हरनर, ले० ग०, ची० कमिशनर इ. ) हाताखालीं रेव्हेन्यु कमिशनर, कलेक्टर, असिस्टंट कलेक्टर, डेपुटी कलेक्टर, मामलेदार ( कोठेंकोठें यांस तहशिलदार असेंही ह्मणतात. ) अवल कारकून ( कोठेंकोठें यांस पेषकार असें ह्मणतात व क्वचित् स्थळीं फडनवीस असेंही ह्मणण्याचा प्रघात आहे ) आणि पोलीसपाटील अशी एकाखालचे एक दरजाची कामदार मंडळी असते.

राज्यकारभार चालविण्या करितां केलेले खात्यां पैकीं मुख्य खातीं.

राज्यकारभाराचे सोयीकरितां कोणकोणतीं खातीं केलीं आहेत हें वर सांगितलेंच आहे; ह्या खात्यांत लष्करी आणि मुलकी हीं दोन मुख्य होत.

लष्करी खात्याची व्यवस्था.

लष्करी खात्याचें काम कम्यांडर इन चीफ ( सेनाध्यक्ष ) यांचे मार्फत चालतें. यांचे हाताखालीं निरनिराळ्या दरजाची लष्करी कामदार मंडळी असते.

मुलकी खात्याच्या मुख्य शाखा.

मुलकी खात्याच्या निरनिराळ्या शाखा आहेत. त्यांत रेव्हेन्यु ( महसूल बाब ) आणि ज्युडिशियल ( न्यायखातें ) ह्या दोन मुख्य आहेत.

मुलकी कामदार.

मुलकी काम चालविण्याकरितां कान्व्हेनेन्टेड सिव्हिल सर्व्हंटस ( सनदी मुलकी कामदार ) व अनकान्व्हेनेन्टेड सिव्हिल सर्व्हंटस ( बिन सनदी मुलकी कामदार ) असे दोन प्रकारचे कामदार असतात.

सनदी मुलकी कामदार.

रेव्हेन्यु कमिशनर, कलेक्टर, आणि असिस्टंट कलेक्टर, हे सनदी नोकर असतात. यांची सिव्हिल सर्व्हिस या नांवाची परीक्षा इंग्लंडांत प्रतिवर्षी होत असते, ती ह्या जागा मिळण्यास उतरली पाहिजे. ही परीक्षा इ. स. १८५४ पासून सुरू झाली.

बिनसनदी नोकर.

डेपुटी कलेक्टर, मामलेदार, अवल कारकून इत्यादि प्रकारचे कामदार हे बिनसनदी नोकर असतात. यांची हायर स्ट्यांडर्ड ( उच्च प्रतीची) व लोअर स्ट्यांडर्ड ( कनिष्ठ प्रतीची ) परीक्षा उतरावी लागते.

रेव्हेन्यु कमिशनर यांजकडे सोंपविलेलीं कामें

कित्येक जिल्ह्यांचा एक भाग करून तो रेव्हेन्यु कमिशनरांचे ताब्यांत देतात. तो त्या त्या जिल्ह्यांचे कलेक्टर व पोलीस सुपरिंटेंडेन्ट यांचे व दुसरे मुलकी कामावर देखरेख ठेवितो.

कलेक्टर यांजकडे सोंपवलेलीं कामें.

प्रत्येक जिल्ह्यास एक कलेक्टर असतो. तो वसूल बाबीचा मुख्य कामदार, फौजदारी कामाचे संबंधानें डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट, रेजिस्ट्रेशन ( नोंदणी ) खात्याचे संबंधानें डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार, लोकलबोर्ड ( जिल्ह्यांतील लोकलफंड ह्मणून जी वसुलाची बाब असते, तिच्या खर्चावर व जिल्ह्यांतील लोकोपयोगी कामें व शाळा यांजवर देखरेख करणारी मंडळी ) चा सभासद आणि अध्यक्ष आणि त्या जिल्ह्यांतील एतद्देशीय संस्थानांचे संबंधानें पोलिटिकल एजंट असतो. कलेक्टर यांस मदत करण्याकरितां असिस्टंट कलेक्टर आणि डेपुटी कलेक्टर हे कामदार असतात.

मामलेदार यांजकडे सोंपविलेलीं कामें.

मामलेदार हा तालुक्याचा मुख्य अधिकारी असतो. प्रत्येक मामलेदाराचे हाताखालीं अवल कारकून असतो. मामलेदार आपआपलें तालुक्यांतील वसुलाचें व इतर कामें करितो व आपले तालुक्यांतील फौजदारी गुन्ह्यांचीही चौकशी करितो. हा अधिकार अवल कारकुनासही असतो. फौजदारी काम चालविण्याचे संबंधानें तिसरा वर्ग, दुसरा वर्ग व पहिला वर्ग माजिस्ट्रेट असे तीन प्रकार असतात.

पोलीसपाटील.

तालुक्यांतील प्रत्येक गांवास एक पोलीसपाटील असतो. तो आपले गांवचे वसुलाचें व बंदोबस्ताचें काम पहातो. त्यास लिहिण्याचे कामीं मदत करण्याकरितां एक कुळकर्णी असतो. पाटील व कुळकर्णी यांच्या जागा वंशपरंपरेच्या असतात. हें काम चालविण्याबद्दल त्यांस वतन असतें व कोठें कोठें नियमित पोटगी मिळते.

न्यायखातें.

न्यायखात्याच्या दिवाणी आणि फौजदारी अशा दोन शाखा आहेत. या खात्याचें काम चालविण्याकरितां जज्ज व सबार्डिनेटजज्ज ( मुनसफ ) हे कामदार असतात. जज्ज हे बहुधा सनदी नोकर असतात व ठरींव परीक्षा उतरलेले लोकांस मुनसफीचे जाग्यांवर नेमितात.

दिवाणी खातें

दिवाणी खात्यांत देवघेव, वतन, जमिनीवरील हक्क वगैरेचे दावे चालतात.

मुनसफांचीं कामें.

दिवाणी आणि फौजदारी काम चालविण्याकरितां प्रत्येक जिल्ह्याचे ठिकाणीं एक जज्ज असतो. त्याचे हाताखालीं मुनसफ असतात. मुन-

सफांस फक्त दिवाणी काम चालविण्याचा मात्र अधिकार असतो. मुनसफांनीं केलेले ठरावांवर जिल्ह्याचे जज्जाकडे अपील ( फेरतपासणी )होतें.

जिल्ह्यांचें जज्जांचीं कामें.

जिल्ह्यांचे जज्ज डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट यांचे अधिकाराबाहेरील फौजदारी खटले व मुनसफ यांचे अधिकाराबाहेरील दिवाणी खटले यांची चौकशी करितात. यांचे ठरावांवर हायकोर्टाकडे अपील होतें.

हायकोर्ट.

हाय कोर्ट हें इलाख्याचे मुख्य ठिकाणीं असतें. या कोर्टाची स्थापना इ० स० १८६९ पासून झाली. यांत अनेक जज्ज असतात. त्यांतील मुख्य जज्जास चीफ जस्टीस असें ह्मणतात. दोनदोन जज्ज मिळून खटल्यांचा इनसाफ करितात. याचे ओरिजिनल साइड(मूळशाखा )आणि आपेलेट साइड (जिल्ह्याचे ठिकाणचे न्यायाधीशांनीं केलेले ठराव रास्त आहेत किंवा गैररास्त आहेत यांची तपासणी करणारी ) अशा दोन शाखा आहेत. या हायकोर्टानें केलेले निवाड्यांवर अपील करणें असल्यास तें विलायतेंत प्रिव्हि कौन्सिल या नांवाचे कोर्टाकडे होतें.

राजकीय विभाग.

## हिंदुस्थानचे राजकीय विभाग.

हिंदुस्थानचे राज्यव्यवस्थेकरितां खालीं लिहिल्याप्रमाणें विभाग केले आहेत.

(अ )ब्रिटिश सरकारच्या खुद्द अमलाखालचा प्रदेश.

( ब )निजाम, शिंदे, होळकर, गायकवाड यांच्या संस्थानांसारखीं ब्रिटिश सरकारच्या आश्रया-

खालचीं आणि थोडीं बहुत ब्रिटिश सरकारच्या ताब्यांतील संस्थानें.

( क ) ब्रिटिश सरकाराबरोबर तह केलेलीं आणि ब्रिटिश सरकारचें श्रेष्ठत्व कबूल करणारीं स्वतंत्र संस्थानें.

( ड ) ब्रिटिश सरकाराखेरीज इतर युरोपांतील राष्ट्रांचीं ठाणीं.

इंग्लिश सरकारचे ताब्यांतील हिंदुस्थानचे राजकीय विभाग.

( अ ) खुद्द इंग्लिश सरकारचे ताब्यांतील हिंदुस्थानचे प्रदेशाचे राज्यकारभार चालविण्याचे सोयीकरितां खालीं लिहिलेले विभाग केले आहेत.

१ आसाम, २ बंगाल इलाखा, ३ वायव्य-प्रांत आणि अयोध्या, ४ पंजाब इलाखा, ५ रजपुताना आणि अजमीर, ६ मुंबई इलाखा, ७ मध्यहिंदुस्थानांतील संस्थानें, ८ मध्यप्रांत ( सेंट्रल प्राव्हिन्सीज ), ९ वऱ्हाड, १० निजामाचें राज्य, ११ मद्रास इलाखा, १२ म्हैसूर आणि कुर्ग प्रांत.

आसाम प्रांत.

१ आसाम प्रांत हिंदुस्थानचे अगदीं पूर्वेकडील ब्रह्म देशाचे सरहद्दीस लागलेला प्रदेश आहे. या प्रांतांत ब्रह्मपुत्रा नदीचा प्रदेश आणि त्याचे लगत्यास असलेले कांहीं डोंगराळ प्रदेश येतात. इ० स० १८७४ पर्यंत हा प्रांत बंगाल इलाख्याखालीं मोडत असे. त्या वर्षापासून तो चीफ कमिशनराचे ताब्यांत आहे.

या प्रांतांतील इतिहासप्रसिद्ध स्थळें.

कामरूप प्रांतांतील गोवाटी (प्राचीन प्रागजिटीसपूर)हें शहर या प्रांताची हल्लींची राजधानी

आहे. सिबासगड प्रांतांतील घारगांव ( हल्लींचें नाझीरा ) हें शहर या प्रांताची प्राचीन राजधानी होतें. खाश्या नांवाच्या टेंकडीवरील शिलांग हें येथील चीफकमिशनरचें राहण्याचें ठिकाण आहे.

बंगाल इलाखा.

२ बंगाल इलाखा इ. स. १८५४ पासून लेफ्टेनेन्ट गव्हरनराचे अधिकाराखालीं आहे. हा इलाखा हिंदुस्थानांतील इतर सर्व प्रदेशांपेक्षां अत्यंत सुपीक आणि अतिशय दाट वस्तीचा आहे.

या इलाख्यांतील प्रांत.

या इलाख्यांत खास बंगाल, बहार, ओरिसा आणि छोटा नागपूर हे मोठे प्रांत आहेत.

या इलाख्यांतील इतिहासप्रसिद्ध स्थळें.

कलकत्ता हें शहर या इलाख्याची व सर्व हिंदुस्थानची राजधानी आहे. येथें लेफ्टेनेन्ट गव्हरनर असतो, व खुद्द गव्हरनर जनरलही वर्षांतून कांहीं महिने राहतो. नदिया हें शहर बंगाल्यांतील प्राचीन हिंदु राजांची राजधानी होतें. प्लासी, बरद्वान, हुगळी, चिनसुरा, चंद्रनगर, मुर्शिदाबाद, कासिमबाजार, राणीगंज, डाका, पाटना ( प्राचीन पालिबोथ्रा अथवा पाटलीपुत्र ) बक्सार आणि हवा खाण्याचें ठिकाण दार्जलिंग, हीं या इलाख्यांत प्रसिद्ध स्थळें आहेत.

या इलाख्यांतील एतद्देशीय संस्थानें.

या इलाख्यांत सिकिम, कुचबहार, मणिपूर, कोशा, टिपरा आणि दुसरीं कित्येक लहान लहान आणि डोंगरी संस्थानें आहेत.

वायव्य प्रांत आणि अयोध्या.

३ वायव्य प्रांत इ. स. १८३३ पासून लेफ्टेनेन्ट गव्हरनराचे ताब्यांत आहे. ह्यांत इ. स. १८७७ पासून पूर्वी चिफ्कमिशनराचे ताब्यांत असलेला अयोध्या प्रांत सामील केला आहे.

या प्रांताची राजधानी अलाहाबाद शहर आहे. या इलाख्यांत बनारस, गोरखपूर, अलाहाबाद, आग्रा, मीरत, झांशी, रोहिलखंड आणि कमाऊन हे मोठे प्रांत आहेत.

या इलाख्यांतील मोठे प्रांत.

या इलाख्यांत प्राचीन हिंदु विद्येचें मूलस्थान काशी ( बनारस ), गाझीपूर, मजबूद डोंगरी किल्ला असलेलें चुनार, अलाहाबाद ( प्रयाग ) कानपूर, आग्रा आणि याचेच लगत असलेलें फत्तेपूरसिक्री, कनोज ( प्राचीन कान्यकुब्ज ), मथुरा, मीरत, झांशी, बिजनार ( महा कवि कालिदास याचें जगमान्य शाकुंतल नाटकाचें स्थळ ) लखनौ आणि फैजाबादेजवळील श्रीरामचंद्र याचें जन्मस्थान अयोध्या हीं प्रसिद्ध स्थळें आहेत.

या इलाख्यांतील इतिहासप्रसिद्ध स्थळें.

या इलाख्यांत रामपूर, गरवाल, आणि दुसरीं १९ संस्थानें आहेत.

या इलाख्यांतील एतद्देशीय संस्थानें

४ पंजाब इलाखा लेफ्टेनेन्ट गव्हरनराचे ताब्यांत आहे. याचे ३२ जिल्हे करून त्यांचे दहा भाग केले आहेत. प्रत्येक भाग कमिशनराचे ताब्यांत असतो. ते भाग येणेंप्रमाणें:—लाहोर, अमृतसर, जलंदर, अंबाला, दिल्ली, हिसार, मुलतान, डेराजत, पेशावर आणि रावळपिंडी.

पंजाब इलाखा.

या इलाख्यांत दिल्ली, पाणिपत, स्थानेश्वर, कुरुक्षेत्र, अलिवाल, सरहिंद, कांग्रा अथवा नागरकोट, लाहोर, फिरोजपूर, मुडकी, सोब्रन, अटक, गुजराथ, चिलियनवाला, अमृतसर, लुधियाना, पेशावर, मुलतान, रावळपिंडी हीं प्र·

या इलाख्यांतील इतिहासप्रसिद्ध स्थळें.

सिद्ध स्थळें आहेत. गव्हरनर जनरल साहेबांचें हवा खाण्याचें ठिकाण सिमला हेंही याच इलाख्यांत आहे.

या इलाख्यांतील एतद्देशीय संस्थानें.

या इलाख्यांत काश्मीर, भावलपूर, पतियाला, झिंद, नभा, कपुरथळा, फरीदकोट, कालसिआ, मंडी, चंबा, सखेव आणि दुसरीं लहान लहान डोंगरी संस्थानें सिमल्याचे आसपास आहेत.

रजपुताना आणि अजमीर.

५ रजपुतान्यांत इंग्रज सरकारचीं आश्रित अशीं रजपूत लोकांचीं पुष्कळ संस्थानें आहेत. त्यांत अठरा मोठीं आहेत. या संस्थानिकांचे दरबारीं त्यांस राज्यकारभारांत सल्लामसलत देण्याकरितां इंग्लिशसरकारचे मार्फत पोलिटिकल एजंट या नांवाचे कामदार असतात. त्या सर्वांवर गव्हरनर जनरल यांचा एजंट मुख्य अधिकारी असतो. तो सिरोहि प्रांतांत अबूचे हवाशीर पहाडावर राहतो.

अजमीर.

अजमीर प्रांत रजपुतान्यांत आहे. हा इंग्रज सरकारचे ताब्यांत आहे. त्यावर चीफ कमिशनर मुख्य अधिकारी आहे.

रजपुतान्यांतील इतिहासप्रसिद्ध स्थळें.

रजपुतान्यांत उदेपूर, याचेच लगत इतिहासप्रसिद्ध किल्ला चितुर, अजमीर, जयपूर, अंबर, रतनबोर, जोधपूर, लासवारी, भरतपूर, डीग आणि अबू हीं प्रसिद्ध स्थळें आहेत.

मुंबई इलाखा

६ मुंबई इलाखा गव्हरनरचे ताब्यांत आहे. हे हिंवाळ्यांत मुंबईत, उन्हाळ्यांत महाबळेश्वरास आणि पावसाळ्यांत पुण्यास राहतात.

यांत सिंध, गुजराथ, कोंकण, महाराष्ट्र, खानदेश, आणि उत्तरकानडा हे मुख्य प्रांत आहेत. या इलाख्याचे सिंध प्रांत धरून २१ जिल्हे केले आहेत. याचे सिंध, उत्तर भाग, मध्य भाग आणि दक्षिण भाग असे चार भाग केले आहेत. प्रत्येक भाग कमिशनराचे अधिकाराखालीं आहे. यांतील प्रांत.

या इलाख्यांत सुरत, अमदाबाद, मुंबई, ठाणें, वसई, पुणें, खडकी, पुरंदर, वडगांव, अहमदनगर, विजापूर, सातारा, कोरेगांव, अष्टें, रायगड, होनावर, सिंधहैदराबाद, मियानि, अमरकोट, ठट्टा आणि कराची हीं प्रसिद्ध स्थळें आहेत. या इलाख्यांतील इतिहासप्रसिद्ध स्थळें.

या इलाख्यांत बडोदें, कोल्हापूर कच्छ, गुजराथ प्रांतांतील लहानमोठीं संस्थानें, सावंतवाडी आणि दक्षिण महाराष्ट्र देशांतील कुरुंदवाड, मिरज, जमखंडी, रामदुर्ग, मुधोळ, सांगली, सावनूर इत्यादि संस्थानें आहेत. या इलाख्यांतील एतद्देशीय संस्थानें.

७ मध्यहिंदुस्थानांत सुमारें ७१ लहान मोठीं संस्थानें आहेत. हीं गुजराथ प्रांताच्या आणि रजपुतान्याच्या पूर्वेस अंशतः उत्तरहिंदुस्थानांत आणि अंशतः दक्षिणहिंदुस्थानांत अशीं आहेत. त्यांत शिंदेसरकारचे ताब्यांतील ग्वाल्हेर संस्थान, होळकरसरकारचे ताब्यांतील इंदूर संस्थान, भोपाळच्या बेगमचें राज्य, रेवा, धार, देवास आणि जावरा हीं मुख्य आहेत. यांच्यावर गव्हरनर जनरल यांच्या एका एजंटाची देखरेख असते. मध्यहिंदुस्थानांतील संस्थानें.

या संस्थानांतील इतिहासप्रसिद्ध स्थळें.

शिंदेसरकारची राजधानी ग्वाल्हेर, त्याचे नजीक महाराजपूर आणि पनियार, विक्रमादित्याची सुप्रसिद्ध राजधानी उज्जनी, होळकर सरकारची राजधानी इंदूर, आणि उज्जनीचेजवळ महिदपूर हीं या संस्थानांतील प्रसिद्ध स्थळें आहेत.

मध्यप्रांत (सेंट्रल प्राव्हिन्सीझ.)

८ मध्यप्रांत हा मध्य हिंदुस्थानांतील संस्थानांचे दक्षिणेस आणि बंगाल इलाख्यांतील छोटा नागपूरचे नैर्ऋत्य दिशेस आहे. यांत मध्यहिंदुस्थानचा उंचवट प्रदेश येतो. हा चीफ कमिशनराचे ताब्यांत आहे.

या प्रांतांतील इतिहासप्रसिद्ध स्थळें.

या प्रांतांत जबलपूर, खानदेशाचे पूर्वीचे राजांची राजधानी बऱ्हाणपूर, याचेच नजीक अशिरगड आणि या प्रांताची हल्लींची आणि पूर्वींचे वऱ्हाडचे राजे भोसले यांची राजधानी नागपूर हीं प्रसिद्ध स्थळें आहेत.

वऱ्हाड प्रांत.

९ वऱ्हाड प्रांताचा कारभार निजामाचे हैदराबादेस जो गव्हरनर जनरल यांचा रेसिडेन्ट असतो त्याचे मार्फत चालतो. यास हैदराबाद अनामत मुलूख असें ह्मणतात. हा प्रांत इ. स. १८५३ पासून निजाम सरकारानें कर्जाचे फेडीबद्दल इंग्लिशांकडे दिलेला आहे. हा प्रांत सुपीक असून यांत कापूस फार पिकतो. हा प्रांत हिशेब होऊन परत मिळण्याविषयीं निजाम सरकारचे दरबारांतून पुष्कळ वर्षांपासून खटपट चालली आहे.

या प्रांतांतील

या प्रांतांत इलिचपूर, गाविलगडचा किल्ला,

आरगांव, उमरावती व आकोला हीं प्रसिद्ध स्थळें आहेत.

इतिहासप्रसिद्ध स्थळे.

१० निजाम सरकारचा मुलूख वऱ्हाडचे दक्षिणेस आहे. निजाम हा पूर्वी दिल्लीचे बादशाहाचा दक्षिणेंतील सुभेदार होता. तो दिल्लीचे राज्यास उतरती कळा लागल्यावर इ० स० १७२४ या वर्षी स्वतंत्र झाला.

निजामसरकारचे राज्य.

या राज्यांत निजाम सरकारची राजधानी हैदराबाद, पूर्वींचे कुतुबशाही राज्याची राजधानी गोवळकोंडें, फार प्राचीन तैलंगण राज्याची राजधानी वारंगुळ, प्राचीन बेदरशाही राज्याची राजधानी बेदर, त्याचेच लगत प्राचीन ब्राह्मणी राज्याची राजधानी कलबुर्गे, मलिकंबर याची राजधानी खडकी ( हल्लींचें नांव औरंगाबाद ), औरंगाबादेपासून थोड्या अंतरावर देवगिरी( हल्लींचें नांव दौलताबाद ) आणि औरंगाबादेचे पूर्वेस प्रसिद्ध रणस्थान असई हीं प्रसिद्ध स्थळें आहेत.

या राज्यांतील इतिहासप्रसिद्ध स्थळें.

११ मद्रासइलाखा गव्हरनराचे अधिकाराखालीं आहे. ह्यांत उत्तर सरकार, कर्नाटक, मलबार आणि दक्षिण कानडा हे मुख्य प्रांत आहेत.

मद्रास इलाखा.

ह्या इलाख्यांत मच्छलीपटन, गंटूर, मद्रास, चिंगलपट, कांजिवरम, अर्कोट, वेलोर, वांदिवाश, कडलूर, फोर्ट सेन्ट डेव्हिड, जिंजी, पोर्टोनोव्हो, फ्रेंचांचे ताब्यांतील पांडिचरी, त्रिचिनापल्ली, सिरिंगम बेट, तंजावर, मदुरा, कालिकत,

या इलाख्यांतील इतिहासप्रसिद्ध स्थळें.

काननूर, पालघांट आणि मंगळूर हीं प्रसिद्ध स्थळें आहेत.

या इलाख्यां-तील एतद्देशीय सं-स्थानें.

या इलाख्यांतील मुख्य संस्थानें त्रावणकोर, कोचीन, पदूकोट आणि जयपूर एजन्सी हीं आहेत.

म्हैसूर आणि कुर्ग प्रांत.

१२ म्हैसूर संस्थान पूर्वी कामिशनराचे अमलाखालीं होतें, तें हल्लींचे तेथील गादीवर असलेले राजेसाहेब प्रौढ वयाचे होऊन आपले राज्याचा कारभार स्वतः चालविण्यास योग्य झाल्यामुळें त्यांचे ताब्यांत ता. २५ मार्च सन १८८१ रोजीं दिलें.

कुर्गप्रांत.

कुर्गप्रांत पूर्वी एका लिंगाईत राजाचे ताब्यांत होता, परंतु तो वाईट रीतीनें वागून आपल्या प्रजेवर जुलूम करूं लागल्यामुळें व त्यानें इंग्रज सरकाराशीं उद्दामपणाची वर्तणूक केल्यामुळें त्यास इ. स. १८३४ त ब्रिटिश सरकारानें पदच्युत करून त्याचे राज्याचा कारभार आपले ताब्यांत घेतला. तेव्हांपासून हा प्रांत चीफ कमिशनराचे ताब्यांत आहे.

या प्रांतांतील इतिहासप्रसिद्ध स्थळें.

म्हैसूर संस्थानांत श्रीरंगपट्टन, बंगळूर, नंदीदुर्ग, बेदनूर आणि कुर्ग प्रांतांत मर्कारा हीं प्रसिद्ध स्थळें आहेत.

ब्रह्मदेश.

हिंदुस्थानचे पूर्वेकडील पूर्वी व माजी गव्हरनर जनरल लार्ड डफरिन यांचे कारकिर्दींत काबीज केलेल्या ब्रह्मदेशाचे राज्यकारभारावरही हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल याची देखरेख असते.

( क ) हिंदुस्थानांत भूतान आणि नेपाळ हीं दोन मुख्य स्वतंत्र संस्थानें आहेत.

स्वतंत्र संस्थानें.

हें संस्थान ब्रह्मपुत्रानदीच्या उत्तरेस आहे. ह्या संस्थानाची राजधानी तासेसुदान हें शहर आहे. येथील राजास देवराज असें ह्मणतात.

भूतान.

हें संस्थान हिमालय पर्वताचे दक्षिणेस व सिकीमचे पश्चिमेस आहे. ह्याची राजधानी कटमंडु हें शहर आहे.

नेपाळ.

( ड ) या शिवाय हिंदुस्थानांत फ्रेंच लोकांचीं व पोर्तुगीज लोकांचीं ठाणीं आहेत. तीं खालीं लिहिल्या प्रमाणें.

यूरोपांतील दुसऱ्या लोकांचीं ठाणीं.

फ्रेंच लोकांचीं ठाणीं.

**पांडिचरी**........कारोमांडल किनाऱ्यावर.
**माही**............मलबार किनाऱ्यावर.
**कारिकल**........कारोमांडल किनाऱ्यावर.
**चंद्रनगर**........हुगली नदीवर.
**यानान**........ओडिसाच्या किनाऱ्यावर.

पोर्तगीज लोकांचीं ठाणीं.

**गोवें**............पश्चिम किनाऱ्यावर सावंतवाडीचे दक्षिणेस.
**दीव**............काठेवाडचे दक्षिण किनाऱ्याजवळ एक बेट आहे.
**दमन**..........उत्तर कोकणांत मुंबईपासून शंभर मैलांवर आहे.

# भाग २ रा.

## हिंदुस्थानचा इतिहास.

### प्राचीन व हल्लींचे हिंदुलोक व मुसलमान लोक.

मूळचे लोक. हिंदुस्थानांतील मूळच्या लोकांविषयीं कांहीं एक विश्वसनीय माहिती मिळत नाहीं. हिंदुलोकांच्या इतिहासांत पुराणोक्त दंतकथा पुष्कळ आहेत. तथापि असें खचित वाटतें कीं, हल्लीं मध्य हिंदुस्थान, रजपुताना, बंगाल आणि दक्षिण हिंदुस्थान यांतील जंगलांत आणि डोंगरामध्यें जे गोंड, भील, संताळ, आणि टोड या जातीचे काळे व रानटी लोक आढळून येतात ते येथील मूळचे लोक असावेत; व बहुतेक इतिहासकर्त्यांचेंही असें मत आहे. ह्या लोकांचें स्वरूप, भाषा आणि रीतिभाती हीं यांस जिंकून डोंगराळ प्रदेशांत पिटाळून लावणारे जे आर्य त्यांचे वंशज हल्लींचे हिंदुलोक यांच्या रीतिभातीपासून अगदीं भिन्न आहेत.

### हिंदुलोकांचे वर्ग.

मनु. हिंदुलोकांचे प्राचीन काळीं कसे वर्ग केले होते याची माहिती मनूच्या ग्रंथाधारें मिळते. मनु हा हिंदुलोकांचा प्रसिद्ध कायदे करणारा होता. हा खिस्ती शकाच्या पूर्वीं ९०० वर्षांवर होऊन गेला असें मानितात. याच्या वेळीं हिंदुलोकांचे पुढें लिहिलेले चार वर्ग होते.

लोकांचे वर्ग.

१ ब्राह्मण. २ क्षत्रिय. ३ वैश्य. ४ शूद्र.

त्यांचे उद्योग.

ब्राह्मण यांचें कर्म धर्मसंबंधीं विचार करणें हें होतें.

क्षत्रिय हे योद्धे होते.

वैश्य हे शेतकी व व्यापार करणारे होते.

शूद्र हे चाकरी करणारे होते.

यांतील पहिल्या तीन वर्गास द्विज अशी संज्ञा होती.

शूद्र हे जिंकलेल्या लोकांचे वंशज आहेत असें वाटतें.

हिंदुलोकांचे स्वभाव.

हल्लींचे हिंदुलोक मनूनें वर वर्णन केलेल्या लोकांचेच वंशज होत. त्यांत बंगाल्यांतील लोक अशक्त व नामर्द आहेत; परंतु ते इतर हिंदुलोकांपेक्षां बुद्धीनें श्रेष्ठ व विद्येचे भोक्ते आहेत. उपयुक्त सुधारणुकीच्या कामांत त्यांचें पाऊल इतर हिंदुलोकांपेक्षां नेहमीं पुढें आहे. रजपूत लोक शूर आणि मर्द आहेत; मराठे धूर्त आणि कारस्थानी आहेत. मद्रास येथील तमिळ लोक प्रामाणिक व विश्वासू आहेत. एकंदरींत हिंदुलोक रीतीभातींनीं सौम्य, चालीनें साधेभोळे, आणि आपल्या आप्त मित्रांविषयीं ममताळू असे आहेत. मुसलमान लोक अविचारी, दुरभिमानी, ढोंगी, अरसिक, मोठेपणाची शेखी मिरविणारे व विद्येच्या कामांत सर्वांपेक्षां पाठीमागें आहेत. असें कित्येक इंग्लिश इतिहासकर्त्यांचें मत आहे.

# भाग ३ रा.

## इतिहासाचे भाग.

इतिहासाचे विभाग.

कोणत्याही देशाच्या इतिहासाचे साधारणपणें प्राचीन व अर्वाचीन असे दोन भाग करितां येतात. हा प्रकार आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासासही लागू आहे.

प्राचीन इतिहास.

प्राचीन काळापासून मुसलमान लोकांच्या कारकिर्दीपर्यंत ह्मणजे इ. स. १००१ पर्यंत जो हिंदुस्थानचा इतिहास त्यास प्राचीन इतिहास असें ह्मणतां येईल.

अर्वाचीन इतिहास.

अर्वाचीन इतिहासांत मुसलमान लोकांच्या कारकीर्दीचा व हल्लींचे सर्व सत्ताधीश राज्यकर्ते इंग्लिश लोक यांच्या कारकीर्दीचा समावेश होतो.

## प्राचीन इतिहास.

इतिहास मिळण्याचीं साधनें.

हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाची माहिती मिळण्याचीं साधनें हिंदुलोकांचे फार प्राचीन ग्रंथ वेद, रामायण, महाभारत इत्यादि प्राचीन व सर्वमान्य ग्रंथ, निरनिराळ्या ठिकाणचे शिलालेख व ताम्रपट्ट आणि प्राचीन परकीय लोकांनीं हिंदुस्थानाविषयीं दिलेली माहिती हीं होत. परंतु यापासूनही जेवढी माहिती पाहिजे तेवढी समग्र मिळते असा अर्थ नाहीं आणि जी थोडी बहुत मिळते तीही कवींच्या कल्पित व असंभाव्य गोष्टींनीं फार मिश्र आहे. प्राचीन हिंदु ग्रंथकर्त्यांनीं खालीं लिहिल्याप्रमाणें प्राचीन राज्यांविषयीं वर्णन केलें आहे.

## उत्तर हिंदुस्थानांतील राज्यें.

१ अयोध्या. २ हस्तिनापूर. ३ गुजराथ. ४ मगध. ५ माळवा.

१ अयोध्या हें अतिशय प्राचीन शहरांपैकीं एक शहर आहे. येथें सूर्यवंश या नांवाचें राजकुल उत्पन्न झालें. राम हा या कुलांतील फार प्रसिद्ध राजा होता. हा शूर व साहसीक होता. यानें दक्षिणेंत स्वारी करून लंका बेट घेतलें. त्याला हिंदुलोक देवाप्रमाणें मानूं लागले. अयोध्या. राम.

२ हस्तिनापूर या नांवाचें राज्य दिल्लीजवळ होतें. येथें पांडव राज्य करीत होते. यांनीं आपले भाऊबंद कौरव यांस जिंकिलें. हस्तिनापूर.

३ गुजराथ येथें कृष्ण राज्य करीत होता. हा मोठा मसलती व राजकारस्थानी होता. कौरव पांडवांचे युद्धांत हा पांडवांचे पक्षाकडचा होता. त्यालाही हिंदुलोक देवाप्रमाणें मानूं लागले. गुजराथ.

४ मगध या राज्यांत हल्लींचा बहार प्रांत येतो. त्याची राजधानी पाटलिपुत्र ( पालिबोथ्रा ) ही होती. हें शहर गंगानदीच्या कांठीं होतें. येथें खिस्ती शकापूर्वी ३७३ व्या वर्षी चंद्रगुप्त या नांवाचा राजा राज्य करीत होता. याच्या वंशजांनीं खिस्ती शकाच्या पांचव्या शतकापर्यंत येथें राज्य केलें. मगध. चंद्रगुप्त.

५ माळवा येथें विक्रमादित्य या नांवाचा राजा राज्य करीत होता. हा न्यायी आणि विद्वान होता. हा राजा शककर्ता होऊन गेला. याचा शक खिस्ती शकापूर्वी ५६ व्या वर्षी चालू झाला. माळवा. विक्रमादित्य.

याचा शक नर्मदेच्या पलीकडे उत्तर हिंदुस्थानांत अद्यापि चालतो. येथें ख्रिस्ती शकाच्या अकराव्या शतकांत भोज या नांवाचा राजा राज्य करीत होता.

## दक्षिण हिंदुस्थानांतील राज्यें.

१ पांड्य. २ चोळ. ३ त्रावणकोर आणि मलबार. ४ तैलंगण. ५ महाराष्ट्र.

पांड्य.

१ पांड्यास हल्लीं तिणवल्ली असें ह्मणतात. याची राजधानी मधुरा ही होती. हें राज्य ख्रिस्ती शकापूर्वी ४५० वर्षांच्या सुमारास होतें.

चोळ.

२ चोळ अथवा तमिळ प्रदेश याची राजधानी कांजिवेरम ही होती.

त्रावणकोर आणि मलबार.

३ त्रावणकोर आणि मलबार येथें चिराज या नांवाचे एका जातीचे राजे राज्य करीत होते.

तैलंगण.

४ तैलंगण येथें कोणते राजे राज्य करीत होते याची माहिती मिळत नाहीं.

महाराष्ट्र

५ महाराष्ट्र देशांत ख्रिस्ती शकाच्या ७८ व्या वर्षीं शालिवाहन या नांवाचा राजा राज्य करीत होता. हा राजा शककर्ता होऊन गेला. याचा शक नर्मदेच्या दक्षिणेस अद्यापि चालू आहे.

---

# भाग ४ था.

## प्राचीन काळीं परकी देशांतील लोकांनीं हिंदुस्थानावर केलेल्या स्वाऱ्या.

डरायस.

इराणचा राजा डरायस हिस्प्यास्पिस यानें ख्रिस्ती शकाच्या पूर्वीं ५१८ व्या वर्षीं हिंदुस्था-

नावर स्वारी केली आणि सिंधुनदीच्या कांठचा प्रदेश जिंकिला.

आलेक्झांडर. आलेक्झांडर ज्यास इकडचे लोक शिकंदर बादशाहा असें ह्मणतात, यानें हिंदुस्थानावर खिस्ती शकापूर्वी ३२७ व्या वर्षी स्वारी करून पंजाब प्रांत जिंकिला. पोरस या नांवाच्या राजाचा पराभव केला आणि सतलज नदीपर्यंत आला. खिस्ती शकाच्या पूर्वी ३२३ व्या वर्षी शिकंदर बादशाहा बाबिलोन येथें मरण पावला. नंतर सेल्युकस हा त्याच्या पाठीमागून हिंदुस्थान व ब्याक्ट्रिया ( ज्यास हल्लीं बल्ख असें ह्मणतात ) येथें राज्य करूं लागला. त्यानें मगधचा राजा चंद्रगुप्त याजबरोबर तह केला. कांहीं काळानें ब्याक्ट्रिया देश स्वतंत्र झाला.

पोरस याचें राज्य जेहेलम नदीच्या कांठीं होतें असें ह्मणतात. त्याचा मृत्यू.

---

## भाग ५ वा.

### हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास.

#### मुसलमान राजांची कारकीर्द.

इसवी सन १००१ पासून १८५७ पर्यंत.

मुसलमान राजांच्या कारकीर्दीचे विभाग खालीं लिहिल्याप्रमाणें केले आहेत.

१ गिजनी येथील महमूद.
२ महमद घोरी. ११७६–१२०६
३ गुलाम वंशाचे राजे. १२०६–१२८८
४ खिलजी घराण्याचे राजे. १२८८–१३२१
५ तघलख घराण्याचे राजे. १३२१–१४१२

६ सय्यद घराण्याचे राजे. १४१२-१४५०
७ लोदी घराण्याचे राजे. १४५०-१५२६
८ मोंगल घराण्याचे राजे. १५२६-१८५७

या राजांच्या इतिहासास आरंभ करण्या पूर्वीं मुसलमान लोकांविषयीं थोडी बहुत पूर्वीची माहिती असणें अवश्य आहे.

महमदाचा जन्म ५६९.

मुसलमानी धर्माचा स्थापक महमद हा अर्बस्थानांत इ. स. ५६९ त मक्का येथें जन्मला. त्याच्या अनुयायांनीं इ. स. ६३२ सांत इराण देश जिंकून तो अर्बस्थानच्या राज्यास जोडिला आणि नंतर पूर्वेकडील देशांत आपला अधिकार वाढावा असें त्यांच्या मनांत येऊन इ. स. ६६४ या वर्षीं अरब लोकांचें सैन्य काबुलांत गेलें. आपल्या धर्माचा अभिमान त्यांस अतिशय असे. अधिकार आणि लूट यांची आवड, वैभवाची उत्कंठा आणि स्वर्गसुखाची आशा या गोष्टींच्या योगेंकरून ते युद्धांत आपल्या जिवावर उदार होऊन मारावयाकरितां अथवा मरावयाकरितां शिरत असत. हिंदुस्थान देश फार विस्तीर्ण व संपत्तीविषयीं त्याची चोहींकडे कीर्ति असल्यामुळें त्यांचें मन या देशाकडे वेधलें आणि महमद

कासीम याची हिंदुस्थानावर पहिली स्वारी. इ. स. ७११.

कासीम यानें इ. स. ७११ या वर्षी सिंध प्रांत काबीज केला, परंतु त्याच्या वंशजांस रजपूत लोकांनीं घालवून दिलें. इतक्यांत पंजाबच्या उत्तरेस डोंगरी प्रदेशांत जें गिझनी ह्मणून शहर आहे तेथें मुसलमान लोकांचें एक घराणें उदयास आलें. ह्या घराण्यांतील प्रमुख महमूद यानें हिंदुस्थानावर स्वारी केली.

# भाग ६ वा.

## महमूद गिझनी.

महमूद हा स्वभावानें फार क्रूर व चंचल होता. यानें हिंदुस्थानावर इ. स. १००१ पासून १०२४ पर्यंत एकंदर बारा स्वाऱ्या केल्या. प्रत्येक स्वारींत तो पुष्कळ संपत्ति मिळवून गिझनीस परत जाई. त्याच्या बारा स्वाऱ्या.

पहिले स्वारींत त्यानें लाहोरच्या जयपाळ राजाचा पराभव केला. नंतर त्याच्या दोन स्वाऱ्या( इ. स. १००४–१००५ )मुलतानावर झाल्या, परंतु तें एकदम कबज्यांत आलें नाहीं. चवथी स्वारी अनंगपाळ राजावर होती ( इ. स. १००८ ). त्यानें पांचवी स्वारी इ. स. १०१० त करून मुलतान काबीज केलें. सरस्वती आणि यमुना या दोन नद्यांमधील स्थानेश्वर येथील देवालयावर इ. स.१०११त त्यानें सहावी स्वारी केली. त्यानें सातवी व आठवी स्वारी ( इ. स. १०१४–१०१५ ) काश्मिरावर केली. महमूद इ. स. १०१७ त पंजाबांतील सर्व नद्या उतरून कनोज येथें आला; तेथील राजा त्यास शरण आल्यावरून त्यास व त्याचे राज्यास कांहीं त्रास न देतां तो यमुनेच्या कांठीं आग्र्यापासून तीस मैलांवर मथुरेपर्यंत आला; ही महमुदाची नववी स्वारी. त्यानें इ. स. १०२२ सांत आणि २३ सांत दहावी आणि अकरावी अशा दोन स्वाऱ्या कलिंजरचे राजावर केल्या.

स्थानेश्वर दिल्लीच्या पश्चिमेस ३० मैलावर.

कलिंजर बुंदेलखंडात.

या दोन स्वाऱ्यांत मात्र त्याचा थोडा सांगण्यासारखा पराभव झाला.

त्यानें शेवटली स्वारी इ. स. १०२४ सांत केली. या स्वारींत त्याचा फार नाश झाला. त्याला हिंदुलोकांबरोबर मोठ्या निकरानें लढावें लागलें. या लढाईत त्याचें पुष्कळ सैन्य मेलें. या स्वारींत तो गुजराथ येथें आला. तेथें सोमनाथाचें एक फार सुंदर देवालय होतें. व त्यासभोंवती तटबंदी करून त्याचा पक्का बंदोबस्त केला होता. त्या देवस्थानाचे संरक्षणार्थ पुष्कळ रजपूत वगैरे शूर लोक जमले होते. महमुमुदानें त्या देवालयावर पुष्कळ हल्ले केले; परंतु बरेच दिवसपर्यंत त्याचें कांहीं चाललें नाहीं. शेवटीं कमनशीबानें हिंदु लोकांचा पराभव होऊन सोमनाथाचें देवालय महमुदाचे हातीं आलें. देवालयांत शिरून त्यांतील सर्वांत मोठी मूर्ति महमुदानें आपल्या हातानें फोडिली व तेथील सर्व संपत्ति लुटून नेली.

महमुदाचें स्वदेशीं परत जाणें.

गुजराथ प्रांतावर नवीन राजा नेमून महमूद आलेल्या वाटेनें परत स्वदेशीं जाण्यास निघाला; परंतु तो रस्ता अजमीरच्या राजानें अडविला आहे असें पाहून त्याला दुसऱ्या एका नव्या रस्त्यानें जावें लागलें. त्या नव्या रस्त्यानें त्याचे हजारो लोक अत्यंत थकून पाण्याच्या कमताईमुळें व उष्णतेमुळें मरण पावले. असा त्याच्या बहुतेक सैन्याचा नाश झाला. तो गिझनी

त्याचा मृत्यु.

येथें इ. स. १०३० सांत मरण पावला.

महमुदाच्या पाठीमागून जे राजे त्याच्या गादीवर बसले त्यांविषयीं एथें कांहीं वर्णन केलें नाहीं,कारण कीं,त्यांचा हिंदुस्थानच्या इतिहासाशीं फारसा संबंध नाहीं.

## भाग ७ वा.

### महमद घोरी.

महमद गिझनीच्या घराण्यांतील शेवटचा राजा खुशरुमलिक यास महमद घोरीनें पदच्युत केलें. आणि आपण गिझनीचें राज्य बळकाविलें. हा हिंदुकुश पर्वताच्या प्रदेशांतील घोर ह्या प्रांतांत राहणारा होता; ह्मणून त्यास महमद घोरी असें ह्मणतात.

महमद घोरी इ.स. ११७६

त्याचें मूल स्थान.

एवढ्यावर तृप्त न होतां त्यानें गिझनी येथील महमुदाप्रमाणें हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून लूट व राज्य मिळविण्याची इच्छा केली.

या वेळेस हिंदुस्थानांत अजमीर व दिल्ली येथें पृथ्वीराज या नांवाचा रजपूत घराण्यांतलि चव्हाण या आडनांवाचा राजा राज्य करीत होता. त्याजवर महंमद घोरी यानें इ. स. ११९१ त स्वारी केली. त्यांत त्याचा स्थानेश्वर येथें पराभव झाला व तो परत स्वदेशास निघून गेला. या लढाईत ज्या सरदारांनीं भित्रेपणा दाखिवला त्यांस शिक्षा करण्याचा एक नवीनच प्रकार त्यानें काढिला तो असाः——जे सरदार पळून गेले त्यांच्या तोंडांत जवांचे तोबरे देऊन त्यांस ते खेंचरांप्रमाणें खावयास अगत्य

पृथ्वीराज.

स्थानेश्वरची पहिली लढाई इ. स. ११९१

पाडून गिझनीच्या रस्त्यांतून धिंड काढीत त्यांस नेलें. परंतु पुनरपि त्यांजवर मेहरबानी करून त्यानें त्यांजला पराक्रम दाखविण्याची संधि इ. स. ११९३ या वर्षीं आणिली. या वर्षीं महमद घोरीनें पुन्हां स्थानेश्वरावर स्वारी केली आणि पृथ्वी राजाचा पराभव केला व तो या लढाईंत मारला गेला. या योगानें त्यास दिल्ली आणि अजमीर हे प्रांत मिळाले.

त्यानें हिंदुस्थानांतील दिल्ली आणि अजमीर हे प्रांत इ. स. ११९५ वांत जिंकिले आणि हिंदुस्थानावर ९ स्वाऱ्या करून पुष्कळ संपत्ति मिळविली. हा परत स्वदेशास जात असतां वाटेंत इ. स. १२०६ या वर्षीं मारिला गेला.

त्याच्या स्वाऱ्या.

त्याचा मृत्यु इ. स. १२०६

या वेळेपर्यंत मुसलमान लोकांचें ह्या देशांत स्थायिक राज्य स्थापिलेलें नव्हतें. ते स्वाऱ्या करून पुष्कळ लूट मात्र घेऊन स्वदेशास जात असत.

---

## भाग ८ वा.

### गुलाम वंशाचे राजे.

### इ. स. १२०६–१२८८.

#### कुतबुद्दीन इ. स. १२०६–१०.

हिंदुस्थानांत राहून राज्य करणाऱ्या मुसलमान राजांमध्यें कुतुबुद्दीन हा पहिला होय.

महमद घोरी यास पुत्रसंतान नव्हतें. कुतुबुद्दीन हा महमद घोरीच्या गुलामांपैकीं एक गुलाम होता. तो आपल्या शौर्यानें आणि बुद्धिबळानें

कुतुबुद्दीनाची उत्पत्ति.

मोठ्या योग्यतेस आला. महमद मेल्यानंतर कुतुबुद्दीन व तसेच त्याचे गुलामांपैकीं दुसरे दोन गुलाम स्वतंत्र झाले. आणि निरनिराळ्या ठिकाणीं अमल करूं लागले. कुतुबुद्दीन यानें दिल्लीचें राज्य बळकाविलें ( इ. स. १२०६ ). तो १२१० त मरण पावला. कुतुबुद्दीन यास व त्याचे वंशांतील त्याच्या पाठीमागून राज्य करणारांस गुलाम राजे असें ह्मणतात.

महमदघोरी याचे गुलाम स्वतंत्र होतात.

त्याचा मृत्यु इ.स. १२१०.

त्याच्या पाठीमागून त्याचा मुलगा आराम यानें एक वर्षपर्यंत राज्य केलें. हा दुर्बळ असल्यामुळें त्याला त्याचा मेहुणा अलतमश यानें पदच्युत करून गादी बळकाविली.

आराम इ.स. १२१०–११.

अलतमश यानें २५ वर्षें राज्य केलें. तो इ. स. १२३६ सांत मरण पावला. त्याचे मागून त्याचा मुलगा रुनकुद्दीन हा त्याचे गादीवर बसला; परंतु सात महिन्यांतच त्याला त्याची बहीण रजिआबेगम हिनें पदच्युत केलें.

अलतमश इ. स. १२११–३६.

रुन्कुद्दीन.

रजिआबेगम ही सुंदर व हुशार होती; परंतु दुर्व्यसनी असे; ही १२३९ सांत मरण पावली.

रजिआबेगम इ.स.१२३६–३९.

नंतर तिचा भाऊ बहिराम हा राज्य करूं लागला.

बहिराम इ.स. १२३९–४१.

त्याच्या मागून रुनकुद्दीन याचा मुलगा मसाऊद गादीवर बसला. तो दुष्ट आणि व्यसनी होता. त्यानें चार वर्षें राज्य केलें.

मसाऊद इ.स. १२४१–४६.

त्यानंतर अलतमश याचा नातू नासरुद्दीन महमद हा राज्य करूं लागला. हा शांत स्वभावाचा असून अभ्यास केला असे. यानें सर्व रा-

नासरुद्दीन महमद इ.स.१२४६–६६.

ज्याचा कारभार ग्यासुद्दीन बलबन् याजकडे सोंपवून आपण दरवेशाप्रमाणें राहत असे. तो आपला उदरनिर्वाह पुस्तकें लिहून त्यांजवर करी. तो इ. स. १२६६ त मरण पावला.

बलबन् इ. स. १२६६–८६.

बलबन् याचे हातीं पुष्कळ दिवस राज्यकारभार असल्यामुळें तो फार प्रबळ झाला आणि त्यानें राज्य बळकाविलें. त्याच्या पाठीमागून कैकोबाद हा गादीवर बसला. हा गुलाम घराण्यांतील शेवटचा राजा होता. त्याचा खून लहानपणीं झाला.

कैकोबाद इ. स. १२८६–८८.

मोंगल लोकांच्या स्वाऱ्या.

या राजांच्या कारकीर्दींत तार्तरी किंवा मोंगल या लोकांनीं प्रथमतः हिंदुस्थानावर स्वारी केली. त्या लोकांचा मुख्य सरदार झेंगिसखान हा होता. या लोकांस जें जें मिळालें तें तें त्यांनीं लुटिलें व त्याचा नाश केला आणि नंतर इराण देशास परत गेले.

---

## भाग ९ वा.

### खिलजी घराण्यांतील राजे.

### इ. स. १२८८–१३२१.

जलालुद्दीन इ. स. १२८८–९५.

कैकोबाद हा मारला गेल्यानंतर अफगाण लोकांनीं जलालुद्दीन यास इ. स. १२८८ त गादीवर बसविलें. हा तार्तरी देशांत जन्मलेला होता. हा राजा राज्य करीत असतां मोंगल-लोकांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या केल्या आणि ते दिल्लीपर्यंत आले. परंतु तुर्कांपैकीं एक गुलाम मोठ्या शौर्यानें मागें शौर्यानें आणि बुद्धिबळानें

नंतर यानें तैलंगण, कर्नाटक आणि मलबार हे नवीन देश जिंकिले. जलालुद्दीन यास त्याचा पुतण्या अल्लाउद्दीन यानें १२९५ त ठार मारिलें आणि आपण गादी बळकाविली.

*राज्याचा विस्तार.*

*त्याचा मृत्यु इ.स. १२९५.*

यानें फार वाईट कृत्यें करून राज्य बळकाविलें. या गोष्टीचा लोकांस विसर पडण्याकरितां त्यानें चांगल्या रीतीनें राज्यकारभार चालविला. यानें गुजराथ प्रांत जिंकिला.

*अल्लाउद्दीन खिलजी इ.स. १२९५ १३१५.*

त्याच्यामागून त्याचा मुलगा मुबारिक हा राज्य करूं लागला. तो इ. स. १३२० त मरण पावला. हा खिलजी घराण्यांतील शेवटचा राजा होता.

*मुबारिक खिलजी १३१६–२०.*

---

## भाग १० वा.

### तघलख घराण्यांतील राजे.

### इ. स. १३२०–१४१२.

खिलजी घराण्यांतील सर्व राजांचा वध झाल्यानंतर पंजाबचा सुभेदार ग्यासुद्दीन तघलख हा इ. स. १३२१ सांत राजा झाला; परंतु चार वर्षांनंतर त्याच्या अंगावर डेरा पडून तो मरण पावला.

*ग्यासुद्दीन तघलख इ. स. १३२०–२५.*

*त्याचा अकालिक मृत्यु.*

त्याचा मुलगा महमद तघलख हा त्याचे पाठामागून गादीवर बसला. याच्या लहरी स्वभावाची आणि वेडेपणाच्या कृत्यांची प्रसिद्धि महमद हा राज्यंप्रमतः आपली राजधानी बदलवाचा असून अ[illegible] केला. त्याचा मनोदय दि-

*महमद तघलख इ.स. १३२५–५१*

*त्याचा राजधानी बदलण्याचा व्यर्थ प्रयत्न.*

ल्लीशहर सोडून दक्षिण हिंदुस्थानांत दौलताबाद येथें आपली राजधानी करावी असा होता. याकरितां त्यानें दिल्लींतील सर्व लोकांस दिल्ली सोडून आपणाबरोबर दक्षिण हिंदुस्थानांत येण्याविषयीं हुकूम केला. परंतु हा त्याचा बेत सिद्धीस गेला नाहीं.

चीन देशावर स्वारीचा बेत व सैन्याचा विनाकारण नाश.

नंतर चीन देशावर स्वारी करावी असें त्याच्या मनांत आलें. या कारणास्तव त्यानें हिमालय पर्वताच्या मार्गानें एक लक्ष सैन्य पाठविलें. या मूर्खपणाच्या कृत्यांतही त्याला यश आलें नाहीं. सर्व सैन्याचा हिमालय पर्वतांतून जात असतां बर्फांत नाश झाला.

त्याचा स्वभाव व त्यामुळें प्रजेस त्रास.

ह्या बादशाहानें क्रूरपणाची शिकस्तच करून सोडिली. लोकांचा जीव घेणें ह्यांत त्यास कांहींच वाटत नव्हतें, उलटा आनंद होई. आपल्या करमणुकीकरितां तो आपल्या प्रजेची शिकार करीत असे; व त्यांनां ठार मारीत असे. त्याच्या जुलमास त्रासून कोणी बंड केलें असतां सर्व प्रदेशास सैन्याचा वेढा घालून आंतील संपूर्ण शेतकऱ्यांस ठार मारावें असा तो हुकूम करी.

त्याचें एक विलक्षण कृत्य.

एके दिवशीं त्याचा दांत पडला असतां त्यानें तो मोठ्या समारंभानें पुरला आणि त्याजवर भव्य व सुशोभित थडगें बांधिलें.

फिरोजशाहा इ, स. १३५१–८८

महमद तघलखाच्या पाठीमागून त्याचा पुतण्या फिरोजशाहा गादीवर बसला. पूर्वीं जे मुसलमानी धर्माचे राजे होऊन गेले त्या सर्वांपेक्षां हा फार चांगला होता असें ह्मणतात. यानें

आपल्या प्रजेच्या हिताकरितां पुष्कळ सुधारणा केल्या. यानें आपल्या राज्यांत दवाखाने, पूल व तळीं बांधिलीं. यानें यमुना नदीचा कालवा बांधिला. हिंदुस्थानांत हा पहिलाच कालवा होता. हल्लीं इंग्लिश लोकांनीं त्याची दुरुस्ती करून तो कालवा चालू केला आहे. हा बादशाहा इ. स. १३८८ त मरण पावला. त्या-वेळेस त्याचें वय ९० वर्षांचें होतें. त्याणें ३७ वर्षें राज्य केलें.

त्याचा स्वभाव व त्याचीं लोकोपयोगाचीं कृत्यें.

त्याचा मृत्यु इ. स. १३८८.

हा राजा मेल्यानंतर त्याच्या वंशजांनीं फक्त दहा वर्षेंच राज्य केलें. त्यांच्या कारकीर्दींत जिकडे तिकडे घोटाळा होता. अशा वेळीं तैमूरलंग यानें इ. स. १३९८ त हिंदुस्थानावर स्वारी केली. त्यावेळीं फिरोजशाहाचा नातू राज्य करीत होता. हा नांवाचा मात्र राजा होता; ह्मणून तैमूरलंग यास हिंदुस्थान जिंकण्यास फारसे श्रम पडले नाहींत.

तघलख राज्याचा शेवट.

तैमूरलंग याची स्वारी इ. स. १३९८.

तैमूरलंग ( एक तुर्क सरदार.)

तैमूरलंग हा क्रूर व रानटी स्वभावाचा सरदार होता. त्यानें मध्य व पश्चिम एशिया जिंकून नंतर हिंदुस्थानावर स्वारी केली. आणि दिल्ली शहर काबीज करून व लुटून आपणास बादशाहा असें ह्मणाविलें. यानंतर तो पुष्कळ संपत्ति घेऊन आपले देशास परत गेला.

ह्याचीं अघोर कृत्यें.

हा बादशाहा इतका क्रूर होता कीं, तो जेव्हां दिल्लीवर गेला तेव्हां वाटेनें त्यानें फार अघोर कृत्यें केलीं. मार्गावरील सर्व गावें जाळून टाकिलीं. याजविषयीं असें सांगतात कीं, त्याजवळ बंदि-

वान केलेले लोक फार जमून त्याच्या स्वारीस अडथळा होऊं लागल्यामुळें त्याचें काय करावें हें त्यास सुचेना. नंतर त्यानें निर्दयपणें असा हुकूम केला कीं, जे पंधरा वर्षांखालीं असतील ते राखून बाकीच्यांस मारून टाकावें. याप्रमाणें त्यानें एक लक्ष लोक मारविले. हा बादशाहा ज्या ज्या मुलखांतून गेला त्या त्या मुलखांतील सर्व देश अगदीं उद्वस्त झाले.

---

## भाग ११ वा.

### सय्यद घराण्यांतील राजे.

यानंतर सय्यद घराण्यांतील चार राजांनीं राज्य केलें. ते नांवाचे मात्र राजे होते, कारण त्यांचा अधिकार दिल्ली शहराचे बाहेर अगदीं नव्हता. त्यांचीं नावें:—

१ सय्यद खिजरखान—१४१४—२१.
२ सय्यद मुबारिक —१४२१—३५.
३ सय्यद महमद —१४३५—४४.
४ सय्यद अल्लाउद्दीन—१४४४—५०.

---

## भाग १२ वा.

### लोदी घराण्याचे राजे. १४५०—१५२६.

अशा प्रकारें उद्वस्त व निराश्रित झालेल्या देशाचें आधिपत्य लोदी या नांवाच्या घराण्यांतील राजांच्या हातीं आलें. या घराण्याचे तीन राजे होऊन गेले. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

१ बहिलोलखान लोदी. १४५०–१४८८.
२ शिकंदर लोदी. १४८८–१५१८.
३ इब्राहीम लोदी. १५१८–१५२६.

यांच्या कारकीर्दींत जिकडे तिकडे दंगा व झोटिंगबादशाही चालली होती. त्यानीं सुमारें ८० वर्षेंपर्यंत क्रूरतेनें व जुलमानें राज्य केलें. ह्या वंशांतील इब्राहिम लोदी या नांवाचा बादशाहा राज्य करीत असतां पंजाबचा सुभेदार दौलतखान लोदी यानें बाबरास मदतीविषयीं विनंति केली. ती त्यानें मोठ्या आनंदानें मान्य केली. बाबर तैमूरलंग याच्या वंशांतील सहावा पुरुष होता.

त्यांची कारकीर्द.

बाबर व इब्राहिम लोदी यांची दिल्लीजवळ पानिपत येथें लढाई झाली. या लढाईत बाबरास जय मिळाला व इब्राहिम लोदी मेला. यायोगेंकरून दिल्लीची गादी बाबरास मिळाली. मोंगल असें ज्या राजांस ह्मणतात त्या घराण्यांतील बाबर हा पहिला बादशाहा होय.

बाबर इ. स. १५२४.

पानिपत ( दिल्लीच्या वायव्येस सुमारें ५० मैलांवर ) येथील लढाई सन १५२६.

---

## भाग १३ वा.

### मोंगल घराण्यांतील राजे.

### १५२६–१८५७.

बाबरानें पांच वर्षें राज्य केलें. त्याची बहुतेक कारकीर्द बंडखोर लोकांस आपल्या अमलाखालीं आणण्यांतच गेली. मुसलमान लोक फार सुलभ रीतीनें त्याच्या अमलाखालीं आले.

बाबर मोंगल घराण्यांतील पहिला बादशाहा.

परंतु रजपूत लोकांस जिंकण्यास त्याला फार प्रयास पडले.

रजपूत लोक.

रजपूत लोक फार शूर असत. ते बहुतकरून उत्तर हिंदुस्थानचे वायव्य दिशेस राहत असत. त्यांस दुसऱ्यांच्या अमलाखालीं राहणें आवडत नसे. रजपूत लोक अद्यापिही उत्तर हिंदुस्थानांत आहेत व ते शूरही आहेत. हे लोक इतर हिंदु लोकांसारखे नव्हते. त्यांच्या रीतिभाति फार निराळ्या होत्या. त्यांचा युद्ध वगैरे करण्याचा क्रम इतरांसारखा नव्हता. त्यांस अब्रूचा मोठा अभिमान होता व त्यांस अपकीर्तीचें फार भय वाटत असे. अनेक प्रसंगीं त्यांच्या अशा गोष्टी घडून आल्या आहेत कीं, एखादे वेळेस लढाईंत त्यांचा पराभव होऊन अब्रू गेली असतां ते ज्या किल्ल्यांत असत त्यास आग लावून आपल्या बायकापोरांस ठार मारून मोठ्या आवेशानें हातावर शिरकमल घेऊन शत्रूंवर चालून जावें आणि तसेंच शत्रूंशीं युद्ध करून सर्वांनीं प्राण द्यावे.

त्यांचा स्वभाव व वर्तनक्रम.

त्यांच्या युद्धाची पद्धत.

त्यांचें एक उदाहरण.

शिक्री ( आग्र्या जवळ. )

चंदेरी (माळवा) येथ। किल्ल्यास वेढा.

अशा प्रकारचें उदाहरण, बाबर व मेवाडचा राजा संग यांमध्यें जी शिक्री येथें इ. स. १५२७ सांत लढाई झाली तींत रजपुतांचा पराभव झाल्यावर बाबरानें चंदेरी येथील किल्ल्यास वेढा दिला तेथें घडून आलें. या ठिकाणीं [illegible] क किल्ल्यांत मागें एकही मनुष्य [illegible] या हातीं आलें. [illegible] क्रानें लढले. [illegible] गेले. त्यांचीं नांव [illegible] ३० सांत मरण पावला.

त्याच्या मरणाची एक चमत्कारिक गोष्ट सांगतात, ती अशी कीं, हुमायून ह्मणून त्याचा आवडता मुलगा होता, तो आजारी पडला असतां त्याला दीर्घायु करावें ह्मणून बाबरानें त्याचें मरण कांहीं कृत्यें करून ईश्वरास प्रार्थून आपणावर आणिलें. बाबरानें आपल्या पुत्राबद्दल आपण मरावें ह्मणून जीं कृत्यें केलीं त्यांच्यायोगानें मनांत धास्ती पडून त्यास विकृति होऊन तो मरण पावला असावा.

बाबराचा स्वभाव व गुण.

बाबर हा स्वभावानें मोठा आनंदी होता. त्यास माणसाचा कंटाळा नव्हता. तो सर्वांशीं मिळून असे. असा जरी तो होता तरी तो सामान्य पुरुष नव्हता. असे पुरुष जगांत फारच विरळा उत्पन्न होतात. बाबर मोठा तरवारबहादूर, तसाच लिहिण्याच्या कामांत फार कुशळ होता. त्यानें स्वकीय चरित्राच्या कांहीं गोष्टी लिहिल्या आहेत त्या वाचल्या असतां सर्व मनुष्यांस मौज वाटण्यासारख्या आहेत. त्यानें आपल्या दोषांचेंही त्यांत वर्णन केलें आहे. दुसरें असें त्या गोष्टींवरून दिसून येतें कीं, त्यास सत्याची प्रीति फार असे व तो तसाच सद्सद्विचारवान् व रसिक होता. यावरून सर्व लोक सर्वदां त्यास चाहतात.

[illegible]कबराचा मृ- . ( १६०५ ).

त्याची कारकीर्द.

बाबरानंतर त्याचा मुलगा हुमायून हा [illegible]लीचा बादशाहा झाला आणि त्याचा [illegible] हिंदु- भाऊ कामेरान यास काबूल, कंदाह[illegible]कबर चां पंजाबचा कांहीं भाग मिळाला. [illegible]हें व चपलता

परंतु रजपूत लोकांस जिंकण्यास त्याला फार प्रयास पडले.

रजपूत लोक.

रजपूत लोक फार शूर असत. ते बहुतकरून उत्तर हिंदुस्थानचे वायव्य दिशेस राहत असत. त्यांस दुसऱ्यांच्या अमलाखालीं राहणें आवडत नसे. रजपूत लोक अद्यापिही उत्तर हिंदुस्थानांत आहेत व ते शूरही आहेत. हे लोक इतर

त्यांचा स्वभाव व वर्तनक्रम.

हिंदु लोकांसारखे नव्हते. त्यांच्या रीतिभाति फार निराळ्या होत्या. त्यांचा युद्ध वगैरे करण्याचा क्रम इतरांसारखा नव्हता. त्यांस अब्रूचा मोठा अभिमान होता व त्यांस अपकीर्तीचें फार भय वाटत असे. अनेक प्रसंगीं त्यांच्या अशा गोष्टी घडून आल्या आहेत कीं, एखादे वेळेस

त्यांच्या युद्धाची पद्धत.

लढाईत त्यांचा पराभव होऊन अब्रू गेली असतां ते ज्या किल्ल्यांत असत त्यास आग लावून आपल्या बायकापोरांस ठार मारून मोठ्या आवेशानें हातावर शिरकमल घेऊन शत्रूंवर चालून जावें आणि तसेंच शत्रूंशीं युद्ध करून सर्वांनीं प्राण द्यावे.

त्यांचें एक उदाहरण.

शिक्री (आग्र्या जवळ.)

चंदेरी (माळवा) येथ। किल्ल्यास वेढा.

अशा प्रकारचें उदाहरण, बाबर व मेवाडचा राजा संग यांमध्यें जी शिक्री येथें इ. स. १५२७ सांत लढाई झाली तींत रजपुतांचा पराभव झाल्यावर बाबरानें चंदेरी येथील किल्ल्यास वेढा दिला तेथें घडून आलें. या ठिकाणीं [illegible] क किल्ल्यांत मागें एकही मनुष्य या हातीं आलें. [illegible] क्रूरानें लढले. गेले. त्यांचीं नांव [illegible] ३० सांत मरण पावला.

त्याच्या मरणाची एक चमत्कारिक गोष्ट सांगतात, ती अशी कीं, हुमायून ह्मणून त्याचा आवडता मुलगा होता, तो आजारी पडला असतां त्याला दीर्घायु करावें ह्मणून बाबरानें त्याचें मरण कांहीं कृत्यें करून ईश्वरास प्रार्थून आपणावर आणिलें. बाबरानें आपल्या पुत्राबद्दल आपण मरावें ह्मणून जीं कृत्यें केलीं त्यांच्यायोगानें मनांत धास्ती पडून त्यास विकृति होऊन तो मरण पावला असावा.

बाबराचा स्वभाव व गुण.

बाबर हा स्वभावानें मोठा आनंदी होता. त्यास माणसाचा कंटाळा नव्हता. तो सर्वांशीं मिळून असे. असा जरी तो होता तरी तो सामान्य पुरुष नव्हता. असे पुरुष जगांत फारच विरळा उत्पन्न होतात. बाबर मोठा तरवारबहादूर, तसाच लिहिण्याच्या कामांत फार कुशळ होता. त्यानें स्वकीय चरित्राच्या कांहीं गोष्टी लिहिल्या आहेत त्या वाचल्या असतां सर्व मनुष्यांस मौज वाटण्यासारख्या आहेत. त्यानें आपल्या दोषांचेंही त्यांत वर्णन केलें आहे. दुसरें असें त्या गोष्टींवरून दिसून येतें कीं, त्यास सत्याची प्रीति फार असे व तो तसाच सदसद्विचारवान् व रसिक होता. यावरून सर्व लोक सर्वदां त्यास चाहतात.

त्याचा मुलगा हुमायून १५३० सांत गादीवर बसतो.

बाबरानंतर त्याचा मुलगा हुमायून हा दिल्लीचा बादशाहा झाला आणि त्याचा भाऊ कामेरान यास काबूल, कंदाहार आणि पंजाबचा कांहीं भाग मिळाला.

हुमायून १५४० सांत पदच्युत होतो.

शीरशाहा या नांवाच्या मनुष्यानें हुमायुनास १० वर्षेंपर्यंत राज्य केल्यावर पदच्युत केलें.

शीरशाहा.

शीरशाहा हा एक पठाण जातीचा सरदार होता. हा आपल्या शौर्यानें व चातुर्यानें बंगाल प्रांतांत मोठ्या योग्यतेस आला. यानें फार चातुर्यानें व हुशारीनें पांच वर्षें राज्य केलें.

त्याची कारकीर्द व मृत्यु १५४५.

त्याच्या कारकीर्दींत लोकांनां फार सौख्य झालें. त्यानें वसूल घेण्याच्या बाबदींत, न्यायखात्यांत आणि लोकोपयोगीं कृत्यांत फार सुधारणा केल्या.

कलिंजर. (बुंदेलखंडांत.)

तो कलिंजर या नांवाच्या एका रजपूत लोकांच्या शहरास वेढा घालून तें घेण्याच्या कामांत गुंतला असतां मरण पावला ( १५४५ ). त्याचें अकालिक मरण सर्वांस दुःखदायक झालें.

पदच्युत झालेला हूमायून परत येतो व आपलें राज्य घेतो.

हुमायून याला शीरशाहानें पदच्युत केल्यावर तो इराणांत पळून गेला. तेथून तो शीरशाहा मेल्यानंतर दहा वर्षांनीं परत आला आणि पुष्कळ श्रम करून व संकटें भोगून त्यानें पुनः शीरशाहाच्या वंशजांपासून आपलें राज्य घेतलें ( १५५५ ). परंतु तो एक वर्षानंतर मरण

त्याचा मृत्यु.

पावला ( १५५६ ).

अकबर गादीवर बसतो १५५६

याच्या नंतर त्याचा मुलगा अकबर हा राज्य करूं लागला (१५५६). हुमायुनास शीरशाहानें गादीवरून हाकून दिल्यावर तो इराणांत पळून गेला असतां, व मोठ्या संकटांत व विपत्तींत असतां

त्याचा जन्म.

त्याचा पुत्र अकबर हा अमरकोट येथें जन्मला. हा राज्य करूं लागला तेव्हां फक्त तेरा वर्षांचा होता. यामुळें तो कांहीं वर्षेंपर्यंत बहिरामखान ह्मणून

एक सरदार होता, त्याच्या तंत्रानें चालत असे. यानें पुष्कळ वर्षेंपर्यंत फार उत्तम रीतीनें राज्य केलें. पूर्वी गेलेले प्रांत याच्या कारकीर्दीत पुनः परत मिळाले व कांहीं नवीन प्रांतही त्यानें काबीज केले. ते येणेंप्रमाणें:—

१५७३ गुजराथ प्रांतांतील दंगाधोपा नाहींसा झाला.

१५८६ काश्मीरचें राज्य प्रथमतःच काबीज केलें.

१५९२ सिंधप्रांत परत मिळविला.

१५९२ ओडिसा जिंकल्यामुळें सर्व बंगाल प्रांत हस्तगत झाला.

१५९४ कंदाहार प्रांत परत मिळविला.

१५९९ अहमदनगर घेतलें.

१६०१ खानदेश घेतला.

याप्रकारें बहुतकरून नर्मदा नदीपर्यंत सर्व प्रदेश त्याच्या अमलाखालीं आला. यानंतर दक्षिण जिंकण्याचा त्याचा उद्देश होता; परंतु तो दक्षिणेंत असतां त्याचा कृतघ्न मुलगा सेलीम ज्याला अजमीर येथें सुभेदार नेमिलें होतें त्यानें बंड केल्यामुळें त्याला तो बेत सोडून परत यावें लागलें. यानंतर लवकरच आपल्या मुलांच्या वाईट वर्तणुकीमुळें तो दुःखी अंतःकरणानें मेला ( १६०५ ).

त्याचा मुलगा सेलीम बंड करितो.

अकबराचा मृत्यु ( १६०५ ).

आजपावेतों ज्या मुसलमान बादशाहांनीं हिंदुस्थानांत राज्य केलें, त्या सर्वांपेक्षां अकबर चांगला होता. त्याच्या अंगीं उत्साह व चपलता

त्याची कारकीर्द.

त्याची न्यायी वर्तणूक.

हे गुण दिसून येतात. शीरशाहानें जी वसूल घेण्याची पद्धत सुरू केली होती, तींत अकबरानें सुधारणा केली. त्यानें निःपक्षपातानें हिंदु लोकांस वागवून त्यांस मोठमोठीं कामें सांगितलीं. अयोग्य कर माफ केले; न्यायखात्यांत चांगला बंदोबस्त केला; सती जाण्याची चाल मोडून टाकण्याविषयीं प्रयत्न केला; सारांश आपली प्रजा सुखी करण्याविषयीं त्याच्यानें जितका प्रयत्न करवला तितका त्यानें केला.

सेलीम गादीवर बसतो व 'जहांगीर' असा किताब घेतो. १६०५

अकबर बादशाहाच्या पाठीमागून त्याचा मुलगा सेलीम गादीवर बसला. यानें " जहांगीर" ह्मणजे जगाचा जिंकणारा अशी पदवी धारण केली. परंतु ही पदवी धारण करण्यासारखें त्यानें एकही महत् कृत्य केलें नाहीं. तो सुस्त व आळशी होता. हा बादशाहा राज्य करीत असतां खालीं लिहिल्याप्रमाणें एक चमत्कारिक गोष्ट घडून आली.

नरजहान.

जहांगीर यानें नूरजहान ह्मणून एक सुंदर व बुद्धिवान् स्त्री होती तिच्याशीं लग्न केलें. अकबर जिवंत असतां सेलीम याची ह्या स्त्रीवर प्रीति बसून त्याच्या मनांत तिच्याशीं लग्न करावें असें आलें होतें; परंतु अकबरास ही गोष्ट मान्य न झाल्यामुळें ती स्त्री एका मोठ्या पदवीच्या गृहस्थास दिली होती. तथापि जेव्हां सेलीम राज्य करूं लागला, तेव्हां त्यानें आपला मनोरथ सिद्धीस नेण्याचा निश्चय केला. त्यानें असें केलें कीं, नूरजहान् हिच्या नवऱ्यास ठार मारवून

तिला जनानखान्यांत आणून ठेविलें. परंतु मग त्याची प्रीति तिजवरून उडाली. ती तशीच तेथें होती. तो तिजकडे अगदीं लक्ष देत नसे. तथापि पुढें असें झालें कीं, नूरजहान हिनें पुनः बादशाहाची प्रीति संपादिली. नंतर बादशाहानें तिशीं लग्न लाविलें, आणि तीस पट्टराणी करून ठेविलें. नंतर तो मरेपर्यंत बहूतकरून तिच्याच बोलण्याप्रमाणें चालत होता.

जहांगीर तिला आपली पट्टराणी करितो.

जहांगीर याच्या मुलांपैकीं शहाजहान फार बेफाम होता. त्यानें राज्यांत बंडावा केला. तसेंच त्याच्या सरदारांपैकीं मोहबतखान यानेंही त्याजविरुद्ध बंड करून त्याला कैद केलें. तो कैदेंतून मुक्त झाला; परंतु थोड्याच दिवसांनीं मरण पावला ( १६२७ ).

त्याचीं संकटें.

त्याचा मृत्यु १६२७.

त्याचा बंडखोर मुलगा शहाजहान हा त्याच्या मागून बादशाहा झाला. त्यानें काबूल व दक्षिण येथें लढाया इ. स. १६२७ सांत चालविल्या आणि त्यांत त्यास जयही मिळाला. ह्या बादशाहाच्या हातून एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट घडून आली ती अशीः—

शहाजहान गादीवर बसतो १६२७.

ही वेळपर्यंत दिल्लीचे तक्तावर जे बादशाह बसले त्यांची अशी चाल होती कीं, ते आपल्याघराण्यांतील पुरुषांस राज्यांतील मोठमोठे अधिकार देत नसत. ही चाल शहाजहान यानें मोडली. त्यानें आपल्या मुलांस चांगले रीतीनें वागवून त्यांस मोठमोठ्या अधिकारांचीं कामें सांगितलीं. यास दारा, सुजा, औरंगजेब आणि

आपल्या मुलांस मोठमोठीं कामें देतो

त्याचे मुलगे.

दारा, सुजा, औरंगजेब, आणि मुराद.

मुराद असे चार मुलगे होते. या चौघांचेही स्वभाव निरनिराळ्या तऱ्हेचे होते. दारा हा मोठा रागीट असे; सुजा हा विषयी होता; औरंगजेब कपटी, दक्ष, व धूर्त असा होता; मुराद अगदीं मूर्ख व स्वच्छंदी होता.

औरंगजेब (पहिला अलमगीर) गादी बळकावितो १६६६.

कपटानें व बळाच्या जोरावर औरंगजेबानें आपल्या सर्व भावांस आपल्या कबज्यांत आणिलें. नंतर सर्वांस मारून आणि आपल्या बापास पदच्युत करून आपण इ. स. १६६६ यावर्षी बादशाहा झाला.

त्याचें राज्य व वसूल.

हा बादशाहा पराक्रमी परंतु अविवेकी होता. याच्या कारकिर्दीत मोंगल राज्य वैभव व अधिकार यांच्या शिखरांस पोंचलें. त्यानें सिंधु नदीपासून केप कामोरिनपर्यंत आपला अंमल बसविला. त्याच्या राज्याचा वसूल बत्तीस कोटी रुपयांचा होता.

मराठ्यांची उत्पत्ति व मूलस्थान.

यावेळेच्या सुमारास मराठे लोक उदयास आले. त्यांनीं औरंगजेबास जसा त्रास दिला तसा दुसऱ्या कोणत्याही लोकांनीं दिला नाहीं. हे लोक सह्याद्रि व विंध्याद्रि पर्वतांतील राहणारे होते. यांचा पुढारी व मराठ्याचें राज्य स्थापनकर्ता शिवाजी हा होता.

शिवाजीचा जन्म १६२७.

हा पुणें प्रांतांत जुन्नराजवळील शिवनेरी किल्ल्यांत जन्मला. त्याचें उपनांव भोसले होतें. तो उदेपूरच्या राण्याचा वंशज होता. रजपूत लोकांशीं आपला संबंध आहे, या गोष्टीचा तो फार अभिमान बाळगीत असे.

शिवाजी राजाचा उत्कर्ष.

त्यानें आपली सत्ता प्रथमतः लहान लहान चोंकलें करून वाढविण्यास हिच्या नवऱ्यास ठार मारवून

कीं, सर्व डोंगरी किल्ले आणि पुष्कळ मुलूख त्याच्या ताब्यांत आला. पुण्याजवळ सिंहगड येथें मोंगल लोकांनीं त्यास वेढिलें. यामुळें त्यास अर्धे डोंगरी किल्ले मोंगलांस द्यावे लागले. पुढें तो लौकरच मोंगल लोकांच्या अधिकारापासून स्वतंत्र झाला. त्यानें विजापूर आणि गोंवळकोंडे येथील राजांस चौथाई देण्याचें अगत्य पाडिलें. चौथाई ह्मणजे कोणत्याही देशाच्या वसुलाचा चौथा भाग. ही बाब सर्व जिंकिलेल्या राजांपासून मराठे लोक घेत असत. इ. स. १६७४ त त्याला मोठ्या थाटमाटानें रायगड येथें राज्याभिषेक झाला. तो इ. स. १६८० त मरण पावला. त्याला त्याच्या बायकोनें विष देऊन मारला असें कोणी ह्मणतात. कोणी तो गुडघी होऊन मरण पावला असेंही ह्मणतात. मरणकाळीं त्याचें वय ५३ वर्षांचें होतें.

चौथाई.

त्याचा राज्याभिषेक इ० स० १६७४.

त्याचा मृत्यु इ.स. १६८०.

रजपूत लोकांचेंही औरंजेबाशीं वैर होतें. ह्याचें कारण तो त्यांना पूर्वीच्या बादशाहांप्रमाणें ममताळूपणें व वजनदारीनें वागवीत नसे. औरंगजेब हा फार धर्मवेडा होता. आपला धर्म त्यांनीं स्वीकारावा, ह्मणून तो त्यांजवर जुलूम करूं लागला. तो जिवंत असे तोंपर्यंत त्याच्यानें त्यांनां आपल्या अमलाखालीं आणवलें नाहीं. त्याच्यामागून झालेल्या बादशाहांस लढाईच्या प्रसंगीं व संकटसमयीं त्यांनीं पूर्वीप्रमाणें मदत केली नाहीं. यामुळें त्याच्यामागून त्याचें राज्य गेलें. यास दारा, सुजा, आरंग

औरंगजेबाचा धर्माबद्दल जुलूम.



१६२०७

औरंगजेबाचे राज्याची वृद्धि.

या वेळेस दक्षिणेंत गोवळकोंडें, विजापूर, आणि अहमदनगर हीं तीन राज्यें होतीं. तीं औरंगजेबानें बुडवून टाकिलीं. त्यानें विजापूर, गोवळकोंडें आणि अहमदनगर येथील बळकट डोंगरी किल्ले घेतले. शिवाजीचा मुलगा संभाजी यास धरून तुळापूर येथें ठार मारिलें. या प्रकारें त्यास दक्षिणेंत जिकडे तिकडे जय मिळत गेला; तथापि मराठे लोकांना त्याच्यानें कधीं जिंकवलें नाहीं. शेवटीं कांहीं कारणानें त्यास अहमदनगरास जावें लागलें. तेथें तो इ० स० १७०७ त मरण पावला. त्यावेळीं त्याचें वय ८९ वर्षांचें होतें. त्यानें ५० वर्षें राज्य केलें.

शिवाजीचा मुलगा संभाजी याचा मृत्यु इ. स. १६८९.

औरंगजेबाचा मृत्यु इ.स. १७०७

या वेळची राज्यव्यवस्था.

या वेळच्या सुमारास राज्यकारभार पुढें लिहिलेल्या रीतीनें चालत असे. मोंगल बादशाहा हे सर्वांत मुख्य, ते बहुतकरून दिल्ली येथें राहत असत. त्यांच्या हाताखालीं मदतीस दिवाणी व मुलकी कामगार असत आणि संपूर्ण सैन्याचा अधिकारही त्यांच्याच हातीं असे.

राज्याचे विभाग.

या अफाट राज्याचे हिंदुस्थान, दक्षिण आणि दक्षिण हिंदुस्थान असे तीन मोठे विभाग केले होते. ह्या प्रत्येक विभागावर एकेक सुभेदार असे. याचाही अधिकार बहुतेक गोष्टींत बादशाहाप्रमाणेंच असे.

पोट विभाग आणि त्यांवरचे अमलदार.

या विभागाचे आणखी लहान लहान पोट विभाग केले होते. त्यांजवर नबाब अधिकार चालवीत. प्रत्येक सुभेदार व नबाब यांच्या हाताखालीं दिवाणी व मुलकी कामदार असत.

सुभेदार व नबाब यांस तरवार धारण करण्याचा अधिकार असे. या ऊमगारांच्या अधिकाराखालीं जे प्रांत नसत व जे लोक मुसलमानी धर्म स्वीकारण्यास राजी नसत, त्यांना मोंगल बादशाहांस चौथाई द्यावी लागत असे. जोंपर्यंत हा कर नियमानें त्यांजकडून पोंचत असे तोंपर्यंत त्यांना त्यांजपासून कांहीं उपद्रव होत नसे आणि ते त्यांना आपआपल्या वाडवडिलांच्या रीतीप्रमाणें राज्यकारभार चालवूं देत असत. परंतु या निरनिराळ्या ठिकाणीं नेमिलेल्या अधिकाऱ्यांवर जसा दाब असावा तसा नसल्यामुळें राज्यांत जिकडे तिकडे अव्यवस्था झाली. औरंगजेबाचे वेळीं राष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत अधिकार चालविण्याकरितां जे अधिकारी नेमिले होते, ते दिल्ली येथील बादशाहांपेक्षां प्रबळ झाले. अशा प्रकारची ज्या राज्याची स्थिति असते, तें राज्य फार दिवस एकसारखें सुरळीतपणें चालण्याचा संभव तर नाहींच; परंतु घडोघडी मोडण्याचें भय असतें. औरंगजेबाचे मरणानंतर जे दुर्बळ बादशाहा गादीवर बसले त्यांच्या अंगीं गादी संरक्षण करण्याचें सामर्थ्य नव्हतें. राज्यामध्यें आपआपसांत एकसारख्या लढाया होऊं लागल्या, त्यांत एका पाठीमागून एक असे प्रांत मोंगल राज्यापासून निराळे होऊं लागले. यामुळें औरंगजेबाचे मागून जे बादशाहा गादीवर बसले, ते नांवाचे मात्र बादशाहा होते.

या राज्याचा मोड.

राज्यस्थिति.

नादिरशाहा याचें मूलस्थान व त्याचें आगमन इ. स. १७३८.

अशा प्रसंगीं इराणचा बादशाहा नादिरशाहा यानें औरंगजेबाचे वंशजांपैकीं महमदशाहा बादशाहा राज्य करीत असतां हिंदुस्थानावर सुमारें इ० स० १७३८ सांत स्वारी केली. ही गोष्ट मोंगल राज्याच्या अपकर्षास विशेष कारणीभूत झाली. नादिरशाहा हा प्रथमतः एक लुटारू सरदार होता. त्यानें इराणची गादी बळकावली. आणि मग तैमूरलंगाप्रमाणें मोंगल राज्यावर हल्ला केला.

त्याची स्वारी व तिचा परिणाम.

त्यानें दिल्ली शहर आपल्या हस्तगत करून घेतलें. व अजमासें तीन हजार लोकांचीं डोकीं उडविलीं. शहर लुटून आणि पुष्कळ संपत्ति घेऊन तो इराण देशास परत गेला.

मोंगल राज्यापासून झालेलीं स्वतंत्र राज्यें.

ह्या स्वारीनंतर खालीं लिहिलेल्या ठिकाणीं मोंगल राज्यापासून स्वतंत्र राज्यें उत्पन्न झालीं.

दक्षिणेंत निजामानें स्वतंत्र राज्य स्थापिलें. पंजाब प्रांत शीख लोकांनीं घेतला.

मराठ्यांचें राज्य पेशव्यांच्या अमलाखालीं पूर्वीप्रमाणेंच चाललें होतें.

बंगाल आणि अयोध्या येथील नबाबही स्वतंत्रपणें अधिकार चालवूं लागले.

औरंगजेबाचे मरणानंतर दिल्लीचे गादीवर जे बादशाहा बसले ते येणें प्रमाणें. हे बादशाहा केवळ नांवाचें मात्र होते, असें वर सांगितलेंच आहे.

**पहिला शहाअल्लम–१७०७–१७१२ यानें शाहुराजास मोठे अधिकार दिले.**

जहांदरशाहा–१७१२–१७१३ याचे राज्यांत याचा व झुल्फिखारखानाचा खून.

फरूकशीर–१७१३–१७१९ या बादशाहाचा खून झाला.

रफीउद्दरजात. } १७१९–१७१९ } सय्यदांचे
रफीउद्दौला. } फेब्रुआरी–मे } तंत्रानें चालणारे, यांस विषप्रयोग करून तीन चार महिन्यांत मारिलें.

महमदशाह–१७१९–१७४८ नादिरशाहाची स्वारी १७३८. राज्याचा मोड.

अहमदशाहा–१७४८–१७५४ याचे डोळे काढिले व यास लवकरच गादीवरून हांकून दिलें.

दुसरा अलमगीर–१७५४–१७५९ प्लासीची लढाई. या राजाचा खून.

दुसरा शहाअल्लम–१७५९–१८०६ लार्ड लेक यानें मदत देऊन यास मराठ्यांचे बंदींतून मुक्त केलें.

दुसरा अकबर–१८०६–१८३७ हा राजा केवळ पेनशनदार होता.

महमदबहादर–१८३७–१८५७ हा राजा १८५७ सालचे बंडांत सामील असल्यामुळें इंग्लिशांनीं त्याला पदच्युत करून ब्रह्मदेशांत रंगून येथें कैद करून ठेविलें. त्याचे दोन मुलांस क्यापटन हाडसन या नांवाचे इंग्रज सरदारानें गोळी घालून ठार मारिलें. ब्रिटिश राज्यास दिल्लीचे राज्य जोडिलें. याप्रमाणें १५२६ सांत मोंगल घरा-

ण्याची स्थापना बाबर यानें केली, तें घराणें १८५७ सालीं अजीबात नाहींसें झालें.

## भाग १४.

## हिंदुस्थानांतील युरोपियन लोकांच्या वसाहती.

### पोर्तुगीज लोक.

प्राचीन काळीं हिंदुस्थान व युरोप खंडांतील देश यांजमध्यें पंधराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत दोन मार्गांनीं व्यापार चालत असे. एक मार्ग मध्य आशियांतून होता; व दुसरा अरबस्थानांतील व्यापारी हिंदुस्थानांतील जिन्नस इराणी आखात आणि तांबडा समुद्र यांतून नेत असत, तेथून कारवान लोक इजिप्त आणि सिरिआ एथें नेत, आणि तेथून युरोपांतील व्यापारी युरोपांत घेऊन जात असत. यांत जिनोआ आणि व्हेनीस येथील लोक मुख्य होते.

(प्राचीन काळीं हिंदुस्थान व युरोप यांमधील व्यापार.)

(जिनोआ आणि व्हेनीस( इटाली ).)

पोर्तुगाल येथील राजाचे पदरचा कप्तान बार्थोलेमो डाएझ हा प्रथमतः थेट जलमार्गानें हिंदुस्थानास यावयास निघाला. हा आफ्रिकेच्या दक्षिण टोंकापर्यंत मात्र आला. यानें प्रथमतः त्या टोंकास तेथें तो वादळांत सांपडल्यामुळें केफ आफ् स्टार्मस (वादळाचें भूशिर) असें नांव दिलें; परंतु आपणांस या शोधापासून हिंदुस्थानाचा मार्ग सांपडेल अशी आशा पोर्तुगाल देशाचे राजाचे मनांत उत्पन्न होऊन त्यानें त्यास केप आफ गुड होप (चांगल्या आशेचें भूशिर) असें नांव दिलें.

(केप आफ गुड होपचा शोध इ. स. १४८७.)

(वासकोडी गामा कालिकत येथें येतो इ.स.१४९७)

नंतर पोर्तुगालच्या राजानें वासकेडी गामायास हिंदुस्थानांत पाठविलें. त्यानें त्या भूशिरास वळसा

घालून मलबार किनाऱ्यावरील कालिकत्त बंदरांत प्रवेश केला आणि एतद्देशीय राजांबरोबर व्यापार आरंभिला.

पोर्तुगाल येथील आरमाराचा अधिकारी केब्राल हा हिंदुस्थानास येण्यास निघाला असतां वादळांत सांपडून पश्चिमेकडे गेला. यामुळें त्याला दक्षिण अमेरिकेंतील ब्राझिल देशाचा शोध लागला. नंतर तेथून तो कालिकत्त येथें आला. या ठिकाणीं त्यानें एक वखार बांधिली; परंतु एतद्देशीय लोकांनीं तिचा नाश केला, यामुळें त्यास कोचीन येथें जावें लागलें.

ब्राझिल देशाचा शोध इ. स. १५००.

वासको डी गामा जेव्हां दुसऱ्यानें हिंदुस्थानांत आला तेव्हां त्यास कोचीन आणि क्यानानोर ह्या जागा व्यापाराकरितां पसंत वाटल्या.

वासको डी गामा याची दुसरी खेप इ.स.१५१०.

आलफान्सो आलबुकर्क यास पोर्तुगालच्या राजानें हिंदुस्थानचा प्रतिनिधि नेमिलें. व पोर्तुगीज़ लोकांच्या हिंदुस्थानांतील सर्व वसाहती त्याच्या अधिकाराखालीं आल्या. कालिकत्त येथून हाकून लाविल्यावर त्यानें पश्चिम किनाऱ्यावरील गोवें शहर घेतलें. तें हिंदुस्थानांतील पोर्तुगालच्या राज्याची राजधानी झालें व तें अजूनही त्यांजकडेस आहे.यानंतर त्यानें मलाया द्वीपकल्पांतील मलाका आणि इराणी आखातांतील हुर्मुझ हीं घेतलीं.

आलफान्सो आलबुकर्क यानें गोवें शहर घेतलें १५१०.

आलफान्सो आलबुकर्क इ. स. १५१५ त मेला आणि त्याच्या मरणानंतर पोर्तुगालच्या लोकांची सत्ता हिंदुस्थानांत फारशी वाढली नाहीं. परंतु हिंदीमहासागरांत त्यांच्या आरमाराचें

आलबुकर्क याचा मृत्यु.१५१५.

वर्चस्व होतें आणि युरोप खंडाशीं त्यांनींच व्यापार चालविला होता.

## डच लोक ( हालंडचे राहणारे. )

सोळाव्या शतकाच्या अखेरीस डच लोक मसाल्याचीं बेटें व हिंदीमहासागरांतील इतर बेटें यांशीं प्रथमतः व्यापार करूं लागले, नंतर त्यांच्या पूर्वेकडील वसाहतींची राजधानी बटेव्हिआ हें शहर जावा बेटाच्या उत्तर किनाऱ्यावर बांधिलें. नंतर त्यांना निगापट्टण, पुलिकत्त, चिनसुरा, आणि दुसरीं लहान लहान ठिकाणें क्रमाक्रमानें मिळालीं.

निगापट्टण (कावेरी नदीच्या मुखा जवळ.)

पुलिकत्त. (मद्रासच्या उत्तरेस २३ मैलांवर.)

चिनसुरा (कलकत्या पासन १८ मैलांवर.)

## इंग्लिश लोक.

सुमारें सोळाव्या शतकाच्या मध्य भागीं इंग्लिश व्यापाऱ्यांनीं प्रथमतः जावा बेटांत ब्यांडुम आणि नंतर हिंदुस्थानांत सुरत आणि मछलीपट्टण एथें लहान वखारी स्थापिल्या.

इ. स. १६०० यावर्षीं हे सर्व इंग्लिश व्यापारी एकत्र होऊन त्यांनीं एक मंडळी स्थापिली. त्यांना एलिजाबेथ् राणीकडून पूर्वेकडील देशाशीं व्यापार करण्याच्या हक्काची सनद मिळाली.

मद्रास येथील किल्ला बांधिला १६३९

चंद्रगिरि ( मद्रासच्या वायव्यदिशेस ८० मैलांवर आहे. )

चंद्रगिरीच्या राजाच्या परवानगीनें इ. स. १६३९सांत त्यांनीं फोर्ट सेन्ट जार्ज या नांवाचा मद्रास येथें एक किल्ला बांधिला.

कंपनीस मुंबई बेट मिळालें इ. स. १६६८.

पोर्तुगालच्या राजाची कन्या क्याथराईन् हिच्या आंदणामध्यें इंग्लद देशाचे दुसऱ्या चार्लेस राजास इ. स. १६६१ त मिळालेलें मुंबई बेट हें सदरहू कंपनीस इ. स. १६६८या वर्षीं मिळालें.

कडलुराजवळ टेंग्नापट्टण येथें फोर्ट सेन्ट डेव्हिड या नांवाचा किल्ला त्यांनीं बांधिला. हें शहर कंपनीनें विकत घेतलें.[1]

फोर्ट सेन्ट डेव्हिड इ० स० १६९१.

कलकत्ता येथें हुगली नदीच्या कांठीं कंपनीनें विकत घेतलेल्या तीन मैल लांब व एक मैल रुंद अशा लहानशा जाग्यावर फोर्ट उइलियम् या नांवाचा किल्ला बांधिला.

फोर्ट उइलियम किल्ला बांधिला इ.स. १७००.

पहिल्या चार्लस राजाला पैशाची जरूर लागल्यामुळें त्यानें सर उइलियम कोर्टिअर याजपासून कांहीं पैसा घेऊन ज्या ठिकाणीं कंपनीचीं ठाणीं नसतील त्या ठिकाणीं त्यास व्यापार करण्यास परवानगी दिली.

सर उइलियम कोर्टिअर इ० स० १६३५.

तिसरा उइलियम ह्यानें २० लक्ष पौंड घेऊन दुसऱ्या एका कंपनीला पूर्वींच्या व्यापाऱ्यांस दिलेल्या सनदेप्रमाणेंच अधिकार व हक्क देऊन एक सनद दिली. या कंपनीला प्रतिस्पर्धी कंपनी असें ह्मणत असत आणि त्यांतील लोकांना आगंतुक असें ह्मणत असत.

दुसऱ्या एका सनदेनें या दोन कंपन्या एकत्र झाल्या. या एकत्र झालेल्या कंपनीस "**धि युनायटेड ईस्ट इंडिया कंपनी**" असें ह्मणूं लागले.

या दोन कंपन्या एकत्र होतात इ. स. १७०८.

### फ्रेंच.

सतराव्या शतकाच्या मध्यभागीं फ्रेंच लोकही हिंदुस्थानाशीं व्यापार करूं लागले. सुरत येथें त्यांचा पराभव झाल्यावर त्यांना पांडिचरी, पश्चिम किनाऱ्यावरील माही आणि कलकत्त्याजवळील चंद्रनगर हीं ठाणीं मिळालीं.

माही (कालिकत जवळ).
चंद्रन[illegible]
लकत्याच[illegible]
रेल १६ मै[illegible]

वरील वृत्तांतावरून असें दिसून येईल कीं अठराव्या शतकांत हिंदुस्थानांत पोर्तुगीज, इंग्लिश, डच आणि फ्रेंच हे चार लोक व्यापाराच्या कामांत प्रतिस्पर्धी होते. या देशाचें आधिपत्य इंग्लिश लोकांकडे येईपर्यंत या सर्वांमध्यें श्रेष्ठत्व मिळविण्याबद्दल लढाया चालल्या होत्या. कधीं कधीं त्यांच्या हातून मोठीं क्रूर कर्में होत असत. याचा दाखला ईस्ट इंडिया कंपनी आणि हालंड यांमध्यें तह झाला असतांही डच लोकांच्या शिबंदीनें आंबायना बेटांत अठरा इंग्लिश लोक व त्यांचे चाकर यांस निर्दयपणानें ठार मारिलें.

आंबायना येथील कत्तल इ.स. १६२३.

## भाग १५ वा.

## कर्नाटकांतील पहिली लढाई.

### १७४४–५४ पर्यंत.

इंग्लंड व फ्रान्स यांच्यामध्यें युरोपांत लढाई सुरू होते इ० स० १७४४.

जेव्हां युरोपांत फ्रान्स व इंग्लंड या दोन राष्ट्रांमध्यें लढाई सुरू झाली, ते वेळेस या देशांत दोन्ही लोकांच्या मोठमोठ्या वसाहती होत्या; तेव्हां अर्थांतच या देशांत त्या दोन्ही लोकांत लढाया सुरू झाल्या.

डुप्ले.

डुप्ले हा फ्रेंच लोकांचा पांडिचरी येथें सुभेदार होता. हा इंग्लिशांचा फार द्वेष करीत असे. याचा संकेत हिंदुस्थानांतून इंग्लिश लोकांस हाकून देऊन हा देश काबीज करावा असा होता.

[illegible] दिग्रेस [illegible] वर आहे. कंप[illegible] बेट [illegible] १६[illegible]

लाबरदानोर्स हा फोर्त सेन्ट जार्ज घेतो इ. स. १७४६.

लाबरदोनीस हा बोर्बोन व आईल आफ् फ्रान्स येथें फ्रेंचांचा सुभेदार होता. तो फ्रेंच सरकारच्या हुकमानें आरमार घेऊन हिंदुस्थानांत आला आणि त्यानें फोर्त सेन्ट जार्ज किल्ला घेतला. त्यावेळीं हा किल्ला इंग्लिश लोकांचें कर्नाटकांतील मुख्य वसाहतीचें ठाणें होतें.

लाबरदोनीस परत जातो.

लाबरदोनीस यानें इंग्लिश लोकांस असें वचन दिलें कीं, थोडीशी खंडणी घेऊन तुमचें ठाणें तुह्मांस परत देऊं. परंतु डुप्ली याच्या मनास ही गोष्ट आली नाहीं. यामुळें त्या उभयतांचा बेबनाव होऊन लाबरदोनीस मारिशस बेटास परत गेला.

कांहीं वेळपर्यंत इंग्लिश व फ्रेंच यांमधील युद्ध बंद होतें. एलाशापेल (जर्मनींत).

यानंतर डुप्लीनें फोर्त सेंट डेव्हिड या किल्ल्यावर हल्ला केला; परंतु तो त्याच्यानें घेववला नाहीं. इतक्यांत युरोपखंडांत "एलाशापेल" येथें तह झाला. त्याच्या योगेंकरून इंग्लंड व फ्रान्स या दोन देशांमध्यें एकी होऊन कांहीं वेळपर्यंत दोन्ही देशांतील युद्ध बंद झालें.

तंजावरच्या राजापासून इंग्लिशांस देवीकोट किल्ला मिळाला. देवीकोट पांडिचेरीच्या दक्षिणेस ३६ मैलांवर.

तंजावर येथें या वेळेच्या सुमारास शाहुजी या नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याला त्याचा भाऊ प्रतापसिंह यानें इ. स. १७४९ सांत पदच्युत करून आपण गादी बळकाविली. शाहुजीनें इंग्लिशांशीं असा करार केला कीं, तुह्मी जर मला साहाय्य करून पुनः गादीवर बसवाल, तर मी घेतलेला देवीकोटचा किल्ला बक्षीस देईन. परंतु भयानें जागा सोडून इंग्लिशांस देऊं नकोस त्याला कांहीं प्रतिबंध नाहीं तुह्मी शाहुजीस

साहाय्य करूं नये. यामुळें इंग्लिशांनीं शाहुजीचा पक्ष सोडिला.

हैदराबाद आणि अर्काट येथील गाद्यांविषयीं तंटे इ. स. १७५०.

इ. स. १७५० सांत निजामाची राजधानी हैदराबाद आणि कर्नाटकाची राजधानी अर्काट येथील गाद्यांविषयीं लढाई सुरू झाली. हैदराबाद येथील निजाम उल्मुलुख हा इ. स. १७४८ सांत मरण पावला. त्याच्यामागून हैदराबाद येथील गादीवर नासिरजंग हा बसला. त्याला मुजफरजंग हा प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला. अर्काट येथील गादीवर अनुवरुद्दीन बसला. त्याचा चंदासाहेब प्रतिस्पर्धी झाला.

नासिरजंग. मुजफरजंग.

अनुवरुद्दीन.

चंदासाहेब.

हे दोन प्रति स्पर्धी एकत्र होतात.

हे दोन्ही प्रतिस्पर्धी एकमत झाले आणि त्यांनीं आपल्या पक्षाकडील सैन्यें एकत्र मिळविलीं. त्यांना फ्रेंच लोकांचा सेनापति बुशी यानें मदत केली. यामुळें त्यांनीं आपल्या शत्रूंवर हल्ला केला.

बुशी त्यांस मदत करितो.

अनुवरुद्दीन याचा परिणाम.

या लढाईमध्यें अनुवरुद्दीन मारला गेला. व त्याचा मुलगा महमद अली हा त्रिचनापलीस पळून गेला.

नासिरजंगाचा परिणाम.

नासिरजंग याचाही त्याच्याच छावणीमध्यें कोणी एकानें खून केला.

चंदा साहेब कर्नाटकचा नबाब होतो व सलाबतजंग हैदराबादच्या गादीवर बसतो.

यामुळें बुशी यानें चंदा साहेबास कर्नाटकचा नबाब केलें व मुजफरजंग यास हैदराबादच्या गादीवर बसविलें; परंतु तो लवकरच मारला गेल्यामुळें [illegible]सिरजंगाचा भा[illegible]लाबतजंग यास हैदराबाद[illegible]न देऊन [illegible] [illegible]शी याचा भरभराटीचा सम[illegible] [illegible]आणि

बाब यांस अधिकार मिळण्यास तोच कारणीभूत होता. यामुळें त्यांनीं त्याला दक्षिण हिंदुस्थानचा सुभेदार केलें.

चंदासाहेब त्रिचिनापल्लीवर हल्ला करितो.

यानंतर फ्रेंच सैन्यासह चंदासाहेबानें महमद अल्ली याजवर त्रिचिनापल्ली येथें हल्ला केला आणि त्याला फार जर्जर करून सोडिलें. महमद अल्लीचा पक्ष इंग्लिश लोकांनीं स्वीकारिला होता. अशा वेळेस इंग्लिश लोकांचा कपतान क्लैव हा पुढें आला आणि त्याच्यामुळें लढाईचें मान फिरलें.

क्लैव.

क्लैव साहेब प्रथमतः मुलकी खात्यांतिल एक साधारण मतीचा कारकून होता; परंतु त्याचा स्वभाव धीट आणि साहसी असल्यामुळें तें खातें सोडून तो लष्करी खात्यांत शिरला.

क्लैव साहेब अर्कोटावर हल्ला करण्याचा बेत सुचवितो व त्याप्रमाणें करितो इ. स. १७५१.

यावेळीं तो फोर्ट सेन्ट डेव्हिड येथें होता. त्यानें तेथील इंग्लिश कौन्सिलदारांस या प्रसंगीं असें सुचविलें कीं, कर्नाटकच्या नबाबाची राजधानी अर्काट इजवर हल्ला करावा. हा बेत सर्वांस पसंत पडला, व क्लैव साहेब दोनशें इंग्लिश लोक व तीनशें काळे लोक बरोबर घेऊन निघाला. तो मोठ्या त्वरेनें अर्कोट येथें गेला. त्यावेळीं तुफान सुटलें होतें, तथापि तो तसाच पुढें चालला. पावसाची धार लागली आहे, विजा चमकत आहेत व मेघ गर्जना होत आहेत अशांतून एक सारखी त्यानें चाल केली आणि अर्[illegible]ट शहर एकदम घेतलें. तेथें जरी अर्[illegible] लशांक होते तरी ते भयानें जागा सोडून [illegible] गेल्यादेऊ [illegible] त्याला कांहीं प्रतिबंध झाला नाहीं.

चंदासाहेब आपला मुलगा राजासाहेब यास अर्कोट येथें पाठवितो.

हें वर्तमान जेव्हां चंदासाहेबास समजलें तेव्हां त्यानें आपली राजधानी परत मिळविण्याकरितां दहा हजार लोकांसह आपला मुलगा राजासाहेब यास एकदम तिकडे पाठविलें. परंतु क्लैव साहेब यानें आपल्या एकनिष्ठ व शूर अशा थोड्या शिपायांसह सात आठवडेपर्यंत त्याचें कांहीं चालूं दिलें नाहीं. त्यांनीं शेवटचा जो निकराचा हल्ला केला तो त्यानें मागें हटविला.

अर्नी (मद्रासचे नैर्ऋत्येस ७४ मैलांवर) येथील लढाई इ. स. १७५१.

नंतर क्लैव साहेब यास मदत येऊन मिळतांच त्यानें शत्रूचा पाठलाग केला आणि अर्नी येथें लढाई करून त्याचा अगदीं पराभव करून टाकिला. नंतर त्यानें फ्रेंच लोकांपासून कांजिवेरम् घेतलें, आणि तो फोर्ट सेन्ट डेव्हिड येथें परत आला. क्लैव साहेबाचा हेतु सिद्धीस गेला. त्रिचनापल्ली येथील वेढ्याचा जोर कमी होत चालला आणि महमद अली यास सर्वांनीं कर्नाटकचा नबाब असें कबूल केलें.

क्लैव याचा जय. सेरिंगम् इंग्लिश लोकांनीं घेतलें इ. स. १७५२. हें त्रिचनापल्ली पासून एक गोळीच्या टप्प्यावर एक लहान बेट आहे.

नंतर पुढले वर्षीं मेजर लारेन्स आणि क्लैव हे महमद अलीस येऊन मिळाले. यांना म्हैसूर येथून १४००० लोक आणि तंजावर येथून सहा हजार मराठे, असे एकंदर वीस हजार लोक येऊन मिळाले होते. अशा प्रकारचें सैन्य पाहून फ्रेंच लोकांनीं त्रिचनापल्ली सोडिली आणि सेरिंगम् येथील तटबंदी देवालयांत गेले. परंतु थोड्याच आठवड्यांनीं त्यांस शत्रूंच्या स्वाधीन व्हावें लागलें.

चंदासाहेबाचा

चंदासाहेबास त्याच्या लोकांनीं सोडिलें.

यासाठीं तो तंजावर येथील लोकांच्या स्वाधीन झाला. त्याला त्यांनीं विश्वासघातानें ठार मारिलें.

परिणाम इ. स. १७५२.

क्लैव साहिब यानें मद्रासच्या दक्षिणेस बावीस मैलांवर कव्हेलांग आणि कव्हेलांगच्या दक्षिणेस चिंगलीपट येथील किल्ले घेतले आणि नंतर तो इंग्लंडास परत गेला.

क्लैवसाहेब इंग्लंडास परत जातो इ. स. १७५४.

डुप्ली यास फ्रेंच सरकारानें इ. स. १७५४ त परत बोलाविलें आणि त्याचा छळ करून त्याची अप्रतिष्ठा केली. हिंदुस्थानांतील फ्रेंच लोकांची सत्ता व अधिकार कमी झाल्यामुळें, त्यांचा नवीन नेमलेला गव्हरनर गोधू यानें इंग्लिशांशीं फार अनुकूळ असा तह केला.

डुप्लीचा परिणाम इ. स. १७५२.

---

# भाग १६ वा.

## बंगाल्यांतील पहिली लढाई.

बंगाल, बहार आणि ओरिसा या प्रांतांचा नबाब अलिवर्दीखान हा इ. स. १७५६ त मरण पावला. त्याच्या पाठीमागून त्याचा नातू सुराजउद्दवला हा गादीवर बसला. त्याच्या मनामध्यें इंग्लिश लोकांविषयीं अतिशय द्वेषभाव होता. यावेळीं इंग्लिश लोक फोर्ट उइलियम् किल्याची दागदुजी करीत होते. त्यांस त्यानें ती करण्याविषयीं मनाई केली. परंतु इंग्लिशांनीं ती न जुमानून दागदुजी चालविल्यामुळें त्यानें पुष्कळ सैन्यासह त्यांजवर हल्ला केला. त्यावे-

अलीवर्दीनखान.

सुराजउद्दवला नबाब होतो. इंग्लिश लोकांविषयीं त्याच्या मनांतील द्वेष.

तो इंग्लिशांव-

र हल्ला करितो.

ळीं त्या किल्ल्यांतील सर्व लोक जहाजांतून पळून गेले. फक्त एकशेंनव्वद लोक मात्र धैर्य धरून त्या किल्ल्याचें संरक्षण करण्यास राहिले. त्यांचा मुख्य, मुलकी खात्यांतील हालवेल नामें एक गृहस्थ होता. सुराजउद्दवल्याचे सैन्यानें तीन दिवसांत तो किल्ला घेतला. त्यांतील १४६ लोक या लोकांचे हातीं सांपडले. त्या सर्वांस त्यांनीं अठरा फूट लांब व चौदा फूट रुंद अशा एका खोलींत रात्रभर कोंडून ठेविलें. त्यामुळें कोंडून ठेवलेल्या लोकांस अंगावर कांटा उभा राहण्यासारखीं दुःखें सोसावीं लागलीं. दुसरे दिवशीं सकाळीं त्यांपैकीं तेवीस लोक मात्र जिवंत निघाले. ज्या ठिकाणीं हे गोरे लोक कोंडून ठेविले होते त्यास ब्ल्याक होल(कोंडमारा) असें ह्मणतात.

ब्ल्याकहोल (कोंडमारा) इ. स. १७५६.

असा प्रकार चालला असतां क्लैव साहेब ले. फ्टेनेंट जनरल् होऊन इंग्लंडाहून परत आला. येते वेळीं त्यानें गिर्या येथील किल्ला घेतला. आणि त्याचा नाश करून टाकिला. हा किल्ला मराठे यांचे लोकांचा अधिकारी तुळाजी आंग्रे याचें पश्चिम किनाऱ्यावरील मुख्य ठाणें होतें. हा इंग्लिश जहाजांस फार उपद्रव देत असे. इतक्यांत ब्ल्याक् होलचा सूड घेण्याकरितां कलकत्त्यास जाण्याविषयीं क्लैव साहेबास मद्रास सरकारचा हुकूम झाला.

क्लैव साहेब इंग्लंडाहून परत येतो व वाटेंत गिर्या किल्ला ( पश्चिम किनाऱ्यावर गोव्याचे उत्तरेस ८२ मैलांवर याला विजयदुर्गही ह्मणतात. ) घेतो. इ. स. १७५६.

तो आड्मिरल् वाटसन् याच्या आरमाराबरोबर कलकत्त्यास येऊन पोंहचला. त्यानें कलकत्ता शहर परत घेतलें, हुगली येथील किल्ल्यास वेढा

तो कलकत्त्यास येतो व किल्ला परत घेतो इ. स. १७५७.

घातला. तसेंच सुराजउद्दवला याचा पराभव करून त्यास तह करण्यास अगत्य पाडिलें.

क्लैव साहेब चंद्रनगर (कलकत्यापासून६ मैलांवर) घेतो इ. स. १७५७

फ्रेंच लोकांनीं नबाबाबरोबर मसलत चालविली होती, असें दिसून आल्यावरून कलकत्त्याच्या उत्तरेस चंद्रनगर या नांवाच्या त्यांच्या वसाहतीवर हल्ला करून ती क्लैव साहेब यानें घेतली.

नबाबाच्या विरुद्ध मसलत.

सुराजउद्दवला यानें जरी नुकताच तह केला होता तरी तो नाखुष होता. तो इतक्या वाईट रीतीनें वागत असे कीं, त्याचा सेनापति मिरजाफर यानें त्याजला पदच्युत करण्याविषयीं मसलत चालविली. त्या मसलतीस क्लैव साहेबानें उत्तेजन दिलें.

उमीचंद.

उमीचंद ह्मणून हिंदु जातीचा एक श्रीमान मनुष्य होता. यानें आपणास तीस लाख रुपये मिळतील तर आपण ही मसलत गुप्त राखूं नाहींपेक्षां उघडकीस आणूं असें भय घातलें.

क्लैवसाहेब याची वर्तणूक.

या संकट समयीं क्लैव साहेबानें दोन दस्तऐवज तयार केले. त्यांपैकीं एक खरा व एक खोटा. खोट्या दस्तऐवजांत उमीचंद यास तीस लाख रुपये देण्यांचें कबूल केलें होतें. आड्मिरल् वाटसन् यानें आपण खोट्या कागदावर सही करणार नाहीं असें जेव्हां सांगितलें, तेव्हां त्याची क्लैव साहेबानें खोटी सहीही केली. जेव्हां लढाईची सर्व तयारी झाली तेव्हां सुराजउद्दवला यास क्लैव साहेबानें पत्र लिहिलें. हें पत्र लढाईची सूचनाच आहे असें समजून आपल्या सर्व सैन्यासह त्यानें एकदम इंग्लिशांवर हल्ला केला.

प्लासी ( मुर्शिदाबादचे दक्षिणेस ३० मैलांवर ) येथील लढाई इ. स. १७५७

त्याला क्लैव साहेब प्लासी येथें भेटला. मिरजाफर याजपासून मदत मिळण्याची जी त्याला आशा होती, तिचा भंग झाल्यामुळें कांहीं वेळ पर्यंत तो विचारांत पडला. परंतु लवकरच हल्ला करण्याचा त्यानें निश्चय केला. त्याचें सैन्य फक्त तीन हजारच होतें. त्यापैकीं सरासरी नऊशें गोरेलोक होते. शत्रूचें सैन्य ३५ हजार होतें. त्यापैकीं पंधरा हजार घोडेस्वार होते. असें असतांही यानें शत्रूबरोबर टक्कर दिली व शत्रूचा पराभव केला. आजपर्यंत ज्या मोठमोठ्या लढाया झाल्या त्यांपैकींच ही एक होय. या लढाईपासून हिंदुस्थानांत इंग्लिश राज्याची खरी स्थापना होण्यास आरंभ झाला. या लढाईनंतर सुराजउद्दवला पळून जात असतां मारला गेला आणि इंग्लिशांनीं त्याचे गादीवर मिरजाफरखास बसविलें. या लढाईंत इंग्लिशांस मिळालेली लूट इतकी होती कीं, एकट्या क्लैव साहेबाच्या वांट्यासच पन्नास लक्ष रुपये आले.

उमीचंदाचा परिणाम.

उमीचंदास आपणास मिळालेला दस्तऐवज खोटा आहे, असें जेव्हां समजलें तेव्हां त्याचें देहभानच गेलें व तो सावध झाल्यावर वेडा झाला.

---

## भाग १७ वा.

## कर्नाटकांतील दुसरी लढाई.

### १७५६–६१.

इंग्लंड व फ्रा-

इंग्लंड आणि फ्रान्स या दोन देशांत नवीन-

युद्ध इ. स. १७५६ त सुरू झालें. यामुळें हिंदुस्थानांत जे इंग्लिश लोक व फ्रेंच लोक होते, त्यांतही युद्ध सुरू झालें.

न्स यांत युद्ध सुरू होतें इ. स. १७५६.

या वेळीं कर्नाटकांत फार धांदल चालली होती. महमद अल्लीचा अधिकार कोणी मानीनासे झाले. इंग्लिश लोकांनीं मधुरा व तिनवल्ली या प्रांतांत त्याचा अंमल चालू करण्याकरितां फौज पाठविली होती. तेथें ती गुंतली आहे अशी संधि पाहून फ्रेंच लोकांनीं त्रिचनापल्लीवर हल्ला केला; परंतु क्यापटन् कालियड् हा त्या शहरच्या संरक्षणार्थ योग्य वेळीं येऊन पोंचला होता. त्यानें त्यांचें कांहीं चालूं न देतां त्यांस मागें हटविलें.

त्रिचनापल्लीवर फ्रेंच लोक हल्ला करितात, त्यांस क्यापट्न कालि॰ यड् मागें हटवि- तो इ.स. १७५६.

कौंट डी लाली हा आयर्लंडांतलि एक गृहस्थ हो- ता. या वेळीं तो फ्रेंच सरकारच्या चाकरीस होता. तो फ्रान्स देशाहून मोठें सैन्य घेऊन हिंदुस्थानांत आला, आणि त्यानें आल्याबरावर फोर्ट सेन्ट डे- व्हिड् या किल्ल्यावर हल्ला करून तो घेतला आणि त्याचा नाश केला. यानंतर बुशी नांवाचा फ्रेंचां- चा सरदार निजामाच्या दरबारांत होता, त्यास त्यानें परत बोलाविलें आणि नंतर फोर्ट सेन्ट जार्ज किल्ल्यावर सात हजार सैन्यासह हल्ला केला. या सात हजारांपैकीं तीन हजार यु- रोपियन लोक होते. इंग्लिशांचें सैन्य त्याचे- पेक्षां फार थोडें होतें. त्यांची एकंदर फौज चार हजार होती, त्यांतून अठराशें युरोपियन लोक होते.

कौंट डी लाली.

तो फोर्ट सेन्ट डेव्हिड् किल्ला घे- तो १७५८.

तो फोर्ट सेन्ट जार्ज किल्यावर हल्ला करितो. १७५८.

फ्रेंचाचा पराभव होण्याचें कारण.

फ्रेंच लोकांत एकी नव्हती. त्यांचा मुख्य कौंट डी लाली हा स्वभावानें रागीट व मगरूर होता. यामुळें तो कोणास आवडत नसे. अशी स्थिति असल्यामुळें फ्रेंच लोकांस मागें हटावें लागलें.

कर्नेल् फोर्ड हा फ्रेंचांचा कांडोर येथें पराभव करितो आणि मच्छलीपट्टण घेतो. १७५८.

बुशी यास लाली यानें दक्षिणेंत परत बोलाविल्यावर कर्नेल् फोर्ड यास इंग्लिश लोकांनीं उत्तर सरकाराकडे ( महा नदीच्या मुखापासून कृष्णानदी पर्यंत मांत ) पाठविलें; या ठिकाणीं त्यानें कांडोर ( उत्तर सरकारच्या किनाऱ्यावर ) येथें फ्रेंचांचा पराभव केला आणि मच्छलीपट्टण घेतलें.

वांदिवाश ) मद्रासच्या नैर्ऋत्येस ७३ मैलांवर ) येथील लढाई इ. स. १७६०.

इतक्यांत इंग्लिशांचा सरदार कर्नेल् कूट हा इंग्लंडाहून मदत घेऊन हिंदुस्थानांत आला. त्यानें एकदम लढाईस आरंभ केला. इंग्लिश लोकांची व फ्रेंच लोकांची सगळी फौज वांदिवाश या ठिकाणीं जमा झाली. कर्नेल् कूट यानें फ्रेंच लोकांचा अगदीं मोड करून हा मोठा उपयुक्त किल्ला घेतला आणि बुशी यास कैद केलें.

इंग्लिश लोक पांडिचरीस वेढा घालितात इ. स. १७६१.

त्यानंतर इंग्लिश लोकांनीं पांडिचरीस वेढा घातला. तेथील फौजेनें मोठ्या निकरानें लढाई केली, परंतु तिचें कांहीं न चालतां तें शहर इंग्लिशांचे हातीं आलें. त्यांनीं त्याची तटबंदी जमीनदोस्त केली.

फ्रेंचांचीं सर्व ठाणीं जातात. थि-

यानंतर थिआगर आणि जिंजी या नांवाचे फ्रेंचांचे ताब्यांतील दोन डोंगरी किल्लेही इंग्लि-

शांचे हातीं आले. यामुळें हिंदुस्थानांत एकही लष्करी ठाणें फ्रेंच लोकांच्या ताब्यांत राहिलें नाहीं.

आगर ( सालेम च्या दक्षिणेस ).

जिंजी ( पांडिचरीचे वायव्येस ३५ मैलांवर ).

कौंट डी लाली हा फ्रान्स देशास परत गेला. हिंदुस्थानांतील फ्रेंच लोकांचे नुकसानीस तोच कारणीभूत झाला, असा त्याजवर फ्रेंच सरकारानें आरोप आणिला आणि त्याचा अन्यायानें शिरच्छेद केला.

कौंट डी लालीचा परिणाम इ. स. १७६६.

## भाग १८ वा.

### बंगाल्यांतील दुसरी लढाई.

### १७५८–६७.

इंग्लिश लोकांनीं मिरजाफर यास बंगालचा नबाब केलें, असें सोळाव्या भागांत सांगितलें आहे. ही गोष्ट दिल्लीच्या बादशाहाचा मुलगा दुसरा शाहाअलम् आणि अयोध्येचा सुभेदार सुजाउद्दवला यांस न आवडून त्या दोघांनीं त्याचे राज्यावर स्वारी केली आणि पाटणा शहरास वेढा घातला.

पाटणा ( गंगेच्या काठीं ) शहरचा वेढा १७५९.

परंतु क्लैव साहेब येतो आहे असें ऐकून, त्यानीं एकदम वेढा उठविला आणि निराळे होऊन पळून गेले. या आनंदानें मिरजाफर यानें ईस्ट इंडिया कंपनीपासून जे तीन लाख रुपये आपणास प्रतिवर्षी मिळत असत ते सर्व क्लैवसाहेब याचे ह्यातीपर्यंत त्यास बक्षीस दिले.

ते भयाभीत होऊन पळून जातात.

मिरजाफर यास इंग्लिश लोक पैसा देण्याविषयीं वारंवार तगादा लावीत असत, यामुळें

डच लोक इ. स. १७५९.

त्याला कंटाळा येऊन त्याच्या मनामध्यें इंग्लिश लोकांविषयीं जो उत्तम ग्रह होता तो नाहींसा झाला. चिनसुरा येथें डच लोकांची वसाहत होती. मिरजाफर यानें इंग्लिश लोकांस आपल्या मुलखांतून घालवून देण्याच्या कामामध्यें मदत करण्याविषयीं तेथील डच लोकांस विनंति केली. त्यांनीं ती मान्य केली. थोड्याच दिवसांत बटेव्हिया येथून हुगली नदींत सात जहाजें पंधराशें लोकांसह आलीं. परंतु आपल्या फौजेस मिळण्यापूर्वींच क्लैव साहेब व कर्नेल फोर्ड यांनीं त्यांचा असा पूर्णपणें पराभव केला कीं, चिनसुरा येथील गव्हरनरानें मोठ्या नम्रतेनें आपला अन्याय कबूल करून त्यांजपाशीं क्षमा मागितली आणि लढाईचा खर्च देण्याचें कबूल केलें.

*शाहाअलम् व सुजाउद्दवला यांची दुसरी स्वारी.*

क्लैव साहेब दुसऱ्यानें इंग्लंडास परत गेल्यावर, शाहाअलम् आणि सुजाउद्दवला यांनीं बंगाल प्रांतावर पुन्हा स्वारी केली. या वेळीं बंगाल प्रांताची स्थिति मोठ्या अणीबाणीची होती, असें पुढें लिहिलेल्या प्रकारावरून कळून येईल.

*क्लैव दुसऱ्यानें इंग्लंडास गेल्यावर हिंदुस्थानची स्थिति.*

१ मिरजाफर याच्या लोकांस पाठीमागच्या चाकरीचा पगार न मिळाल्यामुळें ते बंड करण्याच्या बेतांत होते.

२ मिरजाफर याचा जांवई मिरकासीम यानें आपल्या पदरचा पैसा देऊन शिपायांस स्वस्थ केलें. नवा गव्हरनर वान्सिटार्ट यानें मिरजाफर याला काढून त्याच्या गादीवर मिरकासीम यास बसविलें. इंग्लिश लोकांनां पैक्याच्या मोठमोठ्या

रकमा द्यावयाच्या होत्या, यामुळें इंग्लिशांविषयीं त्याच्या मनांत वांकडें येऊन तो शत्रूस मिळाला.

३ या वेळीं इंग्लिश लोकांच्या मनांत फार लोभ उत्पन्न झाला होता. ते लोकांवर फार जुलूम करीत असत. यामुळें एतद्देशीय लोकांच्या मनांतील इंग्लिश लोकांच्या प्रतिष्ठेविषयीं सर्व भरंवसा नाहींसा झाला.

४ रामनारायण ह्मणून पाटणा येथें एक विश्वासु अधिकारी होता. हा क्लैव साहेबाचा मोठा मित्र असे. याजवर शत्रूंनीं हल्ला केला असतां, वान्सिटार्ट यानें त्याला मदत दिली नाहीं, यामुळें तो शत्रूंच्या हातीं सांपडला. त्यांनीं त्याला ठार मारिलें. यामुळें एतद्देशीय लोकांना फार त्वेष आला.

५ मेजर हेनरी मनरो याच्या ताब्यांतील शिपायांनींही बंड केलें. ते जास्ती पगार मागत असत आणि जेव्हां त्यांपैकीं चोवीस मनुष्यांस तोफेच्या तोंडीं दिलें, तेव्हां मात्र ते ताब्यांत आले.

बंगाल प्रांताची अशी डगमगीत स्थिति होती; तथापि इंग्लिश लोकांनीं धैर्य सोडिलें नाहीं. मिरकासीम फितूर झाल्यानंतर त्यांनीं पुन्हां वृद्ध मिरजाफर याला गादीवर बसविलें.

बादशाहाच्या सैन्याबरोबर कितीएक लढाया करून जय मिळविल्यानंतर, मिरकासीम याजबरोबर जेरीया येथें एक मोठी निकराची लढाई झाली. या लढाईंत मिरकासीम याचा पराभव

जेरिया (बहार प्रांतांत हुगली नदीच्या कांठीं) येथील लढाई इ. स. १७६३.

झाला. यानंतर इंग्लिशांनीं त्याचें आवडतें शहर मोंगीर हें घेतलें.

अशा प्रकारें नाश झाल्यावर मिरकासीम यास फार राग आला; आणि त्यानें पाटणा येथील एलिस आणि दुसरे इंग्लिश लोकांस विश्वासघातानें मारण्याचा हुकुम दिला. हें अघोर कृत्य समरू या नांवाच्या एका युरोपियनानें कित्येक शिपायांच्या मदतीनें केलें. यानंतर पाटणा शहर जेव्हां पुन्हा इंग्लिशांच्या हातीं आलें, तेव्हां मिरकासीम अयोध्येस सुजाउद्दवला याजकडे पळून गेला.

पाटणा येथील कत्तल इ. स. १७६३.

या एकत्र झालेल्या राजांच्या सैन्याचा इंग्लिशानीं प्रथम पाटणाजवळ पूर्णपणें पराभव केला. या लढाईंत इंग्लिशांकडील सरदार मेजर कार्नोक हा होता. नंतर मेजर मनरो यानें बक्सार येथें त्यांचा पराभव केला. ही लढाई झाल्यानंतर दिल्लीचा बादशाहा इंग्लिशांचे स्वाधीन झाला, आणि सरतेशेवटीं सुजाउद्दवला याची अलाहाबाद, लखनौ, हीं शहरें त्याच्या हातून गेल्यानंतर, कोरा येथें त्याचा पराभव होऊन तो कार्नाक याच्या स्वाधीन झाला.

पाटणा, बक्सार ( काशीच्या पू. ५८ मैलांवर ) व कोरा ( काशीच्या वायव्येस ) येथील लढाया इ. स. १७६४.

प्लासी येथील योद्धा क्लैव साहेब याचें नांव या वेळेच्या सुमारास बऱ्या लोकांच्या यादींत पडून त्यास लार्ड असा किताब मिळाला होता. तो हिंदुस्थानांत पुनः इ. स. १७६५ त आला. या वेळीं लोक ज्या वारंवार कागाळ्या करीत त्या आणि एकंदर मुलखांत व विशेषें करून बं-

क्लैव साहेब पुनः हिंदुस्थानांत येतो इ. स. १७६५.

गाल प्रांतांत ज्या वाईट गोष्टीच प्रचारांत आल्या होत्या, त्या नाहींशा करून टाकण्याकरितां त्यास विलायत सरकारानें अधिकार देऊन पाठविलें होतें. तो हिंदुस्थानांत आल्याबरोबर एकदम या कामास लागला.

त्यानें केलेले फेरफार.

१ त्यानें बंगालच्या नबाबास नांवाचा मात्र नबाब करून बंगाल, बहार आणि ओडिसा हे प्रांत इंग्लिश राज्यास जोडिले व त्यांचा वसूल घेण्याचा हक्कही इंग्लिशांकडेसच ठेविला.

२ त्यानें मुलखी खात्यांतील कामगारांचा पगार वाढवून त्यांस खासगी व्यापार करण्याची मनाई केली.

३ लष्करी कामदार जेव्हां लढाईवर जातील तेव्हां मात्र त्यांस दुप्पट भत्ता मिळावा असा त्यानें ठराव केला. यामुळें लष्करी अधिकाऱ्यांनीं बखेडा केला. दोनशें कामगारांनीं राजीनामे दिले. परंतु लार्ड क्लैव साहेब हा अशा गोष्टींनीं डगमगणारा नव्हता. त्यांच्या जागा भरण्याकरितां मद्रासेहून दुसरे कामदार पाठवून देण्याविषयीं त्यानें लिहिलें.

क्लैव साहेबाचें औदार्य.

मिरजाफरानें आपल्या मृत्युपत्रांत क्लैव साहेबास पांच लाख रुपये बक्षीस देण्याविषयीं लिहून ठेविलें होतें. परंतु ती रकम स्वतः न स्वीकारितां त्यानें ती असमर्थ झालेले कामदार व शिपाई यांच्या उपयोगाकरितां धर्मखात्याकडे दिली.

क्लैव साहेबाचें शेवटचें स्वदेशीं जाणें १७६७.

अशाप्रकारें क्लैव साहेब याजकडे सोंपविलेलें काम मोठ्या शिताफीनें बजावून, तो हिंदुस्थान

त्याचा मृत्यु १७७४.

देश सोडून इंग्लंडास गेला. तो पुनः हिंदुस्थानांत आला नाहीं. तो इ. स. १७७४ या वर्षीं मरण पावला. हा प्रथमतः अगदीं गरीब घराण्यांतील असून केवळ स्वपराक्रमानें मोठ्या योग्यतेस चढला.

---

## भाग १९ वा.

### ह्मैसूर येथील पहिलें युद्ध.

### १७६७–६९.

हैदराची उत्पत्ति.

हैदरअल्ली हा मुसलमान जातीचा एक शूर मनुष्य होता. हा पंजाबांतून येऊन ह्मैसुरांत राहिलेल्या एका फकीराचा नातू होता. तो इ. स. १७०२ यावर्षीं कोल्हार येथें जन्मला. तो आपल्या वयाच्या तिसावे वर्षीं ह्मैसूर येथील राजाचे चाकरीस राहिला. प्रथम त्याचे हाताखालीं पन्नास घोडेस्वार व दोनशें पायदळ होतें. हा साहसी परंतु अविवेकी होता. चाकरीस राहिल्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्यानें लुटालूट करण्याचा क्रम चालविला. अशा प्रकारें लुटालूट करीत असतां कांहीं काळानें तो इतका प्रबळ झाला कीं, त्यानें आपल्या यजमानास पदच्युत करून ह्मैसूर येथील गादी इ. स. १७६१ यावर्षीं बळकाविली. एवढ्यानें त्याची तृप्ति न होतां आणखींही आपला अधिकार वाढविण्याची त्यास इच्छा उत्पन्न झाली आणि तो शेजारच्या प्रांतांवर हल्ले करूं लागला.

त्याचा जन्म इ. स. १७०२. कोल्हार ( बंगळूरच्या पूर्वेस ४३ मैलांवर ).

लढाईचे कारण.

त्याची शक्ति उत्तरोत्तर वृद्धिंगत होत चालली असें पाहून, इंग्लिशांनीं ती नाहींशी करावी या करितां त्याजवर स्वारी करण्याचा बेत केला; आणि निजाम, मराठे आणि महमदअली यांच्याशीं एकी केली. परंतु हैदरानें निजाम व मराठे यांस लांच देऊन आपल्या पक्षाकडे आणिलें. याकरितां इंग्लिशांचा सरदार कर्नल् स्मिथ याजला त्याजबराबर लढाई न करितां सैन्यासह मद्रासेस परत यावें लागलें.

इंग्लिश लोक त्याजवर स्वारी करण्याचा बेत करितात.

हैदरानें त्याचा पाठलाग केला. परंतु चंगम येथें व पुनः त्रिनोमाली येथें त्याचा पराभव झाला. या लढायांत हैदराकडील सैन्य त्रेचाळीस हजार घोडेस्वार व अठ्ठावीस हजार पायदळ होतें आणि इंग्लिशांकडे फक्त एक हजार घोडेस्वार व सहा हजार पायदळ होतें. हा प्रकार पाहून निजामास पश्चात्ताप झाला; ह्मणून इंग्लिशांनीं पुनः त्यास आपल्या पक्षाकडे घेतलें.

हैदर त्याचा पाठलाग करितो परंतु चंगम ( मद्रासचे दक्षिणेस अर्कोट जिल्ह्यांत पिनार नदीचे कांठीं ) आणि त्रिनोमाली ( वरील नदीच्या कांठींच ) येथील लढायांत त्याचा पराभव होतो इ. स. १७६७.

नंतर हैदरानें आंबूरच्या किल्ल्यावर हल्ला केला. तेथेंही याचप्रकारें त्याचा पराभव झाला. या किल्ल्याचें संरक्षण क्यापटन् काल्इर्ट यानें मोठ्या शूरपणें केलें.

हैदर आंबूर ( अर्कोटच्यापश्चिमेस ५० मैलांवर ) च्या किल्ल्यावर हल्ला करितो इ. स. १७६७.

नंतर फौजेच्या दोन टोळ्या करून इंग्लिश लोक हैदराचे राज्यांत शिरले. परंतु त्यांना जय न मिळतां हैदराला कित्येक ठिकाणीं जय मिळाले. मुंबई येथील सैन्य त्याला पाहून पळून गेलें. ही गोष्ट त्यांना मोठी शरमेची होती.

इंग्लिश लोक हैदराच्या राज्यांत शिरतात. इ. स. १७६८.

मद्रास येथील तह इ. स. १७६९.

नंतर हैदराबरोबर त्यानेंच ठरविलेल्या सुलभ अटींचा तह मद्रास येथें झाला.

तहाचें कलम.

या तहांत असें ठरलें होतें कीं, लढाईंत घेतलेला मुलूख एकमेकांनीं एकमेकांस परत द्यावा.

---

## भाग २० वा.

## वारन् हेस्टिंग्झ यांची कारकीर्द.

### १७७२–१७८५.

१ बंगाल्यांतील फेरफार.

२ मराठ्यांशीं पहिलें युद्ध.

३ म्हैसूर येथील दुसरी लढाई १७८०-८४.

क्लैव साहेब इ. स. १७६७ त इंग्लंड देशास परत गेला. असें अठराव्या भागांत सांगितलेंच आहे. हा गेल्यानंतर बंगाल प्रांतांत पुन्हा पूर्वींप्रमाणें फार अव्यवस्था झाली. त्यानें जे शहाणपणाचे उपाय योजिले होते ते बराबर रीतीनें अमलांत आले नाहींत. यामुळें ईस्ट इंडिया कंपनीच्या वतीनें हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविणारी जी " कोर्ट आफ् डैरेक्टर्स " या नांवाची इंग्लंडांतील सभा होती, तीस पुनः नवीन फेरफार करावे लागले.

बंगाल्यांतील नवीन फेरफार.

कोर्ट आफ् डैरेक्टर्स.

वारन् हेस्टिंग्झ.

हे नवीन फेरफार अमलांत आणण्याचें काम नवीन गव्हरनर वारन् हेस्टिंग्झ यांजकडे सोंपविलें.

वसूल खात्यांतील फेरफार.

१ वसुलाच्या कामावर एतद्देशीय लोकांस न नेमितां इंग्लिश लोकांसच नेमावें.

रेग्युलेटिंग आक्ट इ. स. १७७३.

२ रेग्युलेटिंग आक्ट या नांवाचा एक कायदा ठरला. त्याचीं कलमें येणें प्रमाणें होतीं.

( अ ) बंगालचे गव्हरनर यांस गव्हरनर जनरल् असें ह्मणावें. त्यांचा अधिकार सर्व हिंदुस्थान देशावर असावा. त्यांच्या हाताखालीं चार कौन्सिलदार असावे. मुंबई आणि मद्रास याठिकाणीं गव्हरनर असावे. आणि त्यांच्या हाताखालींही एकेक कौन्सिल असावें.

( ब ) कलकत्ता येथें एक नवीन न्यायसभा स्थापावी व तींत एक मुख्य व तीन मदतगार न्यायाधीश असावेत. त्यांची नेमणूक राजानें करावी.

( क ) एतद्देशीय लोकांपासून कोणत्याही प्रकारचें बक्षीस कोणत्याही सरकारी कामदारानें घेऊं नये.

वारन् हेस्टिंग्झ पहिले गव्हरनर जनरल् होतात १७७४–८५.

या आक्टाअन्वयें वारन् हेस्टिंग्झ हे हिंदुस्थानचे पहिले गव्हरनरजनरल् झाले. त्यांनीं हें काम तेरा वर्षेपर्यंत पाहिलें. त्यांनीं आपलें काम फार उत्तम रीतीनें बजाविलें आणि कंपनी सरकारचें फार हित केलें. तथापि कौन्सिलांतील तीन सभासदांचें यांच्याशीं फार वांकडे होतें.

गोहद ( ग्वाल्हेरच्या ईशान्येस २२ मैलांवर ).

सहा वर्षेपर्यंत त्यांनीं जो जो बेत करावा त्यातु
त्या बेतास त्यांनीं आड यावें. वारन् हेस्टिंग्झ
जर तीव्र बुद्धीचे नसते आणि कित्येक प्रसं ...दच.
...ठीं त्या-
ते फार चपळतेनें वागले त्याचप्र...
...त्यापटन् पो-
वागले नसते तर इंग्लिश लोकां...
...र या नांवाचें
स्थान देश कधींच गेला असत...

लाहार ( का-

रोहिले लोकांस हाकून देण्याच्या कामांत वारन् हेस्टिंग्झ मदत करितात इ. स. १७७४.

रोहिले हे अफगाण जातीचे लोक होते. यांचा अयोध्येच्या वायव्येस रोहिलखंडांत अमल होता. यांस तेथून हांकून लावण्यास मदत देण्याकरितां अयोध्येच्या नबाबानें इंग्लिशांस विनंति केली. याकरितां कौन्सिलच्या सभासदांची जरी संमति नव्हती, तरी या लोकांस हाकून लावण्याच्या कामांत वारन् हेस्टिंग्झ यांनीं अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला यास मदत केली व तो प्रदेश अयोध्येच्या राज्यास जोडिला. या कामगिरीबद्दल कंपनीस पांच लक्ष रुपये मिळाले.

नंदकुमार वारन् हेस्टिंग्झ यांजवर फिर्याद करितो इ• सन १७७४.

राजा नंदकुमार हा कलकत्ता येथील ब्राह्मण जातीचा एक संपत्तिवान गृहस्थ [illegible]
कौन्सिल[illegible]
मुळें या[illegible]
लचाची [illegible]
" परंतु हें [illegible]

नंदकुमाराचा परिणाम इ. सन १७७६.

याजवरच [illegible]
आरोप आला. [illegible]
लेल्या न्यायसभेनें केल[illegible]
ठरवून, विलंब न लावितां ए[illegible]
मोठ्या समुदायासमोर फांशीं दिलें.

---

कोर्ट आफ् डैरेक्टर्स.

वारन् हेस्टिंग्झ.

## मराठ्यांशीं पहिलें युद्ध.

न[illegible] १ रोहिले लोकांना हांकून दिल्यामुळें आणि [illegible] हे [illegible]ला फांशीं दिल्यामुळें एत्तद्देशीय लोकांनवीन गव्ह[illegible] नाखुषी उत्पन्न झाली.

वसल खात्यांतील फेरफार.

१ वसुलाच्या [illegible]विषयीं मराठे लोक भां[illegible]न नेमितां इंग्लि[illegible]कडील इंग्लिशांच्या सैन्यानें

साष्टी बेट घेतलें. यामुळें त्यांचीं मनें फारच चेतलीं.

पुरंदर ( पुण्याजवळ ) येथील तह इ. स. १७७६.

पुरंदर येथें मराठ्यांशीं जो तह झाला, त्यांत असें ठरलें होतें कीं, साष्टी बेट इंग्लिशांकडेसच असावें व पेशव्यांचा प्रतिस्पर्धी राघोबादादा यास त्यांनीं मदत करूं नये. या तहाकडे मराठ्यांनीं लक्ष दिलें नाहीं व लढाईची गुप्त तयारी चालविली. याकरितां वारन् हेस्टिंग्झ यांनीं एकदम लढाईचे उपाय योजिले.

वारन् हेस्टिंग्झ साहेबांची या लढाई विषयीं तयारी इ० स. १७७८.

मुंबईहून चार हजार सैन्य पुण्यास रवाना केलें; परंतु या सैन्यानें फार लज्जास्पद वर्तणूक केली व मुंबईस सुरक्षितपणें परत येऊन पोंचण्याकरितां साष्टी बेट सोडून दिलें. ह्या सैन्याचा अधिकारी कर्नल काकबर्न हा होता.

इतक्यांत वारन् हेस्टिंग्झ यांणीं कलकत्याहून खुषकीच्या मार्गानें सैन्य पाठविण्याचें सुरू केलें. कर्नल गोडर्ड यानें अतिशय संकटें सोसून, ज्या प्रदेशांतून त्याला जावयाचें होतें त्या प्रदेशांतून आपला मार्ग काढिला. तो सुरत येथें येऊन पोंचला. त्यानें अमदाबाद शहर घेतलें आणि मराठे लोकांच्या चाळीस हजार सैन्याचा पराभव केला.

गोहद ( ग्वाल्हेरच्या ईशान्येस २२ मैलांवर ).

शिंदा व गोहदचा राणा या दोघांत कांहीं बेतुबनाव होऊन लढाया चालल्या होत्या. गोहदचा राणा इंग्लिशांचे पक्षास मिळाला; यासाठीं त्याच्या मदतीस वारन् हेस्टिंग्झ यांनीं क्यापटन् पोफॉम यास पाठविलें. त्यानें लाहार या नांवाचें

लाहार ( का-

रोहिले लोकांस हाकून देण्याच्या कामांत वारन् हेस्टिंग्झ मदत करितात इ. स. १७७४.

रोहिले हे अफगाण जातीचे लोक होते. यांचा अयोध्येच्या वायव्येस रोहिलखंडांत अमल होता. यांस तेथून हांकून लावण्यास मदत देण्याकरितां अयोध्येच्या नबाबानें इंग्लिशांस विनंति केली. याकरितां कौन्सिलच्या सभासदांची जरी संमति नव्हती, तरी या लोकांस हाकून लावण्याच्या कामांत वारन् हेस्टिंग्झ यांनीं अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला यास मदत केली व तो प्रदेश अयोध्येच्या राज्यास जोडिला. या कामगिरीबद्दल कंपनीस पांच लक्ष रुपये मिळाले.

नंदकुमार वारन् हेस्टिंग्झ यांजवर फिर्याद करितो इ. सन १७७४.

राजा नंदकुमार हा कलकत्ता येथील ब्राह्मण जातीचा एक संपत्तिवान गृहस्थ होता. याला कौन्सिलांतील कांहीं सभासदांनीं उत्तेजन दिल्यामुळें यानें वारन् हेस्टिंग्झ यांजवर लांच खाल्ल्याची तोहमत आणिली.

नंदकुमाराचा परिणाम इ. सन १७७६.

परंतु ही चौकशी चालली असतां नंदकुमार याजवरच खोट्या सहीचा कागद बनविल्याचा आरोप आला. त्याची चौकशी नवीन स्थापिलेल्या न्यायसभेनें केली आणि त्याला अपराधी ठरवून, विलंब न लावितां एतद्देशीय लोकांच्या मोठ्या समुदायासमोर फांशीं दिलें.

---

## मराठ्यांशीं पहिलें युद्ध.

युद्धाचीं कारणें.

१ रोहिले लोकांना हांकून दिल्यामुळें आणि नंदकुमाराला फांशीं दिल्यामुळें एतद्देशीय लोकांच्या मनांत नाखुषी उत्पन्न झाली.

२ पेशवाइच्या विषयीं मराठे लोक भांडत असतां, मुंबईकडील इंग्लिशांच्या सैन्यानें

साष्टी बेट घेतलें. यामुळें त्यांचीं मनें फारच चेतलीं.

पुरंदर येथें मराठ्यांशीं जो तह झाला, त्यांत असें ठरलें होतें कीं, साष्टी बेट इंग्लिशांकडेसच असावें व पेशव्यांचा प्रतिस्पर्धी राघोबादादा यास त्यांनीं मदत करूं नये. या तहाकडे मराठ्यांनीं लक्ष दिलें नाहीं व लढाईची गुप्त तयारी चालविली. याकरितां वारन् हेस्टिंग्झ यांनीं एकदम लढाईचे उपाय योजिले.

पुरंदर ( पुण्याजवळ ) येथील तह इ. स. १७७६.

मुंबईहून चार हजार सैन्य पुण्यास रवाना केलें; परंतु या सैन्यानें फार लज्जास्पद वर्तणूक केली व मुंबईस सुरक्षितपणें परत येऊन पोंचण्याकरितां साष्टी बेट सोडून दिलें. या सैन्याचा अधिकारी कर्नल काकबर्न हा होता.

वारन् हेस्टिंग्झ साहेबांची या लढाई विषयीं तयारी इ० स. १७७८.

इतक्यांत वारन् हेस्टिंग्झ यांणीं कलकत्त्याहून खुषकीच्या मार्गानें सैन्य पाठविण्याचें सुरू केलें.

कर्नल गोडर्ड यानें अतिशय संकटें सोसून, ज्या प्रदेशांतून त्याला जावयाचें होतें त्या प्रदेशांतून आपला मार्ग काढिला. तो सुरत येथें येऊन पोंचला. त्यानें अमदाबाद शहर घेतलें आणि मराठे लोकांच्या चाळीस हजार सैन्याचा पराभव केला.

शिंदा व गोहदचा राणा या दोघांत कांहीं बेबनाव होऊन लढाया चालल्या होत्या. गोहदचा राणा इंग्लिशांचे पक्षास मिळाला; यासाठीं त्याच्या मदतीस वारन् हेस्टिंग्झ यांनीं क्यापटन् पोफॉम यास पाठविलें. त्यानें लाहार या नांवाचें

गोहद ( ग्वाल्हेरच्या ईशान्येस २२ मैलांवर ).

लाहार ( का-

रोहिले लोकांस हाकून देण्याच्या कामांत वारन् हेस्टिंग्झ मदत करितात इ. स. १७७४.

रोहिले हे अफगाण जातीचे लोक होते. यांचा अयोध्येच्या वायव्येस रोहिलखंडांत अमल होता. यांस तेथून हांकून लावण्यास मदत देण्याकरितां अयोध्येच्या नबाबानें इंग्लिशांस विनंति केली. याकरितां कौन्सिलच्या सभासदांची जरी संमति नव्हती, तरी या लोकांस हाकून लावण्याच्या कामांत वारन् हेस्टिंग्झ यांनीं अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला यास मदत केली व तो प्रदेश अयोध्येच्या राज्यास जोडिला. या कामगिरीबद्दल कंपनीस पांच लक्ष रुपये मिळाले.

नंदकुमार वारन् हेस्टिंग्झ यांजवर फिर्याद करितो इ० सन १७७४.

राजा नंदकुमार हा कलकत्ता येथील ब्राह्मण जातीचा एक संपत्तिवान गृहस्थ होता. याला कौन्सिलांतील कांहीं सभासदांनीं उत्तेजन दिल्यामुळें यानें वारन् हेस्टिंग्झ यांजवर लांच खाल्ल्याची तोहमत आणिली.

नंदकुमाराचा परिणाम इ. सन १७७६.

परंतु ही चौकशी चालली असतां नंदकुमार याजवरच खोट्या सहीचा कागद बनविल्याचा आरोप आला. त्याची चौकशी नवीन स्थापिलेल्या न्यायसभेनें केली आणि त्याला अपराधी ठरवून, विलंब न लावितां एतद्देशीय लोकांच्या मोठ्या समुदायासमोर फांशीं दिलें.

---

## मराठ्यांशीं पहिलें युद्ध.

युद्धाचीं कारणें.

१ रोहिले लोकांना हांकून दिल्यामुळें आणि नंदकुमाराला फांशीं दिल्यामुळें एत्तद्देशीय लोकांच्या मनांत नाखुषी उत्पन्न झाली.

२ पेशवाईच्या ...विषयीं मराठे लोक भांडत असतां, मुंबईकडील इंग्लिशांच्या सैन्यानें

साष्टी बेट घेतलें. यामुळें त्यांचीं मनें फारच चेतलीं.

पुरंदर येथें मराठ्यांशीं जो तह झाला, त्यांत असें ठरलें होतें कीं, साष्टी बेट इंग्लिशांकडेसच असावें व पेशव्यांचा प्रतिस्पर्धी राघोबादादा यास त्यांनीं मदत करूं नये. या तहाकडे मराठ्यांनीं लक्ष दिलें नाहीं व लढाईची गुप्त तयारी चालविली. याकरितां वारन् हेस्टिंग्झ यांनीं एकदम लढाईचे उपाय योजिले.

पुरंदर ( पुण्याजवळ ) येथलि तह इ. स. १७७६.

मुंबईहून चार हजार सैन्य पुण्यास रवाना केलें; परंतु या सैन्यानें फार लज्जास्पद वर्तणूक केली व मुंबईस सुरक्षितपणें परत येऊन पोंचण्याकरितां साष्टी बेट सोडून दिलें. ह्या सैन्याचा अधिकारी कर्नल काकबर्न हा होता.

वारन् हेस्टिंग्झ साहेबांची या लढाई विषयीं तयारी इ० स. १७७८.

इतक्यांत वारन् हेस्टिंग्झ यांणीं कलकत्त्याहून खुषकीच्या मार्गानें सैन्य पाठविण्याचें सुरू केलें.

कर्नल गोडर्ड यानें अतिशय संकटें सोसून, ज्या प्रदेशांतून त्याला जावयाचें होतें त्या प्रदेशांतून आपला मार्ग काढिला. तो सुरत येथें येऊन पोंचला. त्यानें अमदाबाद शहर घेतलें आणि मराठे लोकांच्या चाळीस हजार सैन्याचा पराभव केला.

शिंदा व गोहदचा राणा या दोघांत कांहीं बेबनाव होऊन लढाया चालल्या होत्या. गोहदचा राणा इंग्लिशांचे पक्षास मिळाला; यासाठीं त्याच्या मदतीस वारन् हेस्टिंग्झ यांनीं क्यापटन् पोफॉम यास पाठविलें. त्यानें लाहार या नांवाचें

गोहद ( ग्वाल्हेरच्या ईशान्येस २२ मैलांवर ).

लाहार ( का-

लपीच्या पश्चिमेस सुमारें ५० मैलां-वर, ) १७८०.

मजबुद तटबंदीदार शहर घेतलें आणि ग्वाल्हेर-च्या किल्ल्यावर हल्ला केला. हैदराबराबर युद्ध करण्याचें अगत्य पडल्यामुळें व तें युद्ध करण्याचा प्रसंग अगदीं जवळ येऊन ठेपल्यामुळें, मराठ्यांशीं सालबे येथें तह करून युद्ध बंद केलें. त्या तहांतील ठराव असा होता कीं, मराठ्यांचा जो मुलूख युद्धांत घेतला होता त्यांतून बहुतेक त्यांस परत द्यावा, परंतु साष्टी बेट इंग्लिश लोकांकडेसच रहावें.

सालबे ( ग्वाल्हेरी जवळ शिंद्याच्या छावणीचें ठिकाण ) येथील तह १७८२.

तहाचें कलम.

## म्हैसूर येथील दुसरें युद्ध.

### १७८०–८४.

युद्धाचीं कारणें.

१ हैदरानें प्रतिबंध केला असतांही तिकडे लक्ष न देतां, इंग्लिशांनीं फ्रेंच लोकांचें माही हें ठाणें घेण्याविषयीं प्रयत्न केला. हें ठाणें हैदराचे मुलखांत असून, त्याचयाच संरक्षणाखालीं होतें.

२ निजामास मदत करण्याकरितां इंग्लिशांचें सैन्य गैरमाहितीनें हैदराच्या मुलखांतून गेलें.

३ युरोपांत इंग्लंड व फ्रान्स या दोन राष्ट्रांत युद्ध उत्पन्न झाल्यामुळें, फ्रेंच लोकांनीं हैदरास उत्तेजन देऊन मदत केली. बुशी या फ्रेंच सरदारानें त्याच्या सैन्याचें आधिपत्य स्वीकारिलें.

हैदर आपली राजधानी सोडून मद्रासेकडे चाल

जेव्हां हैदरानें श्रीरंगपट्टण सोडिलें, तेव्हां त्याजपाशीं एक लक्ष सैन्य होतें. तो कर्नाटक प्रांत उद्ध्वस्त करीत मद्रासेकडे चालला. या वेळीं

इंग्लिश लोकांची स्थिति फार वाईट होती. त्यांचें सैन्य अगदीं थोडें होतें. त्यांची कोणत्याही प्रकारें आपलें संरक्षण करून घेण्याची तयारी नव्हती. ह्या मोहिमेंत हैदरास पुष्कळ ठिकाणीं जय मिळाला.

करितो व त्याचा कांहीं वेळपर्यंत जय होतो इ. स. १७८०.

यावेळीं कर्नल बेली या नांवाचा एक इंग्लिश सरदार गंटूर येथें होता. त्यास सर हेक्टर मनरो ह्याच्या सैन्यास जाऊन मिळण्याचा हुकूम झाला. तो येत असतां, वाटेंत पेरॅम्बकम् या ठिकाणीं हैदराचा मुलगा टिपू यानें त्याला गांठून त्याचे बहुतेक लोक क्रूरतेनें मारिले. बेली याचा असा पराभव झाल्यामुळें, सर हेक्टर मनरो यास मद्रासेकडे परत यावें लागलें.

गंटूर (कृष्णा नदीच्या कांठीं).

पेरॅम्बकम् (मद्रासेपासून सुमारें ६० मैलांवर) येथें कर्नल बेली याचा पराभव होतो १७८०.

या लढाईविषयीं वारन् हेस्टिंग्झ यांचा एक सारखा प्रयत्न चाललाच होता. त्यांनीं बंगाल इलाख्याचा सेनापती सर आयर कूट् यास पंचवीस दिवसांत सैन्यासह मद्रासेस पाठविलें. ह्यानें बहुतेक किल्ले शत्रूपासून परत मिळविले, परंतु चिलियांब्रम् येथें त्याचा पराभव झाला.

चिलियांब्रम (पोर्टोनोव्होजवळ) येथें सरआयरकूट् याचा पराभव होतो १७८०.

हैदरास पूर्वीं जय मिळाला, यामुळें त्यास थोडासा गर्व होऊन, त्यानें पोर्टोनोव्हो या ठिकाणीं सर आयर कूट् याजवर हल्ला केला, परंतु तेथें हैदराचा अगदीं मोड झाला.

पोर्टोनोव्हो (पांडिचरीच्या दक्षिणेस ३२ मैलांवर) येथील लढाई १७८१.

या लढाईनंतर पालिडोअर येथें जी लढाई झाली, तींत अमुकच पक्षास जय मिळाला असें मुक्रर सांगतां येत नाहीं.

पालिडोअर (मद्रासेपासून सुमारें ५० मैलांवर) येथील लढाई १७८१.

शोलिंगगड(व्हे-ल्होराजवळ) येथील लढाई इ. स. १७८१.

नंतर शोलिंगगड येथें जी लढाई झाली, तींत हैदराचा पुनः पराभव झाला. या लढाईंत त्याचे पांच हजार लोक मेले. इंग्लिशांकडचे फक्त शंभर मेले. या लढाईंत मद्रास येथील विसाव्या काळया पलटणीनें मोठें शौर्य दाखविलें. या गोष्टीच्या स्मरणार्थ तिच्या निशाणावर अद्यापि "शोलिंगगड" हें नांव आहे.

इंग्लिश लोक डच लोकांची साड्रास ( मद्रासचे नैऋत्येस ४२ मैलांवर ) पुलिकत्त आणि निगापट्टण हीं ठाणीं घेतात १७८१.

इंग्लंड व हालंड या दोन देशांत लढाई सुरू झाल्यामुळें, कंपनीच्या सैन्यानें हिंदुस्थानांतील डचलोकांच्या वसाहतींवर हल्ला केला आणि थोडावेळ लढाई झाल्यानंतर, इंग्लिशांनीं पूर्व किनाऱ्यावरील साड्रास, पुलिकत्त आणि निगापट्टण इत्यादि ठाणीं घेतलीं.

कर्नेल ब्राथवेट याचा पराभव १७८२.

इ. स. १७८२ सालच्या नवीन मोहिमेंत कर्नेल ब्राथवेट दोन हजार लोकांनिशीं प्रथमतः तंजावर येथें गेला. या ठिकाणीं त्याला जय मिळाला. परंतु टिपूच्या हेरांनीं त्यास फसविल्यामुळें, तो मोठ्या संकटांत सांपडला. टिपूनें चोहोंकडून त्यास पुष्कळ सैन्यानिशीं वेढिलें आणि त्याचा पराभव केला.

पानियानी(कालिकतचे आग्नयेस ३६ मैलांवर ) येथील लढाई. इ. स. १७८२.

टेलिचेरी ( पश्चिम किनाऱ्यावर माहीजवळ ).

नाईर लोक व टेलिचरी येथील इंग्लिश लोक यांस मदत करण्याकरितां मेजर आबिंगटन् हा पश्चिम किन्याऱ्यावर येऊन पोंचला. टेलिचरी येथें जे इंग्लिश लोक होते त्यांनीं शूरपणें हा वेळ पर्यंत शत्रूंचें कांहीं चालूं न देतां, आपलें संरक्षण केलें. टिपूनें मेजर आबिंगटन् याचा एकदम पाठलाग केला. या दोघांमध्यें पानियानीं येथें

हा. ... आ

लढाई झाली. तींत टिपूचा अगदीं पराभव झाला.

या वेळेच्या सुमारास हैदर चितूर येथें मरण पावला, यामुळें टिपू एकदम कर्नाटकांत आला. त्याला म्हैसूरचा राजा असें सर्वांनीं कबूल केलें. नंतर तो पश्चिमेकडे गेला. कर्नल् स्टुअर्ट यानें ही संधी व्यर्थ घालविली.

हैदराचा मृत्यु १७८२. चितूर (मद्रासचे पश्चिमेचे बाजूस).

इंग्लिश लोकांस दुसरें संकट सोसावें लागलें. जनरल् म्याथ्यु यानें, पश्चिमेकडून म्हैसूर प्रांतांत शिरून बेदनूर येथील मजबूद किल्ला घेतला. परंतु शत्रू फार जवळ आहे, असें न समजल्यामुळें तो स्वस्थ बसला. इतक्यांत एकाएकीं टिपूनें त्या किल्ल्यास वेढा दिला आणि त्याजवर हल्ला केला; तेव्हां जनरल् म्याथ्यु यास शरण जाणें भाग पडलें. टिपूनें ठरविलेलीं कलमें फार कठीण नव्हतीं, परंतु त्यांप्रमाणें तो चालला नाहीं.

बेदनूर येथें जनरल् म्याथ्यु याचा पराभव १७८३.

कर्नल क्यांबेल यानें मंगळूरचें शूरपणें संरक्षण केलें होतें. परंतु अखेरीस अन्नसामुग्रीची कमताई पडल्यामुळें त्याला तो किल्ला सोडून द्यावा लागला.

मंगळूरचें संरक्षण १७८३.

अशा प्रकारचे जय अपजय झाल्यानंतर दोन्हीं पक्ष तह करण्यास राजी झाले. टिपूला जरी पुष्कळ जय मिळाले होते, तरी या वेळेच्या सुमारास फ्रान्स व इंग्लंड यांमध्यें तह झाल्यामुळें त्याचे मुख्य साहाय्यकर्ते फ्रेंच लोक यांनीं त्याचा पक्ष सोडिला. शिवाय इंग्लिश लोकांचा सरदार कर्नल फुलरटन् हा टिपूशीं लढण्याकरितां

मंगळूरचा तह १७८४.

अद्यापि समरंगणांत होताच व त्याला पुष्कळ जयही मिळूं लागले होते. यामुळें मंगळूर येथें तह झाला. त्यांतील मुख्य कलमें अशीं होतीं कीं,

तहाचीं कलमें.

१ लढाईंत दोन्हीं पक्षांनीं एकमेकांचा घेतलेला मुलुख ज्यांचा त्यांस परत द्यावा.

२ टिपूनें सर्व इंग्लिश बंदिवान सोडून द्यावे.

३ या तहाचीं कलमें प्रत्येक पक्षाकडील साह्यकारी लोकांस लागू असावीं.

वारन् हेस्टिंग्झ यांच्या कारकिर्दीतील दुसऱ्या ध्यानांत ठेवण्या जोग्या गोष्टी.

हैदर व टिपू यांजबरोबर लढाई चालली असतां, कंपनीचा खजीना रिकामा पडला. वारन् हेस्टिंग्झ यांस लढाईचा खर्च भागविण्याचें आणि सैन्यास दारूगोळा व अन्नसामग्री पुरविण्याचें मोठें संकट पडलें.

एतद्देशीय राजांस पैसा देण्याविषयीं विनंती.

या कारणास्तव त्यांनीं एतद्देशीय संस्थानिकांस पैशाची मदत करण्याविषयीं विनंति केली. त्यांत विशेषेंकरून काशीचा राजा चेतसिंग आणि अयोध्येचा सुभेदार अझुफउद्दवला, यांजपाशीं मदत मागितली. कारण काशी प्रांत चेतसिंग यास कंपनीकडून मिळाला होता; आणि अझुफउद्दवला याजकडून पूर्वीं करार केलेली रकम येणें होती. या विनंतीस दोघांनींही रुकार दिला नाहीं; ह्मणून या कामाची व्यवस्था करण्याकरितां जेव्हां वारन् हेस्टिंग्झ हे खुद्द काशीस गेले तेव्हां चेतसिंग यानें लोकांस बंड करण्यास उत्तेजन दिलें. या बंडाच्या तडाक्यांतून वारन् हेस्टिंग्झ यांचा जीव मोठ्या प्रयासानें बचावला गेला. पुढें शांतता करण्याकरितां

सैन्याची मदत योग्य वेळीं येऊन पोंचली. इंग्लिशांचें सैन्य पाहिल्याबराबर चेतसिंग पळून गेला. याकरितां वारन् हेस्टिंग्झ यांनीं त्याच्या गादीवर त्याच्या भाच्यास बसविलें आणि काशीची वार्षिक खंडणी वाढविली.

वारन् हेस्टिंग्झ अझुफउद्दवला यास पैसा काढण्याची मसलत सांगतो.

अझुफउद्दवला याजपाशीं जेव्हां वारन् हेस्टिंग्झ यांनीं पैसा मागितला, तेव्हां त्यानें आपल्यापाशीं पैसा नाहीं अशी सबब सांगितली. यास्तव वारन् हेस्टिंग्झ यांनीं त्यास आपल्या आजी व आई जवळ पैसा मागण्यास सांगितलें. या दोघी स्त्रियांचे हातीं सुजाउद्दवला मेल्यानंतर, त्याचा वीस लाख रुपयांचा खजीना आला होता. या पैशापैकीं कांहीं रकम देण्यास त्या दोघीही राजी होईनात. यास्तव वारन् हेस्टिंग्झ व अझुफउद्दवला या दोघांनीं बलात्कार करून त्यांजपासून पैसा काढिला.

वारन् हेस्टिंग्झ इंग्लंडास परत जातात इ० स. १७८५.

मंगळूर येथील तह झाल्यानंतर दुसऱ्या वर्षी वारन् हेस्टिंग्झ याजला इंग्लंडास परत बोलाविलें. या वेळीं देशांत स्वस्थता झाली होती. जेव्हां या राजकारस्थानी मनुष्यानें आपलें काम सोडिलें तेव्हां ते असें ह्मणाले कीं, " कर्नाटक प्रांत शत्रूच्या हातीं गेला असतां, मी सोडविला; आणि या देशांतील कंपनीच्या राज्याचें संरक्षण करून तें वाढविलें" हें त्यांचें ह्मणणें रास्त होतें आणि याविषयीं हिंदुस्थानांत कोणीही शंका घेतली नाहीं. ते हिंदुस्थान सोडून स्वदेशीं गेले, यामुळें सर्व लोकांस खरोखर दुःख झालें.

इंग्लंडांत त्यांचे पुष्कळ शत्रु होते, त्यांत विशेषेंकरून मिस्तर फ्रान्सिस् हा एक होता. तो कौन्सिलदार असतां नेहमी त्यांचा द्वेष करीत असे. वारन् हेस्टिंग्झ यांनीं राज्यकारभार वाईट रीतीनें चालविला व एतद्देशीय राजांना वाईट रीतीनें वागविलें, असे दोन आरोप आणून त्याबद्दल त्यांची चौकशी व्हावी ह्मणून त्यानें खटपट केली व ती सिद्धीस गेली.

यांची चौकशी व दोष मुक्तता.

हीं चौकशी दहा वर्षेंपर्यंत चालली होती. चौकशी अंतीं ते दोषास पात्र नाहींत असें ठरलें.

पार्लमेंट या नांवांची इंग्लडांत एक मोठी सभा आहे. हिच्या मार्फत सर्व राष्ट्राचा कारभार चालतो. हींत खुद्द महाराणि साहेब. बडे लोक व साधारण प्रतीचे लोक असतात.

वारन् हेस्टिंग्झ यांच्या कारकीर्दीच्या अखेरीस हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविण्याचे बाबतींत पार्लमेंट सभेंत वारंवार वादविवाद होत असे, यामुळें त्या सभेंतील बहुतेक प्रमुख सभासदांचें मन या गोष्टीकडे लागलें व खालीं लिहिलेलीं दोन बिलें ( कायद्यांचे खर्डे ) पार्लमेंट सभेपुढें आलीं.

फॉक्सचें बील इ. स. १७८३.

या वेळेच्या सुमारास फॉक्स ह्मणून एक मोठा विख्यात वक्ता व मुत्सद्दी होता; तो राज्यांतील मुख्य कारभारी होता. यानें हिंदुस्थानचा राज्यकारभार कंपनीकडून काढून खुद्द राजाकडे द्यावा अशा मतलबाचें एक बील पार्लमेंट सभेपुढें आणिलें परंतु तें सर्व सभासदांच्या अनुमतानें मंजूर झालें नाहीं.

पिट याचें बील १७८४.

पुढील वर्षी पिट या नांवाचा गृहस्थ फॉक्स याचें काम पाहूं लागला. यानें पूर्वीच्या बिलांत फेरफार करून, तें पार्लमेंट सभेपुढें सादर

केलें व तें मंजूर झालें. या बिलावरून ईस्ट इंडिया कंपनीचा अधिकार कायम केला; परंतु "बोर्ड आफ् कंट्रोल" या नांवाची एक सभा स्थापन केली. यांतील सभासदांची नेमणूक करण्याचा अधिकार राजाकडे ठेविला आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या कोर्ट आफ् डैरेक्टर्स या सभेच्या कामावर देखरेख करण्याचें काम या सभेकडे असावें असें ठरविलें.

बोर्ड आफ् कं-ट्रोल.

वारन् हेस्टिंग्झ हे इंग्लंडास गेल्यावर वीस महिनेपर्यंत त्यांचें काम सरजॉन म्याक्फर्सन यांनीं चालविलें.

सरजॉन म्याक्-फर्सन.

## भाग २१ वा

### लार्ड कार्नवालिस यांची कारकीर्द.

### १७८६–९३.

### १ म्हैसूर येथील तिसरें युद्ध.

### १७९०–९२.

### २ वसुलाच्या बाबतींत फेरफार.

नवीन गव्हरनर जनरल् लॉर्ड कॉर्नवॉलिस हे इ. स. १७८६ या वर्षीं हिंदुस्थानांत आले. देशांत स्वस्थता राखावी असा यांचा मनापासून उद्देश होता, आणि असें करण्याविषयीं विलायत सरकारचीही यांना सक्त ताकीद होती; परंतु टिपूनें यांना लढाई करण्याचें अगत्य पाडिलें.

लॉर्ड कार्नवालीस, दुसरे गवरनर जनरल्, यांची राज्य कारभार चालविण्याची पद्धत.

१ इंग्लिश लोकांविषयीं टिपूच्या मनांत नेहमीं अतिशय द्वेषभाव असे; आणि इ. स.

लढाईचीं कारणें.

१७८४ या वर्षी जो त्याजबराबर तह झाला, त्या दिवसापासून तो नवीन हल्ला करण्याच्या तयारींत होता.

कुर्ग ( म्हैसूरच्या ईशान्येस. )

२ कानडा, कुर्ग आणि कोचीन या प्रांतांतील नाईर ह्मणून कोणी कुलवान हिंदुलोक होते, ते त्याचा अधिकार कबूल करिनात व मुसलमानी धर्म स्वीकारिनात. याजकरितां त्या लोकांस तो उपद्रव देऊं लागला. यामुळें त्या प्रांतांतील पुष्कळ लोक आपलीं घरेंदारें सोडून त्रावणकोर येथील राजाकडे गेले आणि त्यापासून त्यांना आश्रय मिळाला. याकरितां टिपूनें त्रावणकोरचे राज्यावर हल्ला केला. त्या राजानें आपल्या व म्हैसूरचे राज्यामध्यें जी भिंत घातली होती त्या भिंतीचा नाश करून टिपूनें आपल्या सैन्यास जाण्यास वाट काढिली; आणि त्याच्या राज्यांत शिरून नेहेमींप्रमाणें आपल्या रानटीपणाच्या लुटालुटीस आरंभ केला.

त्रावणकोर येथील राजा इंग्लिशांचे पक्षाकडे होता. यामुळें लॉर्ड कॉर्नवॉलीस यांना त्याचें संरक्षण करणें अवश्य होतें. सामोपचाराचें बोलणें जेव्हां टिपूनें ऐकिलें नाहीं तेव्हां लढाई करणें त्यांना भाग पडलें.

बंगळूर शहर घेतलें १७९१.

सैन्याचें आधिपत्य स्वतः लॉर्ड कॉर्नवॉलिस यांनीं स्वीकारिलें. निजाम व मराठे यांबराबर एकी करून, त्यांनीं त्यांस आपल्या पक्षाकडे आणून टिपूच्या राज्यावर चाल केली आणि बंगळूर शहरावर हल्ला करून तें घेतलें.

टिपूच्या सैन्यानें अडथळा केला असतांही त्यास न जुमानितां त्यांनीं एकदम टिपूची राजधानी श्रीरंगपट्टण याजवर चाल करून त्यास वेढा घातला. परंतु त्यांच्या सैन्यांत आजार उद्भवल्यामुळें व अन्नसामुग्रीची कमताई पडल्यामुळें त्यांस पुन्हा बंगळूरास परत यावें लागलें.

श्रीरंगपट्टणावर चाल.

नवीन हल्ल्याची तयारी चालली असतां लॉर्ड कार्नवॉलिस यांनीं नंदीदुर्ग या नांवाच्या बळकट किल्ल्यावर हल्ला करून तो घेतला.

नंदीदुर्ग (बंगळूरचे ईशान्येस ३१ मैलांवर ) येथील किल्ला घेतला १७९१. श्रीरंगपट्टणावर दुसरा हल्ला १७९२.

निजामाच्या सैन्याची मदत येऊन मिळाल्यावर आणि दारुगोळा व अन्नसामुग्री यांचा नवीन पुरवठा मिळाल्यावर, पुढील वर्षी त्यानें पुन्हा श्रीरंगपट्टणावर चाल केली. पश्चिमेकडून कुर्गच्या राजाची मदत घेऊन जनरल् आबरक्रांबे हा येत होता.

परंतु जेव्हां हल्ला करण्याची सर्व तयारी झाली, तेव्हां टिपूचें धैर्य खचलें आणि त्यानें तहाविषयीं बोलणें चालविलें. नंतर पूर्वीपेक्षां खालीं लिहिल्याप्रमाणें कडक अटींचा त्याजबराबर तह केला.

श्रीरंगपट्टण येथील तह १७९२.

१ टिपूनें आपलें अर्धें राज्य इंग्लिश व त्यांच्या पक्षाकडील लोकांस द्यावें.

तहाचीं कलमें.

२ लढाईच्या खर्चाबद्दल तीन कोट आणि तीस लाख रुपये द्यावे.

३ सर्व बंदिवान सोडून द्यावे.

४ या तहाच्या सर्व अटी पुऱ्या होईपर्यंत त्यानें आपले दोन मुलगे ओलीस द्यावे.

वसुल घेण्याच्या बावतींत फेरफार इ० स० १७९२.

लॉर्ड कॉर्नवॉलिस यांनीं आपल्या कारकीर्दीच्या शेवटच्या वर्षीं मुलकी खात्यांत वसुलाच्या बाबतींत खालीं लिहिलेल्या तीन नवीन पद्धती सुरू केल्या.

जमेदारी.

जमेदारी ह्मणजे कांहीं प्रांत एका जमीनदाराकडे लावून दिला असतो व त्या प्रांताच्या वसुलाबद्दल जबाबदारीही त्याजकडेसच असते.

खेडेवारी.

ह्या पद्धतीच्या योगेंकरून प्रत्येक खेड्यांतील लोक त्या खेड्याच्या वसुलाबद्दल जबाबदार असतात.

रयतवारी.

रयतवारी, ह्मणजे प्रत्येक जमिनीचा जो लागवड करणारा असतो त्याच्याच शिरावर त्या जमिनीच्या साऱ्याचें जोखीम असतें.

यांतील पहिली पद्धत लॉर्ड कार्नवालिस यांनीं बंगाल प्रांतांत सुरू केली. रयतवारी मद्रासइलाख्यांत चालू केली; आणि हल्लींही ती दक्षिण हिंदुस्थानांत चालू आहे.

---

## भाग २२ वा.

## सर जान शोअर १७९३–९८.

सर जान शोअर तिसरे गव्हरनर जनरल्.

नवीन गव्हरनर जनरल् सर जान शोअर हे मुलकी खात्यांतील प्रसिद्ध कामदार होते. त्यांचेंही मत लॉर्ड कार्नवालिस यांच्याप्रमाणें देशांत जितकी शांतता असेल तितकी असावी असें होतें. परंतु त्यांचें हें मत वाजवीपेक्षां फाजील होतें. त्यांनीं आपल्या पक्षाकडील लोकांस योग्य मदत दे-

ण्याविषयीं हयगय केली. निजामावर जेव्हां मराठ्यांनीं हल्ला केला, तेव्हां इंग्लिशांनीं जी त्यांना मदत द्यावयाची ती दिली नाहीं. यामुळें त्याजला मराठ्यांशीं फार लज्जास्पद असा तह करावा लागला. यामुळें त्याला इतका राग आला कीं, त्याच्या मदतीकरितां शिकंदराबाद येथें जी इंग्लिश लोकांची फौज ठेविली होती, तिला त्यानें एकदम शिकंदराबाद सोडून जाण्याविषयीं हुकूम केला. तो फ्रेंचांच्या पक्षाकडे मिळण्याच्या बेतांत होता, इतक्यांत सुदैवेंकरून लॉर्ड मार्निंगटन्, ज्यांना पुढें मार्क्किस आफ् वेलस्ली, असा किताब मिळाला, ते सर जान शोअर यांच्या कामावर योग्य वेळीं आले.

शिकंदराबाद (निजाम हैदराबादेजवळ इंग्लिशांच्या छावणीचें गांव).

---

## भाग २३ वा.

**मार्क्किस आफ् वेलस्ली १७९८–१८०५.**

१ म्हैसूर येथील शेवटलें युद्ध १७९८–९९.

२ कर्नाटकप्रांत इंग्लिशराज्यास जोडिला १८०१.

३ मराठ्यांशीं दुसरें युद्ध १८०२–१८०५.

मार्क्किस आफ् वेलस्ली, चवथे गव्हरनर जनरल्.

मार्क्किस आफ् वेलस्ली यांचें मत सर जान शोअर यांच्या मताहून अगदीं भिन्न होतें. त्यांनीं निजामाबरोबर नवीन तह केला. त्या तहाच्या योगानें—

१ इंग्लिश लोकांची फौज शिकंदराबाद येथें परत आली.

२ फ्रेंच लोकांच्या छावणीस वेढा देऊन

त्यांचीं हत्यारें काढून घेतलीं आणि त्यांतील कामदारांना कैद करून कलकत्त्यास नेलें.

## म्हैसूर येथील शेवटचें युद्ध.

## १७९८–९९.

लढाईचीं कारणें.

१ टिपूची अद्यापि खोडकी जिरली नव्हती. कोणत्याही कारणानें इंग्लिशांबराबर लढाईचा प्रसंग केव्हां येईल याची तो वाट पहात बसला होता.

२ टिपूस फ्रेंच लोकांची मदत मिळाली होती आणि त्यानें नेपोलियनाबराबर पत्रव्यवहार ठेविला होता.

३ निजाम आणि मराठे यांना आपल्या पक्षाकडे आणण्याविषयीं त्यानें खटपट चालविली होती. या गोष्टीच्या खुलाशाविषयीं गव्हरनर जनरल् यांनीं त्याला सामोपचारानें विचारिलें असतां, त्यानें दांडगाईचा व मगरूरीचा जबाब दिला. यामुळें लढाईवांचून दुसरा उपायच राहिला नाहीं. या मोहिमेच्या तयारीची देखरेख करण्याकरितां लॉर्ड मार्निंगटन् स्वतः मद्रासेस आले.

लढाईची तयारी.

व्हेल्लोर येथून वीस हजार सैन्य पाठविण्याची तयारी चालली होती. त्यांना निजामाच्या मुलखांतून सोळा हजार लोक येऊन मिळावयाचे होते. या सैन्याचा अधिकारी आर्थर वेलस्ली ( ज्यांना नंतर ड्युक आफ् वेलिंगटन् ही पदवी मिळाली ) हे होते.

मुंबईहून जनरल् स्टुअर्ट याजला थोडेसें सैन्य देऊन म्हैसूर प्रांतांत पाठविला. एकंदर सैन्याचा अधिकार जनरल् हारिस् याजकडे दिला होता.

पश्चिमेकडे सिद्धेश्वर येथें जनरल् स्टुअर्ट यानें प्रथमतः टिपूचा पराभव केला.

सिद्धेश्वर ( म्हैसूरच्या पश्चिमेस ) येथें टिपूचा पराभव इ० स० १७९८.

नंतर तो कर्नाटकांत जाण्याचा प्रयत्न करीत असतां जनरल् हारिस् याणें त्याचा मालाव्हेली येथें पराभव केला.

मालाव्हेली(श्रीरंगपट्टणचे पूर्वेस) येथील लढाई इ० स० १७९८.

या लढाईनंतर इंग्लिशांनीं श्रीरंगपट्टणावर चाल केली. टिपूही आपल्या राजधानीचें संरक्षण करण्याकरितां त्या ठिकाणीं आला. इंग्लिशांनीं एकदम श्रीरंगपट्टणावर हल्ला केला व निकराची लढाई करून तें शहर घेतलें. लढाईंत मेलेल्या लोकांत टिपूचें प्रेत सांपडलें.

श्रीरंगपट्टण घेतलें. इ० स० १७९९.

टिपूचा मृत्यु इ. स. १७९९.

यानंतर म्हैसूरच्या राज्याचे तीन विभाग केले. त्यांतून एक विभाग निजामास दिला. दुसरा विभाग इंग्लिशांनीं आपलेकडे ठेविला आणि तिसरा विभाग ज्या पूर्वीच्या हिंदु राजास हैदरानें पदच्युत केलें होतें त्याच्या मुलास दिला.

म्हैसुरच्या राज्याचे विभाग.

यानंतर दोन वर्षांनीं निजामाबराबर नवीन तह केला. शिकंदराबाद येथें त्याच्या मुलखाच्या संरक्षणार्थ जी इंग्लिशांची फौज ठेविली होती, तिच्या खर्चाबद्दल त्याजकडून जो पैसा पोंचावयाचा तो वेळचे वेळेवर नियमितपणें पोंचत नसें; यास्तव त्याला म्हैसूरच्या राज्याच्या वि-

निजामाबरोबर तह इ. स. १८०१.

भागांत जो मुलूख मिळाला होता तो सैन्याच्या खर्चाबद्दल इंग्लिशांस तोडून द्यावा लागला.

कर्नाटक प्रांत इंग्लिश आपल्या ताब्यात घेतात इ. स. १८०१

महंमदअल्ली याचा मुलगा उमदतउलउमराव हा मरण पावल्यावर कर्नाटकांतील राज्यकारभार फार वाईट रीतीनें चालला होता. शिवाय तेथील राजानें इंग्लिशांस न कळूं देतां, टिपूबराबर फितुरीचा पत्रव्यवहार ठेविला होता. उमदतउलउमराव याचा मुलगा इंग्लिशांनीं सांगितलेल्या करारांस कबूल होईना, याकरितां त्यास पदच्युत करून महंमदअल्लीचा दुसरा नातू अजीमउद्दवला यास नांवाचा मात्र नबाबकरून ठेविलें आणि अंगोलीपासून केप कामोरिनपर्यंत सर्व कर्नाटक प्रांत कंपनीच्या राज्यास जोडिला.

अंगोली ( गंटूरचे आग्नेयेस पूर्व किनाऱ्यावर. )

## मराठ्यांशीं दुसरें युद्ध.

### १८०२–१८०५.

लढाईचें कारण

या वेळच्या सुमारास पुणें येथील पेशव्याचा अधिकार बळकावण्याविषयीं दौलतराव शिंदा आणि येशवंतराव होळकर हे दोन बलाढ्य सरदार उत्पन्न झाले. होळकरानें पेशव्यास पुण्यांतून हाकून दिलें, यामुळें मदतीकरितां इंग्लिशांकडे जाऊन त्यानें त्यांजबराबर वसई मुक्कामीं तह केला.

वसई ( मुंबईनजीक) येथील तह १८०२.

या तहांत पुढील करार करून घेऊन इंग्लिशांनीं पेशव्यांस पुन्हा त्याच्या गादीवर बसविण्याचें कबूल केलें.

तहाचीं कलमें.

१ पेशव्यानें आपल्या राज्यांत आपल्या संरक्षणार्थ इंग्लिशांची फौज ठेवून घ्यावी.

२ आपल्या दरबारांतून इंग्लिशांखेरीज सर्व युरोपियन लोकांस घालवून द्यावें.

३ सुरत आणि मुंबई ह्या दोन शहरांवर जे पेशव्याचे हक्क असतील ते त्यानें सोडून द्यावे. ( या वेळीं हीं शहरें इंग्लिशांच्याच ताब्यांत होतीं. )

शिंदा व वऱ्हाडचा राजा यांजबरोबर लढाई इ. स. १८०३.

इंग्लिश लोकांनीं जेव्हां लढाईची तयारी चालविली तेव्हां होळकर पळून गेला. शिंदा व वऱ्हाडचा राजा रघोजी भोंसला या दोघांस वसईचा तह आपल्यास अपमानदायक आहे, असें वाटल्यावरून दोघेही लढाईस सिद्ध झाले आणि संरक्षणाची तजवीज करूं लागले.

असई ( जालन्याचे उत्तरेस २८ मैलांवर ) येथील लढाई इ. स. १८०३.

जनरल् वेलस्ली हा म्हैसूर येथून येत असतां, असई येथें त्याची व शत्रूची गांठ पडली. शत्रूकडील सैन्य जरी पन्नास हजार होतें, तरी त्यानें त्या ठिकाणीं लढाई दिली आणि शत्रूचा पराभव केला. या लढाईंत शिंद्याकडील बाराशें लोक मेले. आजपर्यंत ज्या प्रसिद्ध व ध्यानांत ठेवण्याजोग्या लढाया झाल्या त्यांतीलच ही एक होय.

अलीगड ( आग्र्याचे उत्तरेस ५३ मैलांवर ) येथील लढाई इ० स० १८०३.

जनरल् लेक् हा अयोध्या प्रांतांतून येत असतां त्यानें प्रथमतः उत्तरेंत अलीगड येथील किल्ल्यास वेढा घालून तो घेतला. या किल्ल्यावरील पेरान या नांवाचा एक फ्रेंच सरदार आपले दोन हजार लोक पडल्यावर इंग्लिशांचे स्वाधीन झाला.

दिल्ली येथील लढाई. इ० स० १८०३.

अलीगड येथील लढाई नंतर जनरल् लेक् यानें मराठ्यांच्या सैन्याचा दिल्लीजवळ पराभव केला. या सैन्याचा अधिकार बोरकू या नांवाच्या फ्रेंच सरदाराकडे होता. या लढाईंत शत्रूचें सैन्य एकोणीस हजार होतें व इंग्लिशांकडील चार हजार पांचशें होतें. या लढाईनंतर दिल्ली शहर इंग्लिशांच्या ताब्यांत आलें. बोरकू आणि दुसरे चार फ्रेंच कामदार यांस त्यांनीं कैद केलें व मराठे सरदारांनीं बंदिवानाप्रमाणें ठेविलेल्या शाहाअलम बादशाहास मोकळें केलें आणि त्याला प्रति वर्षास बारा लाख रुपयांची नेमणूक करून दिली.

लासवारी (आग्र्याचे वायव्येस ७३ मैलांवर) येथील लढाई. इ० स० १८०३.

आग्र्याकडे येत असतां जनरल् लेक् यानें लासवारी येथें दक्षिणेंतील "अजिंक्य" असें नांव धारण करणाऱ्या मराठ्यांच्या सैन्याचा तिसऱ्यानें पराभव केला. या ठिकाणीं शत्रूंनीं मोठ्या निकरानें युद्ध केलें. परंतु सरते शेवटीं त्यांचा अशा पूर्ण रीतीनें पराभव झाला कीं, उत्तरेकडील शिंद्याचें सैन्य अगदीं नाहींसें झालें.

आरगांव (एलीचपुरापासून ३८ मैलांवर) येथील लढाई. इ. स. १८०३

या प्रकारें उत्तरेकडे जनरल् लेक् यास एका पाठीमागून एक असे जय मिळत चालले असतां दक्षिणेंत जनरल् वेलस्ली यानें असईच्या लढाईनंतर आरगांव येथें शिंद्याच्या फौजेचा पराभव केला. ग्वाल्हेर येथील मजबूत किल्ला घेतला आणि वऱ्हाडच्या राजास तह करण्याचें अगत्य पाडिलें.

१ वऱ्हाडच्या राजानें कटकवरील आपले सर्व हक्क सोडून द्यावे.

२ आपल्या पदरच्या इंग्लिशांखेरीज सर्व युरोपियन लोकांस चाकरीवरून काढून टाकावें.

३ इंग्लिशांच्या पक्षाकडील विश्वासू निजाम यास पुष्कळ प्रदेश द्यावा.

वऱ्हाडच्या राजाबराबर झालेल्या तहाचीं कलमें इ.स. १८०३.

शिंद्यालाही शरण येऊन तह करणें भाग पडलें.

१ गंगा आणि यमुना या नद्यांमधील प्रदेश इंग्लिशांस द्यावा.

२ इंग्लिश सरकार आणि इंग्लिश सरकारच्या पक्षाकडील निजाम, गायकवाड आणि पेशवे यांच्या दरबारांतील सर्व हक्क सोडून द्यावे.

३ पेशव्याबरावर जो त्याचा कज्जा असेल तो त्यानें इंग्लिशांस कळवावा.

शिंद्याबराबर झालेल्या तहाचीं कलमें इ.स.१८०३.

शिंदा व वऱ्हाडचा राजा यांजबराबर लढाई चालू असतां होळकर स्वस्थ बसला होता. परंतु आतां त्यानें फारच मगरुरी दाखविली. इंग्लिशांचे तर्फे जीं तहाचीं बोलणीं चाललीं होतीं, त्यांविषयीं तो उडवाउडवीचीं उत्तरें देऊं लागला. त्याच्या पदरीं नव्वद हजार सैन्य होतें, आणि नुकत्याच झालेल्या रक्तस्रावाच्या लढायांत आपल्या दोन्ही शत्रूंचे पक्ष दुर्बळ झाले आहेत; असें समजून आपणास सहज जय मिळेल असें त्यास वाटलें.

होळकरा बराबर लढाई इ०स० १८०४.

लढाईच्या आरंभीं काहीं ठिकाणीं होळकरास जय मिळाले. इंग्लिशांचे पक्षाकडील जयपूरचा

जयपूर ( रजपुत स्थानांत ).

राजा, याच्या मुलखांत जी होळकराची फौज लुटालूट करीत होती, तिचा पाठलाग कर्नल् मानसन् हा करीत होता. याच्या मनांत कर्नल् मरे यास जाऊन मिळावें असें होतें. कर्नल् मरे यास गुजराथेंतून उज्जनीकडे जाण्याचा हुकूम झाला होता, परंतु तो परत गेल्यामुळें कर्नल् मानसन् याचा बेत सिद्धीस गेला नाहीं. जेव्हां तो कोटा आणि नीमच यांजमधील फार कठीण व खडकाळ अशा मुकुंदरा घांटांत येऊन पोंचला, तेव्हां आपणास होळकराच्या सैन्यानें वेढिलें आहे असें त्यास आढळून आलें. त्याच्या हाताखालील सैन्यानें परत येत असतां जरी आपलें शूरपणें संरक्षण करून घेतलें, तरी अन्नाचा तोटा, अशक्तता आणि शत्रूचे एक सारखे हल्ले, यांपासून त्यांस इतकें दुःख भोगावें लागलें कीं, सर्व सैन्यापैकीं थोडे लोक आग्रा येथें जाऊन पोंचले.

उज्जनी ( माळवा प्रांतांत ).

मुकुंदराघाटांतील संकट. कोटा ( चंबळा नदीचे कांठीं ). नीमच ( माळवा प्रांतांत).

यानंतर होळकरानें दिल्ली शहरावर हल्ला केला; परंतु या कामांत त्यास यश आलें नाहीं. कर्नल् आक्टरलोनी आणि कर्नल् बर्न्स या दोन सरदारांनीं त्या शहराचें अशा शूरपणें संरक्षण केलें कीं, त्याला एक आठवड्यानंतर परत जावें लागलें.

होळकर दिल्लीवर हल्ला करितो परंतु त्यास मागें परतावें लागतें.

होळकरावर इंग्लिश फौजेच्या दोन टोळ्यांनीं हल्ला केला. जनरल् लेक् यानें त्याच्या घोडेस्वारांचा पाठलाग केला आणि त्यांनां फरकाबाद येथें गांठून त्यांचा पराभव केला. त्यां-

फरकाबाद (गंगेच्या कांठीं) आणि डीग ( आग्र्याचे वायव्येस

ऱ्या पायदळाचा जनरल् फ्रेजर यानें डीगजवळ जी लढाई झाली तींत नाश करून टाकिला.

५७ मैलांवर) येथील लढाया इ.स. १८०४.

डीग हें शहर व तेथील किल्ला हीं भरतपूरचे राजाचे ताब्यांत होतीं. वरील लढाया झाल्यानंतर इंग्लिशांनीं यांवरही हल्ला करून तीं घेतलीं. होळकराबराबर लढाई चालली असतां, त्यास भरतपूर येथील राजानें मदत दिली. याबद्दल त्यास शिक्षा करण्याकरितां भरतपुरावरही हल्ला केला; परंतु तेथील किल्ल्याच्या मातीच्या भिंती फार मजबूत असल्यामुळें इंग्लिश लोकांनीं जरी त्यावर बरेच हल्ले केले आणि त्या प्रयत्नांत तीन हजार लोक पडले, तरी तटास गोळा लागू होईना. याजकरितां इंग्लिश लोक त्या किल्ल्यास वेढा देऊन बसले. हा वेढा तीन महिनेपर्यंत होता. यानंतर तेथील राजानें तहाचें बोलणें लाविलें. इंग्लिशांनीं तें बोलणें मान्य केलें आणि खालीं लिहिलेलीं तहाचीं कलमें ठरविलीं.

भरतपूर (आग्र्याचे वायव्येस ३१ मैलांवर).

भरतपूरचा पहिला वेढा इ. स० १८०५.

१५२०७

१ भरतपूर येथील राजानें इंग्लिशांस वीस लाख रुपये द्यावे.

तहाचीं कलमें १८०५.

२ इंग्लिशांनीं जो त्याला पूर्वीं मुलूख दिला होता त्यांतून कांहीं त्यानें सोडून द्यावा.

३ वरील करार पुरे होत तोंपर्यंत डीग हें शहर इंग्लिशांचें ताब्यांत असावें.

इकडे असा प्रकार चालला असतां दक्षिणेंत आणि माळव्यांतही लढाई सुरू होती. तींत इंग्लिशांसच जय मिळाला. कर्नल् वालेस् यानें चांदा, जालना आणि दक्षिणेंतील होळकराचीं

चांदा ( वर्धा-

नदीचे कांठीं मोठें शहर आहे. येथें आलिकडे कोळशाच्या खाणी सांपडल्या आहेत. यास चंद्रपूर असेंही ह्मणतात ). जालना ( औरंगाबादेचे वायव्येस ४० मैलांवर ).

सर्व ठाणीं घेतलीं. कर्नल् मरे यानें उज्जनी, होळकराची राजधानी इंदूर आणि सर्व माळवा प्रांत घेतला.

भरतपूर येथील राजाबरोबर तह झाल्यानंतर जनरल् लेक्, ज्याला या वेळेच्या सुमारास लॉर्ड ही पदवी मिळाली होती, त्यानें शिंदा व होळकर यांचा पाठलाग केला. शिंदा पुनः इंग्लिशांवर उठला होता.

मार्किस ऑफ् वेलस्ली इंग्लंडास परत जातात इ. स. १८०५.

अशा प्रकारें लढाई सुरू असतां मार्किस ऑफ् वेलस्ली हे इ० स० १८०५ या वर्षी इंग्लंडास परत गेले.

इंग्लिश सरकारास देशांत स्वस्थता व्हावी अशी फार इच्छा होती, यामुळें ईस्ट इंडिया कंपनीनें मार्किस आफ कॉर्नवालीस यांस पुन्हा त्यांचे मागून गव्हनर जनरल्‌चे कामावर पाठविलें.

मार्किस आफ कार्नवालीस हिंदुस्थानांत पुन्हा गव्हरनरजनरल्‌चे कामावर येतात, परंतु थोड्याच दिवसांत मरण पावतात १८०५.

त्यांना लढाई बंद झाली असतां करावी असा हुकूम झाला होता. हिंदुस्थानांत आल्यावर मार्किस आफ कार्नवालीस हे लौकरच मरण पावले. त्यांचे मागून सर जार्ज बार्लो हे गव्हरनर जनरल् झाले.

## भाग २४.

### सर जार्ज बार्लो १८०५–१८०७

सर जार्ज बार्लो, पांचवे गव्हरनर जनरल्.

नवीन गव्हरनर जनरल् सर जार्ज बार्लो यांनीं लार्ड कार्नवालीस यांचे जे बेत होते, ते सिद्धीस नेले. होळकर व शिंदा यांजबरोबर त्यांस फार अनुकूल अशा रीतीचे तह केले.

१ पूर्वी लार्ड वेल्स्ली यांजबराबर झालेला तह कायम केला.

२ ग्वालेरचा किल्ला शिंद्यास परत दिला; व गोहदचा राणा राज्यकारभार चालविण्यास अयोग्य वाटवल्यावरून, त्याचा मुलूख काढून घेऊन, त्यांतून कांहीं शिंद्यास दिला.

३ गोहदच्या राण्यास पेनशन करून दिलें.

शिंद्याबरोबर झालेल्या तहाचीं कलमें इ. स. १८०५.

होळकरानें शीक लोक आणि अफगाण लोक, यांजपासून मदत मिळण्याविषयीं जो प्रयत्न केला, तो व्यर्थ गेल्यानंतर, तोही पुढील करारांवर तह करण्यास राजी झाला.

होळकराबरोबर तह १८०५.

१ त्याच्या राज्यांतील सर्व जिंकलेला मुलूख त्यास परत द्यावा.

तहाचीं कलमें

२ चंबळा नदीचे उत्तरेकडील कांहीं प्रदेश त्याजकडे असावा.

सर जार्ज बार्लो यांचे राज्यकारभार चालविण्याचे पद्धतीस सर्व लोकांनीं फार दोष दिला. याचें पहिलें कारण असें होतें कीं, त्यांनीं विरुद्ध पक्षांस फार अनुकूळ अशा अटींचे तह केले. दुसरें कारण असें होतें कीं, इंग्लिश लोकांच्या पक्षाकडील जयपूर आणि बुंदी येथील विश्वासू राजांवर, होळकर व शिंदा यांणीं हल्ला केला असतां, त्यांस सर जार्ज बार्लो यांनीं मदत देण्याविषयीं कोणतीच तजवीज केली नाहीं; यामुळें होळकर व शिंदा यांस त्यांचा नाश करण्याविषयीं स्फुरण आलें आणि जयपूर व बुंदी येथील राजांस फार राग आला. अशा प्रकारच्या वागणुकीनें

सर जार्ज बार्लो यांची राज्यकारभार चालविण्याची पद्धत.

बुंदी (राजपुतान्यांतील याच नांवाच्या संस्थानची राजधानी).

सर जार्ज बार्लो यांच्या कारकीर्दीत कित्येक बंडें उत्पन्न झालीं.

व्हलोर येथील बंड इ. स. १८०६ व याचा शेवट इ. स. १८०६ जुलै.

प्रथमतः व्हेलोर येथील शिपायांनीं उघडपणें बंड केलें आणि पलटणींतील अधिकारी व बहुतेक गोरे शिपाई यांस ठार मारिलें. त्यांच्या पहिल्या झपाट्यांतून जे लोक पार पडले त्यांनीं अर्काट येथून मदत येऊन पोंचेपर्यंत आपलें शूरपणें संरक्षण करून घेतलें. सारजंट वार्डि हा त्यांचा पुढारी झाला.

या बंडाचें पहिलें कारण.

पोषाखांतील फेरफार.

या बंडाचें पुढें लिहिलेलें मुख्य कारण होतें. शिपायांनीं कवाइतीचे जागीं कपाळास गंध लावून येऊं नये, सर्वांनीं दाढ्या व मिशा एक फर्म्याच्या ठेवाव्या आणि इंग्रजी टोपीप्रमाणें दिसणारें पागोटें घालावें. या एकाएकीं केलेल्या फेरफारांनीं सरकारचे मनांत आपल्या धर्मांत हात घालण्याचा उद्देश आहे असें त्यांस वाटून त्यांना फार त्वेष आला.

त्याच्या योगानें त्यांच्या मनावर झालेला ग्रह. दुसरें कारण.

टिपूच्या मुलांस व्हेलोर येथें नजर कैदेंत ठेविलें होतें. त्यांनीं शिपायांस उत्तेजन दिल्यामुळें ते हें बंड करण्यास प्रवृत्त झाले असें ह्मणतात.

दुसरीं बंडें वलजाबाद ( कव्हेलांग जवळ ) नंदीदुर्ग (बंगळूरचे ईशान्येस ३१ मैलावर ).

शिकंदराबाद, वलजाबाद, नंदीदुर्ग आणि दुसऱ्या कित्येक ठिकाणींही बंडें झालीं; परंतु तीं लौकरच नाहींशीं झालीं.

## भाग २५.

### लार्ड मिन्टो १८०७–१८१३.

लार्ड मिन्टो, स-

इ. स. १८०७ या वर्षीं लार्ड मिन्टो हे

गव्हरनर जनरलचे कामावर आले. तेव्हां सर जार्ज बार्लो यांस मद्रास येथील गव्हरनर नेमिलें. हे मद्रास येथें गव्हरनर असतां त्यांनीं जीं जीं कामें केलीं, त्यांतून कित्येक कामें लोकांस आवडलीं नाहींत. त्यांत मुख्यत्वेंकरून तंबूचा मक्ता बंद केला, याजमुळें तर फारच गडबड झाली आणि मद्रास येथें बंड झालें.

हावे गव्हरनर जनरल.

मद्रास येथिल बंड १८०७.

तंबूंचा मक्ता ह्मणजे आपल्या हाताखालचे लोकांस तंबू पुरविण्याबद्दल मुख्य अधिकाऱ्यांस सरकारांतून कांहीं नेमणूक मिळत असे. हा तंटा फार वाढला असता; परंतु मद्रास येथील सेनापति जनरल म्याक्डोनाल्ड् हा राजीनामा देऊन इंग्लंडास गेला, त्यामुळें हा तंटा मिटला.

तंबूचा मक्ता.

जरी पुष्कळ ठिकाणीं बंडें होण्याचा रंग दिसत होता आणि भयंकर लढायांचीं चिन्हें दिसून येत होतीं, तरी ईस्ट इंडिया कंपनीचा अधिकार दिवसें दिवस अधिकाधिकच वाढत चालला.

लॉर्ड मिन्टो यांची कारकीर्द.

लॉर्ड मिन्टो यांचे कारकीर्दींत जावा, बोर्बोन आणि ऐल् आफ् फ्रान्स हीं सुपीक बेटें इंग्लिशांनीं जिंकून आपले राज्यास जोडिलीं.

जावा, बोर्बोन व ऐल् आफ् फ्रान्स येथें जय.

लार्ड मिन्टो हे इ. स. १८१३ या वर्षाचे अखेरीस इंग्लंडास परत गेले. तेथें ते पुढें थोड्याच दिवसांनीं मरण पावले.

लार्ड मिन्टो इंग्लंडास परत जातात १८१३.

इ. स. १८१३ त हिंदुस्थानचा राज्यकारभार करण्याची कंपनीस इंग्लंडच्या राजाकडून आणखी वीस वर्षांची सनद दिली.

कंपनीची मुदत वाढविली.

# भाग २६

## अर्ल् आफ् मोईरा.

## ( मार्किस आफ् हेस्टिंग्झ. )

## १८१४–१८२३.

१ नेपाळ येथील युद्ध १८१३–१८१६.

२ पेंढाऱ्यांबराबर युद्ध १८१६–१८१७.

३ मराठ्यांशीं तिसरें युद्ध १८१६–१९.

### नेपाळ येथील लढाई १८१३–१८१६.

अर्ल् आफ् मोईरा, सातवे गव्हरनर जनरल्.

अर्ल् आफ् मोईरा, ज्यांस पुढें मार्किस आफ् हेस्टिंग्झ असा किताब मिळाला, हे गव्हरनर जनरल्चे कामावर असतां, नेपाळ येथील युद्ध उद्भवलें.

लढाईचीं कारणें इ० स० १८१३.

१ नेपाळ येथील डोंगरांत रहाणाऱ्या गुरखे या नांवाच्या लोकांनीं कंपनीच्या मुलुखावर लुटीकरितां हल्ला केला.

२ नेपाळ येथील राजानें कंपनीच्या मुलुखांत रहाणाऱ्या एका रयतेची कांहीं जमीन बळकाविली होती.

बटवाल (अयोध्या प्रांतांत).

३ तहाचें बोलणें चाललें असतां नेपाळ येथील लोकांनीं बटवाल येथील कंपनीच्या पोलीस लोकांस ठार मारिलें.

पहिली मोहिम इ. स. १८१४.

इंग्लिशांनीं आपल्या सैन्याच्या चार टोळ्या करून, खालीं लिहिल्याप्रमाणें नेपाळचे लोकांवर हल्ला केला.

या लढाईतील इंग्लिशांचे सरदार.

१ कर्नल् आक्टरलोनी यानें पश्चिमेच्या बाजूनें हल्ला केला.

२ जनरल् गिलेस्पी यानें जैटकवर चाल केली.

३ जनरल् वूड् हा पूर्वेच्या बाजूस गेला.

४ जनरल् मार्ले यानें नेपाळची राजधानी कटमंडू याजवर चाल केली.

पहिली टोळी शिवायकरून बाकीच्या तीन सरदारांचा पराभव झाला. जनरल् गिलेस्पी हा कुलंग या नांवाच्या किल्ल्यास वेढा घालीत असतां पडला. कर्नल आक्टरलोनी यास मात्र जय मिळाला. त्यानें नलगड, मलून आणि आलमोरा हे डोंगरी किल्ले एका पाठीमागून एक घेतले.

जनरल् आक्टरलोनी, ज्यास या वेळीं सर डेव्हिड आक्टरलोनी असें ह्मणूं लागले होते, हा चिरीघटी या नांवाचे कठीण घाटाचे पूर्वेचे बाजूनें नेपाळांत शिरला. मक्वानपूर येथील लढाईंत यास जय मिळाल्यावर, त्यानें हरिहरपूर हें शहर व तेथील किल्ला घेतला आणि नेपाळचे राजास तह करण्यास लाविलें.

१ नेपाळचे राजानें जो मुलूख घेतला होता तो सोडून द्यावा.

२ इंग्लिशांस बारा हजार चौरस मैलांपेक्षां जास्त मुलूख द्यावा.

या प्रकारें कंपनीच्या राज्याची सरहद्द हिमालय पर्वताच्या पायथ्यापर्यंत वाढली आणि सतलज व यमुना या नद्यांमधील प्रदेश तिच्या राज्यांत आला.

जैटक ( सरहिंदजवळ. ).

कुलंग ( हरिद्वारचे उत्तरेस २६ मैलांवर ). नलगड ( लुधियानाचे उत्तरेस ).

मलून ( नलगडचे पूर्वेस ).

आलमोरा (कमाऊन प्रांतांतील मुख्य शहर ).

दुसरी मोहिम १८१६.

मक्वानपूर (कटमंडुचे दक्षिणेस ) येथील लढाई इ. स. १८१६. हरिहरपूर ( मक्वानपूरचे दक्षिणेस ).

तहाचीं कलमें १८१६.

इ. स. १८१६ त गोस्तनदेवी काढण्यास आरंभ झाला.

## पेंढाऱ्यांबरावर लढाई १८१६—१८१७.

पेंढारी लोक.

पेंढारी हे होळकर व शिंदा यांचे सैन्यांतील लोक होते. या दोघांबराबर जी लढाई चालली होती तिचा जेव्हां शेवट झाला, तेव्हां हे लोक रिकामे झाले. नंतर या लोकांस कांहीं उद्योग नसल्यामुळें, ते लुटीकरितां टोळ्या करूं लागले. त्यांचा क्रम गांवोगांव घरें जाळून लोकांस फार इजा द्यावी, त्यांस लुटावें आणि पुष्कळ अनन्वित कृत्यें करावीं असा होता..

त्यांचे मुख्य.

चितु, करीमखान आणि अमीरखान हे त्यांचे मुख्य होते; या तिघांजवळ मिळून सुमारें चाळीस हजार घोडेस्वार होते.

इंग्लिशांचे राज्यांत त्यांचा प्रवेश.

इ. स. १८१५ या वर्षी ते कंपनीच्या मुलुखांत शिरले. ते प्रथमतः गंटूर येथें जाऊन नंतर कडपा परगण्यांत शिरले आणि दहा दिवसांत त्यांनीं तीनशें पेक्षां अधिक गांवें जाळलीं.

त्यांचा पाठलाग करण्यास इंग्लिशांनीं आपलें सैन्य पाठविलें; आणि मेजर लशिंगटन् यानें एके प्रसंगीं त्यांच्या एका मोठ्या टोळीचा पराभव केला; परंतु या लोकांचा जामानिमा हलका असल्यामुळें, आणि ते समोरासमोर लढाईस उभे रहात नसत यामुळें, इंग्लिशांचें त्यांजपुढें कांहीं चालत नसे. याकरितां या क्षुद्र परंतु भयंकर शत्रूंचा नाश करण्यास मोठें सैन्य पाठवावें लागलें.

सेनापति सर टामस् हिस्लाप् याच्या हाता-

खालीं एकलक्ष तेरा हजार सैन्य होतें. त्यानें या सैन्याच्या पांच टोळ्या करून व चोहोंकडून पेंढाऱ्यांस वेढून त्यांस पश्चिमेकडील पर्वतांत हाकून दिलें आणि जेथें जेथें त्यांच्या टोळ्या भेटल्या तेथें तेथें त्यांचा नाश केला.

पेंढाऱ्यांस कंपनीच्या मुलखांतून काढून दिलें १८१७.

**मराठ्यांशीं तिसरें युद्ध १८१६–१९.**

पेशव्याचें कपट १८१७.

मराठ्यांनां इंग्लिशांनीं जिंकलें होतें; परंतु अद्यापि त्यांचा तोरा कमी झाला नव्हता. इंग्लिशांविरुद्ध अनेक ठिकाणीं नेहमीं मसलती चालल्या होत्या. विशेषेंकरून पुणें व नागपूर येथें तर फारच चालल्या होत्या. वसई येथें ठरलेला तह पेशव्यानें वारंवार मोडिला. तो इंग्लिशांचा द्वेष करितो, असें अनेक प्रसंगीं त्याच्या वागणूकीवरून दिसून येत असे. पुणें येथील दरबारांत इंग्लिशसरकाराचे मार्फत मौन्टस्टुअर्ट एल्फिन्स्टन् हा रेसिडेन्ट होता. त्याच्याशीं पेशव्याचा वारंवार बेबनाव होत असे. या कारणास्तव इंग्लिशांनीं त्याला नवीन तह कबूल करण्यास सांगितलें. या तहाच्या योगें पेशव्यास पुष्कळ मुलूख सोडून द्यावा लागला आणि रेसिडेन्टाचे परवानगीवांचून दुसऱ्या दरबारांशीं पत्रव्यवहार ठेवण्याची त्यास मनाई झाली. ह्या कारणांमुळें त्यास इतका राग आला कीं, तो गुप्तपणें लढाईची तयारी करूं लागला. पेंढाऱ्यांबराबर त्यावेळीं जी लढाई चालली होती, तींत इंग्लिशांस मदत करण्याच्या मिषानें त्यानें थोडक्याच काळांत पंचवीस हजार सैन्य जमा केलें; परंतु यांतील खरें तथ्य रेसिडेन्टास सम-

जून आल्यामुळें त्यानेंही आपलें सैन्य तयारींत ठेविलें.

खडकी ( पुण्याजवळ ४ मैलांवर) येथील लढाई इ.स.१८१७.

पुढें लौकरच तंटा सुरू झाला आणि खडकी येथें लढाई होऊन तींत पेशव्याचा पूर्णपणें पराभव झाला. या लढाईंत इंग्लिशांचें सैन्य दोन हजार आठशें होतें व पेशव्याचें पंचवीस हजार होतें. या पराभवानंतर पेशव्यास पुण्यांतून पळून जावें लागलें.

नागपूर येथील राजाचें कपट.

वऱ्हाडचा राजा रघोजी भोंसला इ. स. १८१६ या वर्षीं मरण पावला. त्याच्या मागून त्याचा मुलगा परसाजी त्याचे गादीवर बसला. हा अल्पवयस्क व वेडगळ होता. याकरितां तेथील राज्यकारभार चालविण्यास तरुण राजपुत्राचा चुलता आपासाहेब यास मुखत्यार नेमिलें होतें. हाही इंग्लिशांविरुद्ध मसलत करूं लागला.

आपासाहेब.

त्यानें इंग्लिशांबराबर तह केला होता; परंतु नागपूर येथील अल्पवयस्क राजा मरण पावल्यावर आपासाहेबानें तो तह मोडला. या राजपुत्रास आपासाहेब यानें आपणास गादी मिळावी या उद्देशानें मारविला. नंतर मराठे व आरब यांचे मदतीनें सैन्य जमवून इंग्लिशांवर शिताबळदी या नांवाच्या टेंकड्यांसमीप हल्ला केला. या ठिकाणीं क्यापटन् फिट्झराल्ड याच्या शूरपणानें इंग्लिशांस जय मिळाला. जनरल् डॅव्हेटन यास रेसिडेन्टास मदत करण्याकरितां पाठविलें होतें. तो योग्यवेळीं येऊन पोंचल्यामुळें, नागपूर येथें आपासाहेबाचा पुन्हा पराभव झाला. इतक्यांत ज-

शिताबळदी ( नागपूरचे पश्चिमेस दोन टेंकड्या आहेत ).

नागपूर येथील लढाई १८१८.

नरल् हार्डिमन् हा नागपुराकडे येत असतां वाटेंत त्यास जबलपूर येथें मराठे लोक भेटले व तेथें लढाई झाली. तींत मराठ्यांचा पराभव झाला. यानंतर आपासाहेबास इंग्लिशांबराबर तहाचें बोलणें चालविण्याचें अगत्य पडलें. इंग्लिशांनीं त्याजबराबर तह केला. रेसिडेन्टानें आपासाहेबास गादीवर ठेवण्याचें वचन दिलें होतें, याजकरितां इंग्लिशांनीं त्यास पदच्युत केलें नाहीं.

जबलपूर ( नागपूरपासून १६० मैलांवर ) येथील लढाई इ.१८१७.

होळकराच्या सरदारांचें बंड.

यशवंतराव होळकर इ. स. १८११ यावर्षी मरण पावला. त्याच्या मागून त्याचा मुलगा मल्हारराव होळकर त्याचे गादीवर बसला. यावेळीं या राज्यांत फार अव्यवस्था होती, येथील सरदारांनीं इंग्लिशांबराबर पुन्हा लढाई करण्यास आरंभ केला. सर टामस् हिस्लाप यानें आपल्या सैन्याच्या तीन टोळया केल्या आणि त्यांजवर महिदपूर येथें हल्ला करून त्यांचा पराभव केला. या लढाईनंतर मंडेसूर येथें तह झाला.

महिदपूर (क्षिप्रा नदीच्या कांठीं ) येथील लढाई. इ. स. १८१७.

मंडेसूर ( रजपूतस्थानांत ).

तहाचीं कलमें.

१ इंग्लिशांस पुष्कळ मुलूख द्यावा.

२ होळकराचे राज्यांत त्याचे संरक्षणार्थ इंग्लिशांचें सैन्य असावें.

३ सर्व अधिकार इंग्लिशांचे हातीं असावा.

पेशव्याचा शेवटचा प्रयत्न.

पेशवा पुन्हा वीस हजार सैन्य व आठ हजार घोडेस्वारांनिशीं लढाईस तयार झाला. क्यापटन् स्टान्टन् हा पुण्यास येत असतां वाटेंत त्याला हें सैन्य भेटलें. याच्या हाताखालीं जरी फक्त सहाशें शिपाई, तीनशें घोडेस्वार आणि सव्वीस तोफा होत्या, तरी कोरेगांव येथें

कोरेगांव (भी-

मेऱ्या कांठीं पुण्याचे ईशान्येस १७ मैलांवर ) येथील लढाई इ. स. १८१८.

त्यानें त्या सैन्याबराबर लढाई केली आणि जय मिळविला. त्यानें आपल्या थोड्याशा सैन्याच्या साह्यानें रात्र होईतोंपर्यंत, शत्रूंच्या सैन्याचें कांहीं चालूं दिलें नाहीं. रात्र झाल्यावर त्यानें शत्रूंनां मागें हटण्याचें अगत्य पाडिलें. दुसरे दिवशीं मराठे लोक इतके भयाभीत होऊन गेले कीं, ते लढाईस उभे राहण्यास धजले नाहींत. यानंतर लौकरच पेशवा सर जान् मालकम् यास शरण आला.

आपासाहेबाचा शेवटचा प्रयत्न इ. स. १८१९.

आपासाहेब नागपूरचे गादीवर पुन्हा बसला नाहीं तोंच, तो इंग्लिशांविरुद्ध आणखी मसलती करूं लागला.

तेथील इंग्लिश लोकांचे वकीलास हें समजतांच, त्यानें त्यास कैद केलें. परंतु त्यानें पळून जाण्याची युक्ति काढिली. जेव्हां कंपनीचें सैन्यानें त्याचा पाठलाग केला, तेव्हां तो चितूसह असीरगड येथें पळून गेला. पण इंग्लिश सैन्यानें त्या किल्ल्यास वेढा घेतल्याबरोबर तो तेथूनही पळून गेला. अशीरगडाचा किल्ला इंग्रजांचे ताब्यांत आला आणि असें होतांच लढाई बंद झाली.

अशीरगड (बऱ्हाणपुरापासन १२ मैलांवर ).

सरते शेवटीं त्रासदायक मराठे लोक व पेंढारी यांजबराबर चाललेल्या लढाईचा शेवट झाला. यांतील सर्व मुख्य मुख्य सरदारांपैकीं कित्येक मेले, आणि कित्येक जिवंत राहिले तेही अगदीं निरुपद्रविक झाले.

होळकराचा परिणाम.

यशवंतराव होळकर वेड लागून इ. स. १८११ ह्या वर्षी मरण पावला असें मागें सांगितलेंच आहे.

करीमखान हा शेतकीचा धंदा करून उपजीविका करूं लागला. — करीमखान.

चितू हा भटकत फिरत असतां त्यास वाघानें खाल्लें. — चितू.

पेशवा याजला कानपुराजवळ ब्रह्मावर्त येथें नेऊन ठेविलें; व इंग्लिशांनीं त्याजला वर्षास आठ लक्ष रुपयांची नेमणूक करून दिली. — पेशवा.

आपासाहेब पंजाबांत पळून गेला होता; परंतु तो पुनः इंग्लिशांचे राज्यांत येऊन राहिला. या उपर त्यानें इंग्लिशांस कांहीं त्रास दिला नाहीं. — आपासाहेब.

पेशवा व आपासाहेब यांनीं विश्वासघात केल्यामुळें त्यांचीं राज्यें काढून घेतलीं. इंग्लिशांनीं शिवाजीचे वंशांतील प्रतापसिंह या नांवाच्या राजास सातारचे गादीवर बसविलें; व त्याजकडे कांहीं मुलुख तोडून देऊन बाकीचा संपूर्ण प्रदेश आपलेकडे ठेविला. — मराठ्यांचे राज्याची व्यवस्था.

नागपूर येथील गादीवर रघोजी भोंसला याचे नातवास बसविलें. याचेंही नांव रघोजीच होतें, परंतु याला बाजीराव असें ह्मणत. — नागपूरचे राज्याची व्यवस्था.

## भाग २७.

### लार्ड आमहर्स्ट १८२३–१८२८.

१ ब्रह्मदेशांतील पहिलें युद्ध. १८२३–२६.

२ भरतपूरचा दुसरा वेढा १८२६.

मार्किस आफ हेस्टिंग्झ यांच्या मागून लार्ड — लार्ड आमहर्स्ट,

आठवे गव्हरनर जनरल्.

आमहर्स्ट हे गव्हरनर जनरलचे कामावर आले. ते येतांच ब्रम्हदेशाशीं लढाई करणें अवश्य आहे असें त्यांस आढळून आलें.

लढाईचीं कारणें.

ब्रह्मदेशांतील लोकांनीं आसाम प्रांत जिंकून बंगालचे पूर्वेकडच्या सरहद्दीपर्यंत आपला अंमल बसविला आणि कंपनीच्या सरहद्दीवरील प्रजेवर जुलूम करूं लागले.

शापुरी ( इंग्लिश लोक व ब्रह्मी लोक ह्यांचे राज्याच्या सरहद्दीवर. )

२ शापुरी या नांवाच्या बेटांत रखवालीकरितां इंग्लिशांचे थोडेसे लोक होते, त्यांचा त्यांनीं पराभव केला आणि तें बेट घेतलें.

३ त्यांनीं शापुरी बेटाजवळ इंग्लिश लोकांच्या एका जाहाजाचा पाडाव केला, आणि त्याजवरील अधिकाऱ्यांस आणि लोकांस बंदिवान केलें.

गव्हरनर जनरलांनीं या गोष्टींचीं कारणें विचारिलीं असतां, त्यांनीं योग्य कारणें दाखविलीं नाहींत; याकरितां युद्धावांचून दुसरा कांहीं उपाय राहिला नाहीं. ब्रह्मी लोकांवर स्वारी करण्याकरितां एकदम फौज तयार केली, व तिच्यावर सर अर्चिबाल्ड क्यांबेल् यास मुख्य नेमिलें.

सर अर्चिबाल्ड क्यांबेल्.

रंगून ( ब्रह्मदेशांतील मुख्य बंदर व व्यापाराची जागा ) १८२४.

आंडामान बेटांतील कॉर्नवालिस् या नांवाच्या किल्ल्यांत सर्व सैन्य एकत्र जमल्यावर, इंग्लिश लोकांनीं रंगूनवर चाल केली व शत्रूबरोबर थोडा वेळ लढाई झाल्यानंतर तें शहर घेतलें.

किमांडीन ( रंगून पासून थोडके अंतरावर ) इ.स. १८२४.

यानंतर इंग्लिश लोकांनीं किमांडीन बंदरावर हल्ला करून तें घेतलें.

डोनेबो इ. स. १८२५.

जलमार्गानें गेलेल्या टोळीचा अधिकारी जनरल् काटन् यानें डोनेबो शहरावर पुढील वर्षी

हल्ला करून तें घेतलें. या ठिकाणीं ब्रह्मी लोकांचा बंधुला या नांवाचा सरदार पडला.

यानंतर प्रोम, मार्टवान, तेन्यासेरिम आणि अराकान इत्यादि शहरें इंग्लिशांचे हातीं आलीं.

नंतर शत्रूबराबर तह करण्याचे कारणानें कांहीं वेळपर्यंत युद्ध बंद झालें. परंतु आवा येथील राजा तहाचीं कलमें लौकर कबूल करीना, सबब पुन्हा लढाई सुरू झाली.

या लढाईंत इंग्लिशांचा प्रत्येक ठिकाणीं जय झाला. प्रथमतः ब्रह्मी लोकांचा प्रोम येथें पराभव झाला. नंतर मेलान शहर घेतलें. आणि नंतर पागहाम येथें जी लढाई झाली तींत इंग्लिशांस पूर्णपणें जय मिळाला. प्रोम, मेलान, पागहाम इ. १८२६.

यानंतर इंग्लिशांनीं ब्रह्मदेशाचे राजधानीकडे कांहीं अडथळा न होतां चाल केली. जेव्हां ते आवापासून यांडेवो या नांवाचें पन्नास मैलांवर एक गांव आहे, तेथें येऊन पोंचलें तेव्हां तेथील राजा भयाभीत झाला, आणि त्यानें तहाचें बोलणें लाविलें. तो खालीं लिहिलेल्या तहाचें प्रत्येक कलम कबूल करण्यास तयार झाला. इंग्लिश लोक आवा शहरावर चाल करितात.

१ आसाम, काचार, जिंत्या आणि मणीपूर या प्रांतांवरील सर्व हक्क सोडून द्यावें. तहाचीं कलमें इ. स. १८२६.

२ आराकान आणि तेन्यासोरिम हे प्रांत इंग्लिशांस द्यावे.

३ एक कोटी रुपये तीन हप्त्यांनीं द्यावे.

४ दुसरा हप्ता पोंचे तोंपर्यंत रंगून शहर इंग्लिशांचे ताब्यांत असावें.

## भरतपूरचा दुसरा वेढा १८२६.

भरतपूरचा राजा बहादूरसिंग हा इ. स. १८२३ यावर्षीं मरण पावला. ह्याचा व इंग्लिशांचा ऐक्यभाव होता. याच्या मरणानंतर भरतपूरचे राज्यांत फार अव्यवस्था व झोटिंगबादशाही सुरू झाली. भरतपूर येथील किल्ला बहादूरसिंग याचा पुतण्या दुर्जनसाल यानें बळकाविला, व योग्य वारस बळवंतसिंग यास कैदेंत ठेविलें.

भरतपूर येथील अव्यवस्था.

या गोष्टीमुळें भरतपूरचा किल्ला घेण्यास ही उत्तम संधि आहे, असें कंपनीसरकारास वाटलें. आजपर्यंत या ठिकाणीं मात्र इंग्लिश लोकांचें कांहीं चाललें नाहीं. वीस वर्षांपूर्वी जनरल् लेक् यानें हा किल्ला घेण्यास पुष्कळ प्रयत्न केले होते, परंतु ते सर्व व्यर्थ गेले. एतद्देशीय लोक हा किल्ला अजिंक्य आहे असें समजत असत. शिवाय हा किल्ला बंडखोर लोकांची एकत्र मिळण्याची व संरक्षणाची जागा होती.

भरतपूरचा किल्ला घेण्याची संधि.

या किल्ल्याविषयीं एतद्देशीय लोकांच्या मनांतील ग्रह.

याजकरितां सेनापती लार्ड कांबरमियर हा वीस हजार सैन्य व शंभर तोफा घेऊन भरतपूर येथें आला. दुर्जनसाल यानें त्याजला प्रतिबंध केल्यावर, त्यानें एकदम त्या किल्ल्याच्या तटबंदीखालीं सुरूंग लावून त्याच्या वीस फुटी जाडीच्या भिंती उडविल्या, आणि एकदम हल्ला करून तो किल्ला घेतला. हा किल्ला इंग्लिशांचे स्वा-

लार्ड कांबरमियर हा किल्ला घेतो इ. स. १८२६.

धीन झाल्यामुळें देशांतील दंगाधोपा नाहींसा होऊन, जिकडे तिकडे स्वस्थता झाली.

---

## भाग २८.

### लार्ड उइलियम् बेंटिक्.

### १८२८–१८३५.

लार्ड आमहर्स्ट यांच्या मागून लार्ड उइलियम् बेंटिक् हे गव्हरनर जनरल्चे कामावर आले. यांच्या कारकीर्दींत मोठ्या ध्यानांत ठेवण्यासा रख्या लढाया वगैरे झाल्या नाहींत. परंतु लोककल्याणाच्या कृत्यांविषयीं यांची कारकीर्द जशी प्रसिद्ध आहे, तशी दुसऱ्या कोणत्याही कृत्यां विषयीं नाहीं.

लार्ड उइलियम् बेंटिक, नववे गव्हरनर जनरल्.

ब्राह्मण लोकांतील सती जाण्याची व रजपूत लोकांतील लहान मुली मारण्याची चाल आणि जगन्नाथ येथील देवाच्या उत्साहांतील भयंकर कृत्यें हीं यांनीं बंद केलीं. सरकारानें आजपर्यंत या चालींविषयीं दुर्लक्ष केलें होतें एवढेंच नव्हे, तर अशा प्रकारच्या उत्साहाच्या सन्मानार्थ लष्करी लोक देऊन, कांहीं अंशीं या चालींस ते उत्तेजनही देत होते, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. अशा प्रकारच्या चाली नाहींशा करून हिंदुलोकांच्या मनांतील धर्मवेडेपणाच्या समजुती घालविण्याविषयीं लार्ड उइलियम् बेंटिक् यांनींच प्रथमतः प्रयत्न केला.

हिंदुलोकांच्या कांहीं धर्मवेडेपणाच्या चाली बंद होतात.

कंपनीस हिंदुस्थान व चीन या देशांशीं व्या-

हिंदुस्थान व

चीन या देशांशीं व्यापार करण्यास सर्वांस परवानगी मिळते इ. स. १८३३.

पार करण्यास जी सनद मिळाली होती, तिची मुदत इ. स. १८३३ यावर्षी संपली या-नंतर हिंदुस्थान व चीन या देशांशीं व्यापार क-रण्यास सर्व लोकांस परवानगी मिळाली. या-साठीं यापुढें व्यापाराच्या संबंधानें ईस्ट इंडिया-कंपनीचा हिंदुस्थानाशीं कांहीं संबंध राहिला नाहीं. फक्त हिंदुस्थानचा राज्यकारभार चाल-विण्याचा मात्र संबंध तिजकडे राहिला.

कुर्ग प्रांत इंग्लिश राज्यास जोडिला इ. स. १८३४.

यांच्या कारकीर्दींत कुर्ग प्रांत कंपनीच्या राज्यास जोडिला; कारण तेथील राजा आपल्या प्रजेशीं व कंपनी सरकाराशीं वाईट रीतीनें वा-गत असे.

इ. स. १८३३ त इंग्लंड व हिंदुस्थान यांमध्यें आगबोटी सुरू झाल्या.

लार्डउइलियम् बेंटिक् हिंदुस्थान सोडतात. इ. स. १८३५ मे.

लार्ड उइलियम् बेंटिक् यांनीं इ. स. १८३५ मे महिन्यांत हिंदुस्थान सोडिलें. त्यांच्या जाग्या-वर लार्ड आकलंड् यांची नेमणूक झाली. परंतु तेही नेमणूक झाल्याबराबर हिंदुस्थानांत आले नाहींत; याजकरितां ते येईपर्यंत त्यांचें काम सर

सर चार्लस् मेटकाफ.

चार्लस् मेटकाफ् यांनीं चालविलें.

---

## भाग २९.

लार्डआकलंड्, दाहवे गव्हरनर जनरल्.

### लार्ड आकलंड् १८३६ मार्च–४२.

१ अफगाणिस्थानांतील युद्ध १८३८–४२.

२ चीन येथील पहिलें युद्ध १८४०–४२

लढाईचें कारण.

या वेळीं अफगाणिस्थानांत शहासुजा या नां-

वाचा राजा राज्य करीत होता. त्याला त्याचा भाऊ महंमद यानें पदच्युत केलें. यामुळें शहासुजा याजला इंग्लिशांचे राज्यांत येऊन आश्रय घेणें भाग पडलें. महंमद यास फत्तेखानाचे योगें जय मिळाला. हा त्याच्या प्रधानांपैकीं एक प्रधान होता. परंतु महंमद गादीवर बसल्यावर, त्याचे उपकार लौकरच विसरला. त्यानें त्याला फार क्रूरतेनें वागविलें, त्याचे डोळे काढिले आणि सरते शेवटीं त्यास ठार मारिलें. यामुळें त्याच्या भावांस फार राग आला आणि त्यांनीं त्याजवर बंड केलें. त्या भावांपैकीं दोस्तमहंमद हा पुढारी होता. त्यांनीं हिरात प्रांत शिवाय करून त्याचें सर्व राज्य बळकाविलें.

शहासुजास इंग्लिश लोक आश्रय देतात.

शहासुजा इंग्लिशांचे राज्यांत आल्यावर त्यांनीं त्याचें योग्य रीतीनें आगतस्वागत केलें; आणि त्याला दरमाहा चार हजार रुपयांची नेमणूक करून दिली.

इंग्लिश लोकांनीं शहासुजा यास मदत करण्याचें कारण.

अफगाणिस्थानांत असा प्रकार चालला असतां, शहासुजा यानें आपणास पुनः अफगाणिस्थानच्या गादीवर बसविण्याविषयीं मदत करण्यास इंग्लिशांचें मन वळविलें. यावेळीं रशियन लोक हिंदुस्थानावर हल्ला करितील, अशी भीति असल्यामुळें, लार्ड आकलंड् यांनीं त्याची विनंति मोठ्या खुषीनें मान्य केली. दोस्तमहंमदाबरोबर बोलणें चालणें करण्याकरितां इंग्लिशांनीं आपला वकील पाठविला होता. दोस्तमहंमदानें त्याचें बोलणें अमान्य केलें एवढेंच नव्हे, वर त्यानें र-

शियाचे बादशाहाबराबर तहही केला. तेव्हां अर्थांतच शहासुजा यास गादीवर बसविण्याकरितां दोस्तमहमद याजबराबर युद्ध सुरू करावें लागलें.

मेडिकल् कालेज्.

इ. स. १८३८ या वर्षीं मेडिकल् कालेज् स्थापिलें.

इंग्लिशांची तयारी.

यावेळीं रणजितसिंग हा पंजाब येथील राजा होता. त्याजवळ इंग्लिशांनीं आपलें सैन्य त्या प्रांतांतून काबुलास नेण्याची परवानगी मागितली. त्याजकडून ती मिळाल्यावर, इंग्लिशांनीं आपल्या सैन्याच्या तीन टोळ्या करून अफगाणिस्थानावर हल्ला केला. या टोळ्यांपैकीं एक टोळी बंगाल्यांतून गेली होती. दुसरी मुंबईहून आणि तिसऱ्या टोळींत शहासुजा याचे लोक होते. सर्व सैन्याचा अधिकार सर जान कीन् याजला दिला.

इंग्लिशलोक कराची घेतात इ. स. १८३८.

मुंबईहून गेलेल्या टोळीस सिंध येथील अमिरांनीं अडथळा केला. यामुळें त्यांजबराबर लढाई करून मार्ग मिळवावा लागला. या लढाईंत त्या टोळीनें कराची शहर घेतलें आणि कंदहार येथें पूर्वीं गेलेल्या टोळीस जाऊन मिळण्याकरितां पुढें चाल केली.

गिझनी आणि काबूल हीं शहरें हस्तगत होतात इ. स. १८३९.

पुढें गेलेल्या सैन्यास वाटेनें फार श्रम भोगावे लागले. इंग्लिशांनीं गिझनी शहरावर हल्ला करून तें घेतलें. दोस्तमहमद भिऊन काबुलांतून पळून गेला. यामुळें तें शहरही कांहीं अडथळा न होतां त्यांच्या हातीं आलें.

यानंतर शहासुजा यास इंग्लिशांनीं पुनः त्याचे गादीवर बसविलें, म्याक्नाग्टन् याजला त्याचे दरबारांत इंग्लिशांचे तर्फे वकील नेमिलें, आणि काबूल येथें बंदोबस्ताकरितां पुष्कळ सैन्य ठेवून बाकींचें सैन्य परत आणिलें.

शहासुजा पुन्हा गादीवर बसतो.

अफगाणिस्थान येथील लोकांच्या मनांत इंग्लिश लोकांविषयीं प्रतिकूळ ग्रह असल्यामुळें, दोस्तमहंमद याजला पुनः गादी मिळविण्याचा प्रयत्न करण्यास पुष्कळ सैन्य मिळालें. परंतु सर राबर्ट सेल यानें त्याजबराबर परवान येथें लढाई केली आणि पुन्हा त्याचा पराभव केला. नंतर लौकरच तो म्याक्नाग्टन् यास शरण आला.

दोस्तमहंमद याचा पुन्हा गादी मिळविण्याविषयीं प्रयत्न.

परवान येथील लढाई इ० स० १८४०

दोस्तमहंमद इंग्लिशांचे स्वाधीन झाला, परंतु त्याचा मुलगा अकबरखान हा इंग्लिशांशीं लढाई करण्याविषयीं प्रयत्न करीत होता. इंग्लिशांनीं केलेली व्यवस्था अफगाण लोकांच्या मनास आली नाहीं; आणि अकबरखान यानें त्यांस उत्तेजन दिल्यामुळें व आपण स्वतः त्यांचा मुख्य झाल्यामुळें, त्यांनीं काबूल येथें एकाएकीं उघडपणें बंड केलें. हें बंड मोडून टाकण्याची इंग्लिशांनीं योग्य तजविज न केल्यामुळें, तें दिवसेंदिवस अधिकाधिक बळावत चाललें. सर आलेक्झांडर बर्न्स आणि दुसरे कामदार, यांस बंडवाल्यांनीं त्यांच्या घरांत शिरून ठार मारिलें. इंग्लिश लोकांनीं परत येण्याचा बेत केला. अकबरखानानेंही सुरक्षितपणें जाऊं देण्याविषयीं त्यांस वचन दिलें. यानंतर सुमारें पांच हजार शिपाई आणि दहा ह-

काबूल येथील बंड इ. स. १८४१.

जार बाजारबुणगें अफगाणिस्थानांतून परत यावयास निघालें. वाटेनें या लोकांस फार संकटें सोसावीं लागलीं आणि कैबर या नांवाच्या बर्फमय घाटांत अफगाण लोकांनीं या लोकांचा असा नाश करून टाकिला कीं, इतक्या लोकांपैकीं डाक्टर ब्रौडन् या नांवाचा मात्र एक मनुष्य जलालाबाद येथें हें दुःखकारक वर्तमान सांगण्यास परत आला.

हें दुःखकारक वर्तमान ऐकून, प्रत्येक इंग्लिश मनुष्याच्या अंतःकरणांत दुःख उत्पन्न झालें असतां व गमावलेली कीर्ति पुनः मिळविण्याविषयीं

सर राबर्ट् सेल - स. १८४२.

लढाईची तयारी चालली असतां, सर राबर्ट् सेल व त्याच्या हाताखालच्या थोड्याशा सैन्यानें मोठीं शूरत्वाचीं कृत्यें करून "अति पराक्रमी" अशी पदवी मिळविली. बंडाचे आरंभीं त्याला जलालाबाद येथें जाण्याचा हुकूम झाला होता.

या ठिकाणीं येण्यास जे डोंगरी रस्ते होते, वे शत्रूच्या स्वाधीन होते व त्यांचा त्यांनीं बंदोबस्तही चांगल्याप्रकारें ठेविला होता. यामुळें त्याला वाटेनें पुष्कळच संकटें भोगावीं लागलीं.

तो जलालाबाद येथें येऊन पोंचतांच, त्यानें त्याच्या मोडकळीस आलेल्या तटबंदीची दागडुजी केली आणि पांच महिनेपर्यंत त्याचें अशा शूरपणें संरक्षण केलें कीं, अकबरखान यास वेढा उठवून मागें हटावें लागलें.

एडनचें ठाणें.

स. १८३९ एडन एथें इंग्रज सरकारानें ठाणें घातलें.

## चीन देशाशीं पहिलें युद्ध. १८४०–४२.

लार्ड आकलंड् यांचे कारकीर्दीत चिनई लोकांबराबरही युद्ध करण्याचा प्रसंग आला.

लढाईचीं कारणें इ. स. १८४०.

१ चिनई लोकांत अफू खाण्याचा प्रचार दिवसें दिवस प्रबळ होत चालला, तो कांहीं अंशीं बंद करण्याकरितां तेथील राजानें या जिनसावर जबर जकात बसविली.

२ चीन येथील अधिकाऱ्यांनीं जकात चुकवून अफू नेणाऱ्या इंग्लिश लोकांस कडक शिक्षा दिली.

या गोष्टीचा सूड उगविण्याकरितां व चीन देशाशीं चांगल्या प्रकारें व्यापार सुरू करण्या करितां चिनई लोकांबराबर युद्ध करणें अवश्य पडलें.

याजकरितां चीन देशावर हिंदुस्थानांतून सैन्य पाठविलें. त्याचा अधिकारी सर ह्यू गो हा होता. कित्येक लढायांत चिनई लोकांचा पराभव झाल्यावर, ते तह करण्यास कबूल झाले व खालीं लिहिल्याप्रमाणें त्यांजबराबर नांकीन येथें तह झाला.

नांकीन येथील तह इ० स० १८४२.

या तहांत हांगकांग बेट इंग्लिशांस मिळालें आणि आमाय, फूच्यू, निंगपो आणि शांघै या चार बंदरांत व्यापार करण्याची परवानगी मिळाली.

तहाचें कलम.

---

# भाग ३० वा.

## लार्ड एलेन्बरो १८४२–४४.

१ अफगाणिस्थानांतील युद्धाचा शेवट १८४२

२ सिंध येथील युद्ध १८४२–१८४३.

३ शिंद्यांशीं युद्ध १८४३.

लार्ड एलेनबरा, अकरावे गव्हरनर जनरल.

लार्ड एलेन्‌बरो हे लार्ड आकलंड् यांचे मागून गव्हरनर जनरलूचे कामावर आले. त्यांनीं अफगाण लोकांस शिक्षा करण्याचा व इंग्लिश लोकांची जी अफगाणिस्थानांत अपकीर्ति झाली होती, ती नाहींशी करण्याचा प्रथमतः प्रयत्न केला. या उद्देशानें त्यांनीं हिंदुस्थानचे सरहद्दीवर पुष्कळ सैन्य जमा केलें. या सैन्याच्या दोन टोळ्या करून त्यांजवर जनरल् पालक् व जनरल् नाट् यांस मुख्य नेमिलें. हे दोघे सरदार पुष्कळ संकटें सोसून अफगाणिस्थानांत जाऊन पोंचले. जनरल् नाट् यानें गिझनी शहर परत घेतलें, व जनरल् पालक हा काबुलांत शिरला. त्यानें थोड्याच दिवसांत अकबरखान याच्या कैदेंत जे इंग्लिशांचे बंदिवान होते, त्यांस मुक्त केलें व काबुलचा किल्ला जमीनदोस्त करून टाकिला.

शहासुजा यास बंडवाल्यांनीं ठार मारिल्यामुळें अफगाणिस्थानांत इंग्लिश सैन्याची कांहीं जरूरी राहिली नाहीं. याजकरितां अफगाणिस्थानांतील गडबड तशीच राहूं देऊन, इंग्लिश लोक हिंदुस्थानास परत आले.

## सिंध येथील युद्ध १८४२–४३.

लढाईचीं कारणें.

१ सिंध हा प्रांत पहाडी प्रदेशांत राहणाऱ्या अमीर या नांवाच्या एका जातीच्या लोकांनीं जिंकून घेतला होता व तो त्यांच्याच अमलांत

होता. आपण स्वतंत्र असावें अशा इच्छेनें आपल्या कामांत इंग्लिशांनीं हात घालावा हें त्यांस आवडत नसे. मुंबईहून जी इंग्लिश सैन्याची टोळी अफगाणिस्थानांत गेली, तिनें जातेवेळीं जेव्हां त्यांस रस्ता देण्याचें अगत्य पाडिलें, तेव्हां त्यांजबराबर झालेल्या तहांत त्यांस असें कबूल करावें लागलें कीं, हैदराबाद येथें एक इंग्लिशांचा रेसिडेन्ट असावा, सिंध प्रांतांत इंग्लिशांचें सैन्य असावें आणि इंग्लिश लोकांस सिंधु नदींत व्यापार करण्यास जकात नसावी, या गोष्टींमुळें इंग्लिश लोकांविषयीं त्यांचीं मनें अगदीं बिघडून गेलीं होतीं.

२ अफगाणिस्थानाशीं नुकत्याच झालेल्या युद्धांत इंग्लिश लोकांस फार संकटें सोसावीं लागलीं व तींत त्यांचा फार नाशही झाला. यामुळें ते दुर्बळ झाले असें समजून, अमीरांनीं त्यांजबराबर पूर्वीं झालेल्या तहाविषयीं दुर्लक्ष केलें. आपणांवरील इंग्लिश लोकांचा अधिकार झुगारून देण्यास ही उत्तम संधि आहे अशी त्यांस आशा उत्पन्न झाली.

३ प्रथमतः त्यांजबराबर झालेल्या तहनाम्यांतील अटींपेक्षां कठीण अटींचा तहनामा कबूल करण्याविषयीं जेव्हां इंग्लिशांनीं तेथील रेसिडेन्ट मेझर औटऱ्याम् याच्या मार्फत बोलणें चालविलें, तेव्हां त्यांनां फार राग आला.

युद्धाविषयीं कोणत्याही प्रकारची सूचना न देतां, त्यांनीं एकदम विश्वासघातानें रेसिडेन्टाचे

अमीरांचे लोक रेसिडेन्टाचे घ-

रावर एकाएकी हल्ला करितात.

घरावर हल्ला केला. रेसिडेन्टाचे तैनातीस जे लोक होते त्यांनीं त्यांचें चार तासपर्यंत कांहीं चालूं दिलें नाहीं. नंतर ते इंग्लिश लोकांच्या लढाऊ आगबोटीकडे परतले आणि सर चार्लेस नेपियर हा सिंधमधील सैन्य घेऊन त्वरेनें येत होता त्यास मिळाले. त्यांची व अमीरांच्या मोठ्या सैन्याची मियानी येथें गांठ पडली.

मियानी ( हैदराबादेपासून ६ मैलांवर ) येथील लढाई. इ. स. १८४३.

अमीरांच्या सैन्यांत एकवीस हजार मनुष्यें व शंभर तोफा होत्या. सर चार्लेस् नेपियर यानें त्याजवर एकदम हल्ला केला व मोठ्या निकराची लढाई करून त्यांचा पराभव केला. सर चार्लेस् नेपियर याचे हाताखालीं फक्त तीन हजार शिपाई होते.

हैदराबाद येथील लढाई इ.स. १८४३.

यानंतर हैदराबाद येथें जी दुसरी रक्तस्रावाची लढाई झाली, तींत इंग्लिशांस जय मिळाला व सिंध प्रांत इंग्लिशांचे ताब्यांत आला. या लढाईनंतर अमीर इंग्लिशांचे स्वाधीन झाले.

सिंध प्रांत इंग्लिश राज्यास जोडिला इ. स. १८४३.

सिंध प्रांत इंग्लिश राज्यास जोडिला व सर चार्लेस् नेपियर यास तेथील पहिला कमिशनर नेमिलें.

## शिंद्याशीं युद्ध १८४३.

युद्धाचीं कारणें.

१ दवलतराव शिंदा इ. स. १८२७ या वर्षीं मरण पावला. त्याचेमागून जनकोजी शिंदा त्याचे गादीवर बसला. तो इ० स० १८४३ यावर्षीं मरण पावला. तो निपुत्रिक होता. याकरितां त्याच्या तेरा वर्षांच्या विधवा राणीनें आपल्या नातलगांपैकीं भगीरथराव या नांवाच्या

एका मुलास दत्तक घेतलें. याचें वय आठ वर्षांचें होतें. हा अल्पवयी असल्यामुळें राज्यांत फार घोंटाळा झाला. माजी राजाचा मामा, ज्याला मामासाहेब असें ह्मणत असत, त्याजकडे संपूर्ण राज्याचा कारभार सोंपविला होता. यास भगीरथरावाची आई प्रतिकूळ होती. याजमुळें राज्यांत दुफळया व कारस्थानें उत्पन्न झालीं.

२ शिंद्याचें सैन्य फार प्रबळ होतें आणि युद्धाविषयीं फार उत्सुक होतें.

याविषयीं राणीला गव्हरनर जनरल् यांनीं पुष्कळ प्रकारें समजून सांगितलें; परंतु तिनें त्यांच्या सांगण्याकडे लक्ष दिलें नाहीं. याजकरितां त्यांनीं तिच्यावर सैन्य पाठविलें व त्या सैन्याचा मुख्य अधिकार कम्यांडर इन् चीफ् सर ह्यू गो यास दिला. मराठ्यांची अठरा हजार लढाऊ फौज होती व त्यांचा तोफखानाही उत्तम प्रकारचा होता. यांजवर महाराजपूर येथें इंग्लिशांनीं हल्ला केला आणि त्यांचा अगदीं पराभव केला. त्याच दिवशीं जनरल् ग्रे याच्या हाताखालील दुसऱ्या टोळीनें पुनियार येथें त्यांचा पराभव केला. या लढाईंत इंग्लिश लोकांचे पुष्कळ सरदार व मनुष्यें मेलीं. परंतु मराठे लोकांची अगदीं फाटाफूट झाली आणि राणीला पुढील तह करण्याचें अगत्य पडलें.

महाराजपूर (ग्वाल्हेरपासून थोड्या मैलांवर) येथील लढाई इ. स. १८४३.

पुनियार (ग्वाल्हेरपासून थोड्या मैलांवर) येथील लढाई. इ. १८४३.

तहाचीं कलमें.

१ अल्पवयस्क महाराज वयांत येईपर्यंत ग्वाल्हेर येथील राज्यकारभार एका सभेनें चालवावा.

२ इंग्लिशांचा रेसिडेन्ट जी मसलत सांगेल ती निमुटपणें ऐकावी.

३ आपल्या सैन्याची संख्या कमी करावी.

४ ग्वाल्हेर येथें बंदोबस्ताकरितां इंग्लिशांचें सैन्य असावें व त्याचा खर्चेही त्या संस्थानांतून चालावा.

५ राणीसाहेबांनीं फक्त नेमणूक घेऊन स्वस्थ बसावें आणि त्यांस राज्यांत कोणत्याही प्रकारचा अधिकार चालविण्याची परवानगी नसावी.

लार्ड एलेन्बरो इंग्लंडास परत जातात १८४४.

या युद्धानंतर कोर्ट ऑफ् डैरेक्टर्स या सभेनें लार्ड एलेन्बरो यांस इंग्लंडास परत बोलाविलें आणि शांततेच्या कामांकडे त्यांचें लक्ष नसून त्यांस युद्धाची आवड होती असा त्या सभेचा त्यांजविषयीं समज झाल्याकारणानें तिनें त्यांस दोष दिला. परंतु लोकांच्या मतें या दोषास ते पात्र नव्हते.

---

## भाग ३१ वा.

### सर हेनरी हार्डिंज १८४४–४७.

### पंजाबाशीं पहिलें युद्ध १८४५–४६.

सर हेनरी हार्डिंज, बारावे गव्हरनर जनरल.

लार्ड एलेन्बरो यांचे मागून सर हेनरी हार्डिंज यांची गव्हरनर जनरल्चे जाग्यावर नेमणूक झाली. देशांत शांतता असावी अशी यांचे मनांत फार इच्छा होती; परंतु पंजाबांतील शीख लोकांबराबर लौकरच लढाई करण्याचा प्रसंग आला.

शीख लोक.

शीख लोक सोळाव्या शतकांत उदयास आले. औरंगजेब बादशहानें यांना फार त्रास दिला. परंतु तो मेल्यानंतर त्यांचा भरभराट

होऊं लागला व त्यांची शक्ति वृद्धिंगत होऊं लागली. हे लोक स्वाभाविकपणें शूर व मजबूत शरीराचे असतात. यांना फ्रान्स व इटली या देशांतील सरदारांनीं कवाईत शिकवून तयार केल्यामुळें ते उत्तम शिपाई झाले होते. त्यांचें पायदळ व मुख्यत्वेंकरून तोफखाना हीं युरोपांतील कोणत्याही देशांतील लोकांची बरोबरी करण्यासारखीं होतीं. रणजीतसिंग याचे अंगीं जरी विद्वत्ता नव्हती तरी तो बुद्धिमान् पुरुष होता. यानें आपल्या बुद्धीच्या बळानें सर्व लहान लहान राजेरजवाड्यांस आपले अमलाखालीं आणून पंजाबचें एक मोठें बलाढ्य राज्य केलें होतें. हा इ. स. १८३९ या वर्षीं मरण पावला. त्याच्या मरणानंतर त्याच्या राज्यांत फार घोटाळा व अंदाधुंदी चालू झाली. त्याचा मुलगा करकसिंग हा दुर्बळ होता. तो इ. स. १८४० या वर्षीं मरण पावला. यास निहालसिंग या नांवाचा एक मुलगा होता. तो लहान असल्यामुळें त्याची आई राज्यकारभार पाहूं लागली. हिच्या हातून राज्यांत बंदोबस्त व शांतता राखवेना. सैन्य लढाई करण्याविषयीं फार उत्सुक होतें आणि त्यानें ब्रिटिश सरकारचे राज्यावर हल्ला करण्याचा निश्चय केला.

रणजीतसिंग.

पंजाबचें राज्य.

रणजीतसिंगाचा मृत्यु इ. १८३९.

युद्धाचें कारण.

पुढें होणारा परिणाम प्रथमच माहित असल्यामुळें सर हेनरी हार्डिंज यांनीं मोठ्या तजविजीनें मिरत आणि लुधियाना या दोन शहरांच्या मध्यभागीं वीस हजार सैन्य व नव्वद तोफा

सर हेनरी हार्डिंज यांची तयारी.

जमविल्या होत्या. त्यांजवर सर ह्यू गो यास मुख्य नेमिलें होतें आणि जेव्हां जेव्हां आपली स्वतःची गरज लागेल तेव्हां तेव्हां समीप असावें या उद्देशानें त्यानें कलकत्ता सोडून सर ह्यू गो ह्याच्या छावणी जवळच आपला तळ दिला होता.

शीख लोक एकाएकीं सतलज नदी उतरून ब्रिटिश सरकारचे मुलखांत आले. त्यावेळीं इंग्लिश लोकांच्या सर्व सैन्यानें त्यांजवर एकदम चाल केली.

मुडकी ( फिरोजपूरपासून सुमारें २० मैलांवर) येथील लढाई इ. स. १८४५.

सर ह्यू गो लुधियाना येथें जात असतां त्याला मुडकी येथें शीख लोकांबरोबर मोठ्या निकराची लढाई मारावी लागली. या लढाईंत सर ह्यू गो यास जय मिळाला, परंतु सर राबर्ट सेल हा पडला.

फिरोजशहा (मुडकीपासून सुमारें १० मैलांवर ) येथील लढाई इ. स. १८४५.

दुसरी मोठी लढाई फिरोजशहा येथें झाली. हींतही इंग्लिशांस जय मिळाला. या ठिकाणीं शत्रूचें सैन्य परत आलें होतें आणि मजबूत रीतीनें बंदोबस्त करून राहिलें होतें. या सैन्याची संख्या सुमारें चाळीसपासून पन्नास हजार पर्यंत होती. सर ह्यू गो याजबरोबर जरी चौदा हजारच लोक होते, तरी शत्रूच्या मुख्य सैन्यास सतलज नदीच्या कांठीं जी दुसरी एक वीस हजार सैन्याची टोळी होती, ती येऊन मिळण्यापूर्वीं त्यांजबरोबर एकदम लढाई करावी, ही गोष्ट त्यास अवश्य अशी दिसून आली. हिंदुस्थानांत आजपर्यंत ज्या ज्या प्रसिद्ध लढाया

झाल्या त्यांपैकींच ही एक होय. रात्र होण्याच्या सुमारास इंग्लिशांनीं शत्रूच्या तटबंदीचा कांहीं भाग घेतला होता. नंतर भुकेनें व श्रमानें थकून गेल्यामुळें ते रणभूमीवरच मेलेल्या व जखमी झालेल्या लोकांचे बाजूस पडले. दुसरे दिवशीं इंग्लिश लोकांस अतिशय त्वेष आणि धैर्य आल्यामुळें त्यांनीं निकराचा हल्ला करून शीख लोकांना त्यांच्या ठाण्यापासून अगदीं हाकून दिलें. यामुळें त्यांना सतलज नदीपलीकडे जावें लागलें. या लढाईंत जरी त्यांचा फार नाश झाला तरी ते शूर लोक निराश झाले नाहींत. त्यांना पुष्कळ मदत मिळाली आणि त्यांनीं लुधियानावर हल्ला करण्याचें भय घातलें.

आलिवाल (फिरोजशहाचे ईशान्येस सतलजनदीचे कांठीं) येथील लढाई इ.स.१८४६.

सर हारि स्मिथ् याजला लुधियाना येथें पाठविलें. तो लुधियाना येथें जी फौज होती तीस मोठ्या कुशळतेनें जाऊन मिळाला आणि त्यानें अलिवाल येथें शत्रूबरोबर तिसरी रक्तस्रावाची लढाई मारिली. या लढाईंत त्यासच जय मिळाला.

सोब्रान् (फिरोजपूरचे ईशान्येस, सतलजनदीचे कांठीं) येथील लढाई इ. स. १८४६.

इंग्लिश लोकांस मनुष्यें, तोफखाना आणि दारूगोळा यांची मदत येऊन मिळाल्यावर सोब्रान येथें शत्रूच्या एकत्र झालेल्या सैन्याबरोबर चौथी लढाई झाली. तीन तासपर्यंत तोफांच्या भडिमारानें शत्रूच्या तटबंदीवर जेव्हां कांहीं चालेना तेव्हां पायदळ व घोडेस्वार पुढें सरसावले आणि त्यांनीं तें काम शेवटास नेलें. या लढाईंत शीख लोकांचा असा पूर्णपणें पराभव झा-

ला कीं, त्यांजबरोबर पुनः लढाई करण्याचें कांहीं प्रयोजन राहिलें नाहीं.

यानंतर हें विजयी सैन्य लाहोरांत शिरलें. नंतर पंजाबच्या अल्पवयी महाराजाबरोबर तह झाला.

तहाचीं कलमें.

१ लढाईच्या खर्चाबद्दल पैक्याची मोठी रकम इंग्लिशांस द्यावी.

२ बीया आणि सतलज या नद्यांमधील प्रदेश इंग्लिशांस द्यावा.

३ सैन्यास फांटा देऊन तोफखाना इंग्लिशांचे स्वाधीन करावा.

४ काश्मीर व त्याच्या आसपासचे कांहीं प्रांत मिळून एक निराळेंच राज्य करावें; आणि तें गुलाबसिंग या नांवाच्या वजनदार सरदारास या लढाईंत न पडल्याबद्दल व पंजाब सरकाराबरोबर तह करण्याच्या कामीं फार उपयोगी पडल्याबद्दल बक्षीस द्यावें.

५ इंग्लिशांचें दहा हजार सैन्य लाहोर येथें असावें.

या लढाईतील मोठ्या कामगिरीबद्दल व शौर्याबद्दल सर हेनरी हार्डिंज व सर ह्यू गो यांचीं नांवें बड्या लोकांच्या यादींत घातलीं.

सर हेनरी हार्डिंज इंग्लंडास परत जातात इ. स. १८४७.

यानंतर लौकरच सर हेनरी हार्डिंज इंग्लंडास परत गेले, व त्यांचे कामावर लार्ड डालहौसी यांची नेमणूक झाली. परंतु ते नेमणूक झाल्याबरोबर हिंदुस्थानांत आले नाहींत.

मिस्तर बर्ड.

याजकरितां ते येईपर्यंत त्यांचें काम मिस्तर बर्ड यांनीं चालविलें.

## भाग ३२

### लार्ड डालहौसी १८४८–५६.

१ पंजाबाशीं दुसरें युद्ध १८४८–४९

२ ब्रह्मदेशांशीं दुसरें युद्ध १८५१–५२

३ एतद्देशीय निरनिराळीं राज्यें इंग्लिश राज्यास मिळतात.

लार्ड डालहौसी इ. स. १८४८ या वर्षाच्या आरंभीं हिंदुस्थानांत आले, हे हिंदुस्थानांत आल्याबराबर पंजाब येथील दुसरें युद्ध उत्पन्न झालें. लार्ड डालहौसी, तेरावे गव्हरनर जनरल.

**पंजाब येथील दुसरें युद्ध १८४८—४९**

शीख सरकारचे अमलांत राहणारा व मुलतानचा सुभेदार लालामुलराज, ह्यानें लाहोर येथील शीख लोकांबराबर, इंग्लिश लोकांविरुद्ध मसलत चालविली आहे, असें आढळून आल्यावरून इंग्लिश सरकारानें त्यास कामावरून दूर करून त्याच्या जाग्यावर सरदारखान यास नेमिलें. बंगालच्या मुलकी खात्यांतील व्ह्यान्स आग्न्यु व मुंबईचे सैन्यांतील अंडरसन् या नांवाच्या दोन कमिशनरांस इतमामासह नव्या सुभेदारास अधिकार देण्याकरितां पाठविलें होतें; परंतु ते मुलतान येथें येऊन पोंचल्यावर तेथें बंड उत्पन्न झालें. कमिशनरांबराबर जे लोक दिले होते त्यांनीं विश्वासघात केला आणि कमिशनरांस ठार मारिलें. थोड्याच काळांत सर्व पंजाबभर हें बंड पसरलें. लेफ्टेनेंट एड्वर्डस् हा लीया येथें होता. यास आपण मोठ्या संक- युद्धाचीं कारणें. लिया ( सिंधु-

नदीचे कांठीं ).

टावस्थेंत आहों असें आढळून आल्यावरून त्यानें आपल्या हातून जितकें सैन्य जमा करवेल तितकें जमा केलें; भावलपूर येथील राजापाशीं मदत मागितली आणि डेराइस्मायलखान येथील अधिकारी कर्नल काटलंड् यास मिळून, त्यानें सदुसाम येथें लालामुलराज याचा पराभव केला आणि त्याला मुलतानास जाण्याचें अगत्य पाडिलें. याप्रकारें एड्वर्डस् साहेब याच्या कुशलतेनें व चपलतेनें या बंडाची वाढ खुंटली; परंतु तो एकटाच असल्य मुळें त्याच्यानें त्याचा अगदीं मोड करवला नाहीं.

सदुसाम (चिनाब नदीवर) येथील लढाई इ. स. १८४८.

नंतर जनरल उइश् हा एड्वर्डस् यास येऊन मिळाला आणि अठ्ठावीस हजार लोकांनिशीं मुलतानास वेढा घातला. परंतु इंग्लिशांकडचा शीरसिंग या नांवाचा सरदार एकाएकीं फितुर होऊन पांचशें लोकांनिशीं शत्रूस जाऊन मिळाला. यामुळें व उत्तम प्रतीचा तोफखाना नसल्यामुळें त्याला वेढा उठवावा लागला.

मुलतानचा वेढा इ. स. १८४९.

वेढा उठविण्याचें कारण.

जेव्हां लार्ड गो हा पुष्कळ सैन्यानिशीं फिरोजपूर येथून आला, तेव्हां रामनगर येथें शत्रूच्या मोठ्या सैन्याबराबर इंग्लिशांचे घोडेस्वारांनीं लढाई केली. परंतु अविचारानें शत्रूच्या सैन्याचा फार लांबवर पाठलाग केल्यामुळें ते दबा धरून बसलेल्या लोकांच्या हातीं सांपडले आणि पुष्कळ नाश होऊन त्यांस परतावें लागलें.

रामनगर (चिनाब नदीचे कांठीं ) येथील लढाई इ. स. १८४८.

नंतर लार्ड गो यानें चिलियनवाला येथें शत्रूच्या सैन्यावर हल्ला केला. या लढाईंत इंग्लिशां-

चिलियनवा-

चे पुष्कळ लोक पडले आणि ते जरी शत्रूबराबर टिकाव धरून राहिले होते, तरी त्यांच्यानें जय मिळववेना. शत्रूच्या सैन्यानें पळ काढिला असतां त्याचा त्यांनीं पाठलागही केला नाहीं.

ला (जेहेलमनदीचे कांठीं) येथील लढाई इ.स.१८४९.

मदत येऊन मिळाल्यावर जनरल् वुइश यानें मुलतानास पुन्हा वेढा दिला आणि हल्ला करून तें शहर घेतलें. हें शहर इंग्लिशांचे हातीं येतांच लालामुलराज शरण आला. त्याजवर अग्न्यु आणि अंडरसन् यांचा खून केल्याचा गुन्हा शाबीद होऊन त्यास जन्मठेपेची शिक्षा दिली.

मुलतान घेतलें इ. स. १८४९.

लालामुलराज याचा परिणाम.

मुलतानचा मोड झाल्यावर जनरल् वुइश् हा लार्ड गो यास येऊन मिळाला. नंतर त्यानें गुजराथ येथें शीरसिंग याचे सैन्याबराबर लढाई केली. या लढाईंत शत्रूकडे जरी पन्नास हजार सैन्य होतें, तरी इंग्लिशांचें फारसें नुकसान न होतां त्यांचा पूर्णपणें पराभव झाला. दोस्तमहंमद हा शीरसिंग यास मदत करण्याकरितां आला होता, तो या लढाईनंतर आपल्या अफगाण लोकांसह पळून गेला. त्याचा जनरल् गिलबर्ट् यानें कैबर घांटापर्यंत पाठलाग केला. सोळा हजार शीख लोकांनीं आपलीं हत्यारें ठेविलीं. नंतर प्रत्येकास एकेक रुपया देऊन आपापला घोडा घेऊन जाण्याविषयीं परवानगी दिली. नंतर ते सर्व आपआपल्या गांवीं निघून गेले. फक्त शीरसिंग व दुसरे कांहीं सरदार यांस बंदिवान करून ठेविलें.

गुजराथ (लाहोरचे उत्तरेस ६० मेलांवर) येथील लढाई इ. १८४९.

नंतर सर्व पंजाब प्रांत इंग्लिश राज्यास जोडिला आणि तेथील अल्पवयस्क महाराज धुलीपसिंग

पंजाब प्रांत इंग्लिश राज्यास जोडि-

ला इ. स. १८४९. यास पांच लाख रुपयांचें वर्षासन करून दिलें.

## ब्रह्मदेशाशी दुसरें युद्ध १८५१–५२.

युद्धाचें कारण इ. स. १८५१.

रंगून येथील सुभेदारानें दोन इंग्लिश जहाजांवरील अधिकाऱ्यांस अन्यायानें अडथळा केला आणि त्या देशांतील इतर इंग्लिश लोकांविषयीं त्याचें मन प्रतिकूल आहे असें साधारणपणें त्याच्या वर्तणुकीवरून दिसून आलें. जेव्हां ही गोष्ट आवा येथील राजाचे कानावर घातली, तेव्हां त्यानें त्या सुभेदारास कामावरून दूर केलें, परंतु त्याचे बदली ज्या नवीन सुभेदाराची नेमणूक झाली, त्याचीही वर्तणूक पूर्वीच्या सुभेदाराप्रमाणेंच वाईट होती. यासाठीं कमोडर ल्यांबर्ट् यानें रंगून व त्याजवळील दुसरीं शहरें यांस प्रसिद्धपणें वेढा घातला. आवा येथील राजास याबद्दल स्पष्टीकरण विचारिलें असतां, त्यानें कांहीं एक जबाब दिला नाहीं. यास्तव लार्ड डालहौसी यांनीं जनरल् गाड्विन् याजला आरमार व पुष्कळ सैन्यासह तिकडे पाठविलें.

जनरल् गाड्विन् हा लढाईचे स्थळीं येऊन पोंचल्यावर मार्टाबान, रंगून, बेसीन आणि सरते शेवटीं पेगू प्रांताचें मुख्य शहर पेगू, हीं त्यानें एका पाठीमागून एक घेतलीं.

परंतु इंग्लिश लोकांचे सैन्यांत ताप व महामारी हे रोग उद्भवल्यामुळें, त्यांच्या हातून यापुढें कांहीं झालें नाहीं. जेव्हां हे रोग नाहींसे झाले तेव्हां जनरल् गाड्विन् यानें प्रोम शहर घेतलें आणि या प्रकारें सर्व पेगू प्रांत इंग्लिशांचे ताब्यांत आला.

आतां येथील राजास त्याचे भावानें पदच्युत केलें व आपण गादी बळकाविली. यास इंग्लिशांबराबर तह करावा ही गोष्ट बरी वाटली. त्यांजबरोबर खालीं लिहिल्याप्रमाणें तह केला.

१ पेगू येथील इंग्लिशांचे सर्व बंदिवान सोडून द्यावे.

२ पेगू प्रांत इंग्लिशराज्यास जोडावा.

तहाचीं कलमें. इ. स. १८५२.

## लार्ड डलहौसी यांच्या कारकीर्दीचा शेवट.

लार्ड डालहौसी यांच्या कारकीर्दीचीं शेवटचीं दोन वर्षे एतद्देशीय राज्यें इंग्लिश राज्यास जोडण्याविषयीं आणि पुष्कळ प्रकारचे नवीन फेरफार व सुधारणा प्रचारांत आणण्याविषयीं प्रसिद्ध आहेत.

१ निजामाच्या साहायार्थ ठेविलेल्या इंग्लिश सैन्याचा पगार नियमितपणें न पोंचण्याबद्दल हैद्राबादच्या उत्तरेकडील व पश्चिमेकडील निजामाच्या राज्यांतील चार प्रांत इंग्लिश राज्यास जोडिले.

निजामाचे राज्यांतील चार प्रांत इंग्लिश राज्यास जोडिले. इ. स. १८५३.

२ नागपूर येथील राजा मरण पावल्यावर त्याच्या पाठीमागून त्याचें राज्य चालविण्यास कोणी व रस नसल्यामुळें तें राज्य इंग्लिश राज्यास जोडिलें.

नागपूरचें राज्य इंग्लिश राज्यास जोडिलें इ. स. १८५३.

३ झांशीचा राजा गंगाधरराव इ. स. नोवेंबर १८५३ या वर्षीं मरण पावला. तो निपुत्रिक होता, ह्मणून तें राज्य इंग्लिश राज्यास जोडिलें.

झांशीचें राज्य इंग्लिश राज्यास जोडिलें इ. स. १८६४.

४ पाटणाच्या पूर्वेकडील राजमहाल आणि भागलपूर या प्रांतांतील डोंगराळ प्रदेशांत राहाणाऱ्या सांथळ या नांवाच्या जातीच्या लोकांनीं बंडावा केला. तो जनरल् लैड् यानें नाहींसा केला. हे लोक बंगाल्यांतील सावकारांपासून कर्ज काढीत असत.

सांथल लोकांचें बंड. इ. स. १८५५.

ते सावकार त्यांजवर फार जुलूम करीत. त्यांच्या जुलुमास त्रासून ते बंड करण्यास प्रवृत्त झाले असें मानितात. या लोकांतील जे पुढारी होते त्यांनीं आपणांस ईश्वरी प्रेरणा झाली आहे असें लोकांस सांगून त्यांस त्वेषास चढविलें.

अयोध्येचें राज्य इंग्लिश राज्यास जोडिलें इ. स. १८५६.

५ अयोध्येचें राज्य इंग्लिश राज्यास जोडिलें याचें कारण असें झालें कीं, तेथील राजाबराबर इ. स. १८०१ यावर्षी तह झाला आणि त्या दिवसापासून तेथील राज्यकारभार फार वाईट रीतीनें चालला होता. तेथील विषयी आणि उधळ्या नबाब आपल्या राज्याच्या कारभाराकडे अगदीं दुर्लक्ष करीत असे. यासाठीं त्याची स्वतःचीच प्रजा त्याजला कंटाळून त्याजवर बंड करण्याच्या बेतांत होती.

इ. स. १८०१ यावर्षी या नबाबाबराबर झालेल्या तहांत एतद्देशीय व परकीय शत्रूंपासून त्याचें संरक्षण करण्याचें इंग्लिशांनीं कबूल केलें होतें, आणि नबाबानें जेणेंकरून आपल्या प्रजेचें कल्याण होईल अशा प्रकारच्या पद्धतीची राज्यकारभारांत व्यवस्था करण्याचें कबूल केलें होतें, परंतु या करारान्वयें तो चालला नाहीं, यासाठीं त्याचा अधिकार काढून घेतला आणि त्याला मोठी नेमणूक करून दिली.

जनरल् औट्र्याम् ज्याला पुढें सर जेम्स औट्र्याम् असें ह्मणूं लागले त्याला अयोध्या येथील चीफ् कमिशनर नेमिलें.

लोककल्याणाचीं कामें.

६ या गव्हरनर जनरल्च्या कारकीर्दींत लोककल्याणाचीं कामेंही पुष्कळ झालीं. विद्यावृद्धीस

चांगला आश्रय मिळाला. कालवे इत्यादि शेतकीच्या उपयोगाचीं कामें वाढलीं. व्यापारास उत्तेजन मिळालें व मुंबई, मद्रास आणि बंगाल या तीनही इलाख्यांशीं तारायंत्राच्यायोगें दळणवळण सुरू झालें. असें ह्मणतात कीं, हल्लीं हिंदुस्थानांत जे आगगाड्यांचे रस्ते आहेत त्यांतून बहुतेकांची योजना डालहौसी यांनीं स्वतःच केली.

खालीं लिहिलेल्या प्रसिद्ध कालव्यांचीं कामें झालीं.

१ यमुना नदीच्या पश्चिमेकडील व पूर्वेकडील कालवा.

२ गंगा नदीचा कालवा.

सर चार्लस वुड यांचें कंपनीच्या सनदेंत फेरफार करण्याविषयीं बील इ.स.१८५३.

इ०स० १८५३ यावर्षीं सर चार्लस वुड, बोर्ड आफ् कंट्रोल सभेचे अध्यक्ष, यांनीं कंपनीचे सनदेंत कांहीं अदलाबदल करावी, या हेतूनें पार्लमेंट सभेपुढें एक कायद्याचा खर्डा आणिला. तो पास होऊन खालीं लिहिल्याप्रमाणें कंपनीच्या सनदेंत फेरफार झाले.

कंपनीच्या सनदेंतील फेरफार.

१ कंपनीच्या डैरेक्टरांची संख्या आजपर्यंत ३० होती ती १८ झाली.

२. सर्व हिंदुस्थानाकरितां एक कायदे करणारी मंडळी असावी.

३ मुलकी खात्यांतील व वैद्य खात्यांतील जे कामदार नेमावयाचे त्या सर्वांची ठरविलेली परीक्षा उतरलेली असावी.

४ बंगाल इलाख्याचें काम पाहण्यास एक लेफ्टेनेन्ट गव्हरनर नेमावा.

ते सावकार त्यांजवर फार जुलूम करीत. त्यांच्या जुलुमास त्रासून ते बंड करण्यास प्रवृत्त झाले असें मानितात. या लोकांतील जे पुढारी होते त्यांनीं आपणांस ईश्वरी प्रेरणा झाली आहे असें लोकांस सांगून त्यांस त्वेषास चढविलें.

अयोध्येचें राज्य इंग्लिश राज्यास जोडिलें इ. स. १८५६.

५ अयोध्येचें राज्य इंग्लिश राज्यास जोडिलें याचें कारण असें झालें कीं, तेथील राजाबरोबर इ. स. १८०१ यावर्षीं तह झाला आणि त्या दिवसापासून तेथील राज्यकारभार फार वाईट रीतीनें चालला होता. तेथील विषयी आणि उधळ्या नबाब आपल्या राज्याच्या कारभाराकडे अगदीं दुर्लक्ष करीत असे. यासाठीं त्याची स्वतःचीच प्रजा त्याजला कंटाळून त्याजवर बंड करण्याच्या बेतांत होती.

इ. स. १८०१ यावर्षीं या नबाबाबरोबर झालेल्या तहांत एतद्देशीय व परकीय शत्रूंपासून त्याचें संरक्षण करण्याचें इंग्लिशांनीं कबूल केलें होतें, आणि नबाबानें जेणेंकरून आपल्या प्रजेचें कल्याण होईल अशा प्रकारच्या पद्धतीची राज्यकारभारांत व्यवस्था करण्याचें कबूल केलें होतें, परंतु या करारान्वयें तो चालला नाहीं, यासाठीं त्याचा अधिकार काढून घेतला आणि त्याला मोठी नेमणूक करून दिली.

जनरल् औटऱ्याम् ज्याला पुढें सर जेम्स औटऱ्याम् असें ह्मणूं लागले त्याला अयोध्या येथील चीफ् कमिशनर नेमिलें.

लोककल्याणाचीं कामें.

६ या गव्हरनर जनरल्च्या कारकीर्दींत लोककल्याणाचीं कामेंही पुष्कळ झालीं. विद्यावृद्धीस

चांगला आश्रय मिळाला. कालवे इत्यादि शेतकीच्या उपयोगाचीं कामें वाढलीं. व्यापारास उत्तेजन मिळालें व मुंबई, मद्रास आणि बंगाल या तीनही इलाख्यांशीं तारायंत्राच्यायोगें दळणवळण सुरू झालें. असें ह्मणतात कीं, हल्लीं हिंदुस्थानांत जे आगगाड्यांचे रस्ते आहेत त्यांतून बहुतेकांची योजना डालहौसी यांनीं स्वतःच केली.

खालीं लिहिलेल्या प्रसिद्ध कालव्यांचीं कामें झालीं.

१ यमुना नदीच्या पश्चिमेकडील व पूर्वेकडील कालवा.

२ गंगा नदीचा कालवा.

सर चार्लेस वुड यांचें कंपनीच्या सनदेंत फेरफार करण्याविषयीं बील इ.स.१८५३.

इ०स० १८५३ यावर्षी सर चार्लेस वुड, बोर्ड आफ् कंट्रोल सभेचे अध्यक्ष, यांनीं कंपनीचे सनदेंत कांहीं अदलाबदल करावी, या हेतूनें पार्लमेंट सभेपुढें एक कायद्याचा खर्डा आणिला. तो पास होऊन खालीं लिहिल्याप्रमाणें कंपनीच्या सनदेंत फेरफार झाले.

कंपनीच्या सनदेंतील फेरफार.

१ कंपनीच्या डैरेक्टरांची संख्या आजपर्यंत ३० होती ती १८ झाली.

२. सर्व हिंदुस्थानाकरितां एक कायदे करणारी मंडळी असावी.

३ मुलकी खात्यांतील व वैद्य खात्यांतील जे कामदार नेमावयाचे त्या सर्वांची ठरविलेली परीक्षा उतरलेली असावी.

४ बंगाल इलाख्याचें काम पाहण्यास एक लेफ्टेनेन्ट गव्हरनर नेमावा.

इ०स० १८५३ त आगगाड्या व तारायंत्रें सुरू झालीं.

लार्ड डलहौसी इंग्लंडास परत जातात इ. १८५६.

लॉर्ड डालहौसी ज्यांना या वेळेचे सुमारास मार्किस हा किताब मिळाला होता, ते इंग्लंडास परत गेले आणि व्हायकौन्ट क्यानिंग हे इ०स० १८५६ या वर्षाच्या फेब्रुवारी महिन्याच्या २९ तारखेस त्यांच्या कामावर आले.

---

# भाग ३३ वा.

## लार्ड क्यानिंग यांची कारकीर्द.

### १८५६–१८६२.

१ इराण देशाशीं युद्ध १८५६–५७

२ चीन देशाशीं दुसरें युद्ध १८५७.

३ शिपायांचें बंड–१८५७–५८.

लार्ड क्यानिंग, चवदावे गव्हरनर जनरल् व पहिले प्रतिनिधि.

लार्ड डालहौसिनंतर लार्ड क्यानिंग हे गव्हरनर जनरल्चे कामावर आले. हे फार शहाणे असून स्वभावानें उत्कृष्ट होते.

हिंदुस्थानांतील इंग्लिश सैन्य नुकतेंच इराणावर स्वारी करून परत आलें होतें व चीन देशाशीं लढाई सुरू होती, इतक्यांत एतद्देशीय शिपायांनीं एक मोठें बंड उपस्थित केलें.

इराणावरची स्वारी.

इराणावर स्वारी करण्याचें कारण हें होतें कीं, तेथील बादशाहानें इ. स. १८५३ या वर्षीं झालेल्या तहास न जुमानून हिरात शहरावर सैन्य पाठविलें व तें परत बोलावण्यास व पाठविण्याचें योग्य कारण सांगण्यास नाकबूल केलें.

इंग्लिशांचें सहा हजार सैन्य इराणी आखातांत गेलें. बुशायर घेऊन मध्यभागांत सैन्य जाणार तों अशी खबर आली कीं, बादशाहानें इंग्लिशांचें सर्व बोलणें कबूल करून तह केला.

इराणचे बादशाहाबरोबर तह इ. स. १८५७.

चीन देशावर स्वारी करण्याचें कारण हें कीं, इंग्लिशांचे ताब्यांतील एक जहाज चिनई लोकांनीं विनाकारण धरिलें. यामुळें चीन देशावर सैन्य पाठविलें. कंतान शहरावर तोफांचा भडिमार करून तें शहर घेतलें. या समयास हिंदुस्थानांत इंग्लिश शिपाई फार नव्हते व एतद्देशीय शिपायांनीं चांगली संधि साधून बंड केलें. ही वार्ता ऐकून चीन देशाशीं तह करून सैन्य परत आणिलें.

चीनदेशावरील स्वारी इ. १८५७.

१ लार्ड डालहौसी यांचे कारकीर्दींत ज्या कित्येक राजकीय घडामोडी झाल्या त्यांच्या योगानें हिंदुस्थानांतील बरेच लोक नाखुष झाले होते. इंग्लिशांचें अकल्याण चिंतणारांनीं या घडामोडीचा भलताच अर्थ केला तो असाः—ते ह्मणत इंग्लिशांचे मनांत हिंदु व मुसलमानी धर्म समूळ नाहींसे करून खिस्ती धर्म चालू करावा असें आहे.

बंडाचीं कारणें.

हिंदु लोकांस खिस्ती करण्याचा इंग्रजांचा बेत आहे असा शिपायांच्या मनावर ग्रह होतो.

हिंदुस्थानांतील लोकांचा विश्वास भाकितांवर इतर लोकांहून जास्त असतो. पूर्वीं असें भविष्य केलें होतें कीं, इंग्लिशांचें राज्य शंभर वर्षांहून अधिक राहणार नाहीं. इ० स० १७५७ सालीं प्लासी एथें लढाई होऊन इंग्लिशांचें राज्यास आरंभ झाला, असें मानून इ० स० १८५७ या वर्षीं शंभर वर्षें भरतात व भाकिताप्रमाणें इंग्लिश

कित्येक फकीरांनीं राज्याविषयीं केलेलें भाकित.

राज्य संपणार, असा ग्रह होऊन पुष्कळांस हात-पाय हालविण्यास उमेद आली.

बंडाचें मुख्य कारण.

बंड प्रथम उद्भवण्यास अगदीं जवळचें कारण हें होतें कीं, येथील शिपायांस ज्या नवीन तऱ्हेच्या इंग्रजी बंदुका वापरण्यास दिल्या, त्यांचीं काडतुसें गाईचे व डुकराचे चरबीनें सर्वांस बाटविण्याकरितां साफ केलीं आहेत, अशी दाट आवाई होती. ही बातमी सर्व पलटणींतील शिपायांस खरी वाटली. हिंदू लोक गाईस पूज्य देवता मानितात, व मुसलमानांस डुकराची अतिशय खंती आहे. या दोन जनावरांचे चरबीनें साफ केलेलीं काडतुसें दांतांनीं कुरतडण्यापेक्षां दुसरें नीच कर्म इहलोकीं कोणतेंच नसेल, असें वाटून सर्व शिपायानीं एकदम जिवावर उदार होऊन कमरा बांधिल्या.

चरबीनें साफ केलेलीं काडतुसें.

डमडम (कलकत्यापासून सुमारें ८ मैलांवर).

बराकपूर (कलकत्याचे उत्तरेस सुमारें १६ मैलांवर)

मीरत (दिल्लीचे ईशान्येस सुमारें ४० मैलांवर) येथील दंगा इ. १८५७.

बंडाचीं चिन्हें प्रथमतः डमडम येथें दिसूं लागलीं. नंतर बराकपूर येथील एकुणिसावे काळ्या पलटणींत दिसूं लागलीं. इतक्यांत मीरत येथील शिपाई कुरकुरूं लागले; ह्मणून इंग्लिशानीं एका नेटिव् पलटणीचीं सर्व हत्यारें काढून घेऊन शिपायांस कैद केलें. परंतु त्यांचे मित्रांनीं त्यांस सोडविलें नंतर सर्व बंडवाले दिल्लीकडे चालते झाले. त्या ठिकाणीं मोंगल वंशांतील शहाअलम ह्मणून एक ८२ वर्षांचा वृद्ध मनुष्य होता त्यास हिंदुस्थानचा बादशहा असा किताब दिला. बंडवाल्यानीं अवर्णनीय अशीं दुष्ट व अघोर कृत्यें केलीं. इंग्रजाचीं दीन व अनाथ बायकामुलें जीं सांपडलीं तीं त्यांनीं विनाकारण ठार मारिलीं.

बंडवाले दिल्लीकडे जाऊन शहाअलम यास बादशाहा करितात. इ. स. १८५७.

बंडवाल्यांचीं दुष्ट कृत्यें.

या वेळीं सर्व हिंदुस्थानभर थोडी बहुत गडबड होतीच. फक्त सर जान् लारेन्स यांचे कडक अमलामुळें पंजाब प्रांतांत बंडाचीं चिन्हें मुळींच दिसून आलीं नाहींत. या प्रसंगीं शीख लोकांच्या पलटणी इंग्रजांचे फारच उपयोगीं पडल्या.

पंजाब प्रांतातील स्वस्थता.

चहूंकडे गडबड एकदम दिसूं लागल्यामुळें इंग्रजांस काळे शिपायांवर विश्वास ठेवतां येईना. ह्मणून गोरी फौज आणण्याचा क्रम तडाक्यानें सुरू झाला. सिलोन, मारिशस व केप आफ् गुड् होप् या तीन ठिकाणांहून आगबोटी पाठवून फार त्वरेनें फौज आणिली.

गोरी फौज दूर दूरचे ठिकाणाहून येते.

तसेंच लार्ड् एलजिन् यांचे हाताखालीं हांग कांग येथें जाण्यास तयार झालेली सर्व फौज परभारी कलकत्त्यास आणिली. सारांश एकदोन महिन्याचे आंत हिंदुस्थानांत सुमारें ऐशीं हजार गोरी फौज जमा झाली.

हिंदुस्थानांतील जमा झालेली एकंदर गोरी फौज

चोहोंकडून गोरी फौज हिंदुस्थानांत येत होती तोंच जनरल् आन्सन् यानें जमलेल्या फौजेनिशीं दिल्लीवर स्वारी केली. तो वाटेंतच जरीमरीचे आजारानें मरण पावला. त्याचे मागून जनरल् बरमार्डही तसाच मृत्यु पावला. नंतर जनरल् वुइल्सन् यानें फौजेचा अधिकार घेऊन दिल्लीवर चाल केली. आंत अजमासें पंधरा हजार शिपाई होते त्यांनीं बरेच दिवस पर्यंत टिकाव धरला. परंतु शेवटीं इंग्रजानीं तें शहर घेतलें. आंतील शिपाई पळून गेले बादशाहास कैद केलें.

दिल्लीवर हल्ला इ. स. १८५७.

दिल्ली घेतली इ. स. १८५७.

नानासाहेब (दुसरा बाजीराव याचा दत्तकपुत्र) संधि साधून बंडवाल्यांस सामील होतो.

बिटूर (कानपुरापासून ६ मैलांवर).

दुसरे बाजीरावाचा दत्तक मुलगा नानासाहेब हा कानपुराजवळ बिटूर (ब्रह्मावर्त) ह्मणून गांव आहे तेथें रहात असे. इंग्रज सरकार बाजीरावास जें वर्षासन देत असे तें त्याचे मागून आपणास मिळण्याविषयीं त्यानें पुष्कळ खटपट केली, परंतु ती सर्व व्यर्थ गेली. यामुळें इंग्लिश लोकांविषयीं त्याचे मनाचा वाईट ग्रह झाला होता. याला सूड घेण्यास ही संधि चांगली सांपडली. ह्मणून यानें दिल्ली येथें तडफड चालली आहे असें पाहून, सर व्हीलर हा बायका मुलांसहित फक्त दीडशें लोकांनिशीं कानपूरचे छावणींत रहत होता. त्यावर हल्ला केला. अशा प्रसंगीं इंग्रजांस मदत नसल्यामुळें बंडवाले शिपायांबराबर तीन आठवडे पर्यंत त्यांस मोठ्या निकरानें टक्कर मारावी लागली.

कानपरचे छावणीवर हल्ला.

त्यांस कोणीकडूनही मदत मिळेना. त्यांचा वरिष्ठ, जनरल् व्हीलर यास जखम लागल्यामुळें त्या छावणींतील गोरे लोकांस धीर निघेना. यास्तव निरुपाय होऊन त्यांनीं नानासाहेबाच्या सर्व अटी कबूल केल्या व ते त्याचे हातीं आले. नानासाहेबानें त्या इंग्रज शिपायांस अलाहाबादेस सुरक्षित पोहोंचवूं अशी गंगोदकाची शपथ घेतली; परंतु ते सर्व नदीवर गेले नाहींत तोंच दोहों बाजूनें सरबत्ती दिली, आणि सर्व होड्या बुडविल्या. एक राहिली होती तिचा पाठलाग करून तींतील पुरुषांस ठार मारिलें व बायकामुलांस कानपूर येथें कैदेंत ठेविलें.

तेथील गोरे लोकांचें संकट. त्यांच्याशीं तह.

त्यांचा विश्वासघात.

जनरल् ह्याव्हलाक् दोन हजार फौज घेऊन कलकत्त्याहून अलाहाबादेस जाण्यास निघाला. त्यानें वाटेंत फत्तेपूर येथें शत्रूचा पराभव केला; नंतर त्यानें कानपूरचा मार्ग धरिला. परंतु तो कानपूर येथें फार उशीरां आल्यामुळें त्यापासून कांहीं उपयोग झाला नाहीं. आपणास आतां जय मिळत नाहीं असें खास वाटल्यावरून, नानासाहेबानें बायकामुलांस ठार मारण्याचा हुकूम केला आणि आपण शहर सोडून एका रस्त्यानें निघून गेला. इतक्यांत दुसऱ्या रस्त्यानें इंग्लिश आंत शिरले.

ह्याव्हलाक् अलाहाबादेस जातानां फत्तेपर येथें बंडवाल्यांचा पराभव करितो.

कानपरची कतल.

सर हेनरी लॉरेन्स यानें लखनौचे किल्ल्यास आग लाविली व शहराभोंवतीं एक खंदक खणविला. शत्रूंनीं सभोंवार वेढा घातल्यामुळें त्यास व फौजेस ८७ दिवसपर्यंत फार दुःखें सोसावीं लागलीं. लॉरेन्स यास जखम लागून तो लवकरच मरण पावला. त्यानें आपला अधिकार कर्नेल इंग्लिश यास दिला. त्यानें आपलें काम फार हुषारीनें बजाविलें. त्याचे हाताखालील लोकांनीं शत्रूचे हातीं न लागण्याचा पक्का निश्चय केला.

लखनौ शहरास बंडवाले वेढा घालतात इ. स. १८५७.

कानूपूर येथें आलेला सर हेनरी ह्याव्हलाक् हा त्याचे मदतीस आला असता, परंतु पटकीचे आजारानें त्याचे लोक फारच कमी झाले. याकरितां त्यास जास्त कुमक येईपावेतों स्वस्थ बसण्याची अवश्यकता पडली. थोडे दिवसांत सर जेम्स औट्ऱ्याम फौज घेऊन येतांच, तो व ह्याव्हलाक् असे दोघे मिळून लखनौवर चाल करून

औट्ऱ्याम मदत घेऊन येतो.

गेले. मंगळवार आणि अलंबाग या दोन ठिकाणीं बंडवाल्यांची वाताहात इंग्रज फौजेनें करून सोडिली आणि सातवे दिवशीं औटऱ्याम व ह्याव्हलाक् हे आपले बांधवांस लखनौ शहरांत जाऊन मिळाले. या वेळीं इंग्रजांचें सैन्य सारें दोन हजार होतें. बाहेर बंडवाल्यांची संख्या अजमासें ऐशीं हजार होती.

बंडवाल्यांचा पराजय.

अशा स्थितींत इंग्लिशांचें सैन्य असतां इंग्लंडाहून मुद्दाम पाठविलेला नवीन कमांडर इन् चीफ् सर कोलीन् क्यांबेल हा येऊन पोंचला. त्यानें दहा हजार लोक घेऊन लखनौवर आपला मोर्चा फिरविला. क्यांबेल् पोंचल्यामुळें आपल्या लोकांची आपल्यास काळजी करणें नलगे असें समजल्यावर ह्याव्हलाक् यानें प्राण सोडिला. क्यांबेल यानें आजारी, जखमी व बायकामुलें यांस अलाहाबादेस पाठवून देऊन बंडखोरांस चोहोंकडे पिटाळून लाविलें.

इंग्लंडाहून मुद्दाम सर कोलिन् क्यांबेल् येतो.

या बंडांतील प्रमुख पुरुष जरी नानासाहेब हा होता, तथापि यास अनेक शूर लोकांची मदत होती. त्यांपैकीं तात्या टोपे, झांशीची राणी ( लक्ष्मीबाई ) व बांडा येथील नबाब, हे मुख्य होते. तात्या टोपे हा नानासाहेब याचा विश्वासू सरदार व स्नेही होता. नानासाहेब बंडवाले लोकांस मिळाला असें जाणून, तात्या टोपे यानें मोठ्या खटपटीनें व फितुरीनें वीस हजार सैन्य जमा केलें. व इंग्लिशांबराबर अनेक लढाया मारल्या. झांशीची राणी हिच्या नवऱ्यानें घेतलेला

नानासाहेबाचे पुरस्कर्ते.

दत्तक पुत्र सरकारानें नामंजूर केल्यामुळें, आतां या जगांत राहण्यापेक्षां कांहीं तरी अलौकिक कृत्य करून आपलें नांव गाजवावें हें बरें, असें त्या शूर स्त्रियेस वाटल्यामुळें, तिनें इंग्लिशांच्या पलटणी ( १२ वी काळी व १४ वी इरेग्युलर घोडेस्वारांची ) आपल्या पदरचा रामगीर जमादार याचे मार्फत ता० ५ जून रोजीं फितूर करून, झांशीमधील इंग्रज लोकांची कत्तल उडविली व बंडाचा झेंडा उभारिला. ( १८५७ जून ) या राणीस मदत करण्यास सैन्य घेऊन तात्या टोपे येत असतां, इंग्लिश सेनापती सर ह्यूरोज यानें बेटवा नदीवर त्याचा पराभव केला व झांशी सर केली. नंतर लक्ष्मीबाई तात्यास येऊन मिळाली. या उभयतांस बांडा येथील नबावही मिळाला. त्या तिघांची व इंग्लिशांची काल्पी येथें लढाई झाली; त्यांत बंडवाल्यांचा मोड झाला. नंतर बंडवाल्यांनीं ग्वाल्हेरीवर चाल केली व तें शहर घेतलें. ( १८५८ जू. १ ली ) पुढें १७ वे तारखेस लक्ष्मीबाईस पाठीमागून तरवारीचा वार लागून, ती घायाळ होऊन मरण पावली या स्त्रीसारखी दुसरी शूर स्त्री जगाच्या इतिहासांत आढळणें कठीण. बंडवाल्यांचे स्वाधीन ग्वाल्हेर होतांच, जयाजिराव महाराज शिंदे यांस आग्रा येथें जाणें भाग पडलें. पुढें इंग्रजानीं बंडाचा मोड करून पुन्हा शिंदे यांस २१वे दिवशीं गादीवर बसविलें. तात्या टोपे

झांशीमधील इंग्रज लोकांची कत्तल इ.स.१८५७.

काल्पी येथील लढाई इ.स१८५७

लक्ष्मीबाईचा मृत्यू इ.स.१८५८

शिंदे आग्र्यास जातात.

पुष्कळ संपत्ति घेऊन जात असतां वाटेंत इंग्लिशांची व त्यांची चकमक झडली. आतां आपला टिकाव लागत नाहीं, असें त्यास वाटून, सिरोंग जंगलांतून जात असतां, निजल्या ठिकाणीं त्याचा मित्र मानसिंग, यानें धरून त्यास मीड साहेबाच्या स्वाधीन केलें, (१८५९ एप्रिल७.) पुढें

**तात्या टोपे याचा मृत्यू इ. स. १८५९.**

त्याच महिन्याच्या १८ वे तारखेस शिप्री येथें त्यास फांशीं दिलें.

**नानासाहेब नेपाळाकडे जातो इ. स. १८५८.**

याप्रमाणें बंडांचा मोड झाल्यानंतर, आपला टिकाव लागत नाहीं असें नानासाहेबास वाटल्यावरून बाळाराम, बेगम व ममुखान, यांस बरोबर घेऊन त्यानें नेपाळचा रस्ता धरला.

**बंडाचा शेवट.**

बंडवाल्यांपैकीं शेंकडों लोकांस फांशीं दिलें. हजारों लोकांस हद्दपार केलें आणि नंतर देशांत जिकडे तिकडे शांतता झाली.

**बंडाच्या वेळची दाक्षिणेची स्थिति.**

या बंडाची धुमाळी उत्तरहिंदुस्थानांत चालली असतां, दक्षिणेकडेही कोठें कोठें बंडाचा प्रादुर्भाव झाला. परंतु त्याचा मोड त्वरितच झाला.

**सातारा.**

सातारचे कांहीं लोक बंडाच्या खटपटींत आहेत असें सरकारास आढळल्यावरून त्याचा बंदोबस्त केला व उभयतां राजपुत्रांचें त्यांत कांहीं अंग असावें, असा संशय आल्यावरून त्यांस कराची येथें प्रतिबंधांत ठेविलें.

**कोल्हापुर.**

इ० स० १८५७ जुलईत कोल्हापूर येथील २७ वे पलटणींतील कांहीं लोकांनीं दंगा केला; परंतु मेजर केर यानें तो मोडला. या दंग्यांत कोल्हापूरचे धाकटे महाराज

चिमासाहेब यांचें कांहीं अंग असावें, असें वाटल्यावरून त्यांस अन्य ठिकाणीं बंदोबस्तांत ठेविलें.

धार. धारच्या पवार घराण्यांतील यशवंतराव महाराज इ० स० १८५७ जून मध्यें वारले. यांच्या फौजेनें बंड केल्यावरून तें राज्य सरकारानें घेतलें होतें, परंतु कांहीं वर्षांनीं परत दिलें.

जमखंडी. श्रीमंत रामचंद्रराव आपासाहेब जमखंडीकर, यांनीं युद्धाचें सामान तयार केलें व फौज वाढविली, ह्मणून सरकारास संशय आल्यावरून अ० पो० ए० मि० म्यान्‌सन् यानें १८५८ मार्चमध्यें कलादगीहून फौज आणविली. परंतु बंडाची गडबड न दिसल्यामुळें, सैन्य माघारें गेलें. आपासाहेब यांस बेळगांवच्या किल्यांत कांहीं दिवस ठेवून पुढें रेडीच्या किल्यांत ( वेंगुर्ल्याजवळ ) बंदोबस्तांत ठेविलें होतें. परंतु त्यांची प्रतिकूळ दैवगती फिरतांच त्यांचें संस्थान त्यांना प्राप्त झालें. ते हे श्रीमंत रामचंद्रराव आपासाहेब हल्लीं गादीवर आहेत.

नरगुंद. गदग येथें बंड झालें. त्यास नरगुंदकर भास्करराव बाबासाहेब भावे देसाई, हा सामील असावा असा संशय आल्यावरून अ. पो. ए. मि. म्यान्‌सन् हा त्यास उपदेश करण्यास जात असतां नरगुंदापासून आठ कोसांवर सुरेबान् ह्मणून गांव आहे तेथें वस्तीस उतरला. येथें ८०० लोकांसह त्यास नरगुंदकरांनीं ठार मारिलें. ह्मणून सरकारानें दुसरी फौज त्यावर पाठविली व बाबासाहेब

यास मलप्रभेच्या कांठीं धरलें. संस्थान खालसा करून बाबासा० यास बेळगांव येथें फांशीं दिलें.

सुरपुर.

सुरपूरचा राजा व्यंकटआप्पा नाईक बळवंत बिहारी, यानें लढाईचें सामान तयार केल्यावरून, त्याचा बंड करण्याचा उद्देश असावा, असा संशय येऊन सरकारानें त्यावर फौज पाठविली. तेव्हां त्याचा घोटाळा होऊन तो पळत असतां, शिकंदराबाद येथें पकडून त्यास काळयापाण्याची शिक्षा दिली. परंतु पिस्तूल मारून घेऊन त्यानें आत्मघात केला. त्याच्या राणीस सरकारानें २६८०० रुपयांची नेमणूक करून दिली.

इंग्रज सरकार उपकाराची फेड करितें.

या बंडामध्यें ज्यांनीं सरकारास यथाशक्ति एकनिष्ठेनें मदत केली, त्यांची फेड दयाळू इंग्रज सरकारांनीं उदार बुद्धीनें केली.

शिंदे यांस तीन लक्षांचा प्रांत देऊन कारण पडल्यास दत्तक घेण्याची परवानगी दिली. गाइकवाड यांस सालीना तीन लक्ष तीस हजार रुपये कंटिन्जन्ट लष्कराबद्दल द्यावे लागत होते, ते त्यांस सोडिले. होळकर यांस दत्तकाची परवानगी दिली.

मिरजकर श्रीमंत बाळासाहेब यांचें एक निष्ठेचें वर्तन पाहून त्यांस दत्तक घेण्याची परवानगी दिली. पुढें राणी सरकारचें राज्य झाल्यावर सर्व राजेरजवाडे यांस दत्तक घेण्याची मोकळीक झालीच.

बंडाचा परिणाम.

याप्रकारें अठराशें सत्तावन सालच्या बंडापासून दिल्ली येथील मोंगल घराण्याचा समूळ

नाश झाला व पेशवाईविषयीं हक्क सांगण्यास कोणी राहिला नाहीं. यामुळें सर्व हिंदुस्थानचें आधिपत्य कृपाळु इंग्लिश सरकारचे हातीं आलें असें ह्मणतां येईल.

इ० स० १८५८ सालच्या आगष्ट महिन्याच्या दुसऱ्या तारखेस पार्लमेंट सभेंत एक आक्ट पास झाला. त्याच्या योगेंकरून कंपनी सरकारचा अधिकार जाऊन सर्व हिंदुस्थानचें आधिपत्य खुद्द **महाराणीसाहेबांकडे** गेलें.

कंपनीच्या कारकीर्दीचा शेवट. इ. स. १८५८.

या आक्टाअन्वयें **महाराणीसाहेब** यांनीं इ० स० १८५८ या वर्षाच्या नवंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस हिंदुस्थानचा सर्व राज्यकारभार कंपनीकडून काढून खुद्द आपलेकडे घेतला आणि या विषयीं चोहोंकडे सर्व एतद्देशीय राजेरजवाडे व इतर लोक यांच्या माहितीकरितां जाहिरनामे प्रसिद्ध केले.

हिंदुस्थानचा राज्य कारभार महाराणी साहेब आपल्या हातीं घेतात ता. १ नो. इ. स. १८५८.

लार्ड क्यानिंग हे इ. स. १८६२ या वर्षी मार्च महिन्यांत विलायतेस गेले.

---

## भाग ३४.

### लार्ड एल्जिन यांची कारकीर्द.

### १८६२–१८६३.

एल्जिन यांच्या कारकीर्दींत ह्मणण्या सारख्या कांहीं गोष्टी झाल्या नाहींत. हे इ. १८६३ च्या नवंबर महिन्यापर्यंत येथें होते. पुढें धरमसाला येथें मरण पावले.

लार्ड एल्जिन, पंधरावे गव्हरनर जनरल्.

## सर जॉन् लॉरेन्स् यांची कारकीर्द.

### १८६३–१८६९.

सर जॉन् लारेन्स्, सोळावे गव्हर्नर जनरल्.

यांच्या कारकीर्दीत भूतानमध्यें लढाई झाली. मुंबईच्या शेरबाजारांत हजारों व्यापाऱ्यांचीं दिवाळीं निघालीं. इ० स० १८६६ मध्यें ओरीसा प्रांतांत मोठा दुष्काळ पडला. ऑबिसिनीया येथील लोकांनीं कांहीं इंग्रजलोक प्रतिबंधांत ठेविल्यामुळें त्यांवर नेपिअर सैन्यासह जाऊन, त्या लोकांचा राजा थिओडोर याचा इ.स. १८६७ त पराभव करून, त्या राजास विलायतेस नेलें. १८६८–६९ त बुंदेलखंडांत व उत्तर हिंदुस्थानांत पुन्हा दुष्काळ पडला. सर जॉन् लॉरेन्सचें लक्ष लोककल्याणाकडे बरेंच होतें. ह्मणून ज्यावेळीं उपासमारानें लोक अतिशय मरूं लागले, तेव्हां त्यांनीं त्यांचा योग्य बंदोबस्त सरकारी अंमलदारांनीं करावा, असा ठराव केला. तसेंच अयोध्येमधील शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याविषयीं कायदा केला.

ऑबिसिनीयाचें युद्ध.

दुष्काळ.

शेर अली यास अमीर कबूलकरून ग० ज० यांचें इंग्लंडात जाणें व मत्यू.

दोस्त महंमदाच्या मुलुखामध्यें कांहीं दिवस लढाई चालून शेवटीं सर्व अफगाण देश, शेरअली याच्या ताब्यांत दिला व त्यास त्यांनीं अमीर कबूल केला. नंतर हे १८६९ च्या जानेवारी महिन्यांत इंग्लंडास गेले. प्रथम हे माजिस्ट्रेट होते व क्रमाक्रमानें व्हाइसरायाच्या पदवीस चढले. इंग्लंडास गेल्यावर ह्यांस पीअर ही पदवी मिळाली. हे पुढें इ.स. १८७९ मध्यें मरण पावले.

# भाग ३६.

## लॉर्ड मेयो यांची कारकीर्द.

## १८६९–१८७२.

हे इकडेस आल्यावर थोड्याच दिवसांनीं अंबाल्यास मोठा दरबार भरला इ.स. (१८६९)या वेळीं शेरअल्ली अफगाणिस्थानचा अमीर असें मागिल गव्हरनर जनरलांनीं कबूल केलें होतें, त्यास मान्यता दिली. महाराणी साहेबांचे द्वितीय पुत्र ड्यूक आफ् एडिन्बरो हे इ. स.१८६९–१८७०त हिंदुस्थानांत आले.

लॉर्ड मेयो,१७ वे ग. ज.

ड्यूक आफ एडिनबरो यांचें आगमन.

कोल्हापूरचे महाराज बाबासाहेब वारल्यानंतर राजाराम महाराज गादीवर बसले इ. स. (१८६६ )नंतर महाराज इंग्लंडास जाऊन परत येतानां फ्लारेन्स शहरीं त्यांस देवाज्ञा झाली इ. स. १८७१. त्यांच्या मागून चौथे शिवाजी महाराज गादीवर बसले.

राजाराम महाराज यांचे इंग्लंडास जाणें व मृत्यू.

ह्यांच्या अमलांत लोकल्सेल्फ गव्हर्मेन्टची ( स्थानिक स्वराज्याची ) प्रथम सुरुवात झाली. यांनीं मिठावरच्या करामध्यें फेरफार केला. सार्वजनिक उपयोगाचीं कामें ह्मणजे रस्ते, लोखंडी रस्ते, कालवे हीं वाढविलीं. हे फार मेहनती होते. दूरच्या प्रदेशांतील लोकांचें कल्याण कसें होईल, याचा विचार नेहमीं करीत असत. परंतु असे हे उदार पुरुष आन्दमान बेटांत जन्मठेपीच्या कैद्याकडून इ. स. १८७२ त मारिले गेले.

सार्वजनीक उपयोगाचीं कर्त्यें.

## लार्ड नार्थब्रूक यांची कारकीर्द.

### १८७२–१८७६.

लॉर्ड नार्थब्रूक, १८ वे ग० ज०

इ. स. १८७४ सालीं दक्षिण बंगाल्यांत दुष्काळ पडला. परंतु यांनीं सरकारी कामें काढून चांगल्या रीतीनें त्यांतून लोकांचा बचाव केला. इ.स. १८७५ त बडोद्याचे गाइकवाड मल्हारराव, ह्यांनीं रेसिडेन्ट कर्नेल फेअर यास विषप्रयोग केला, या संशयावरून व राज्यांत बेबंदशाई केल्याबद्दल त्यांस पदच्युत केलें आणि नेमणूक ठरवून मद्रासेस इ. स. १८७५ च्या एप्रील महिन्यांत नेऊन ठेविलें व ती गादी त्यांच्याच वंशांतलि मुलगा जमनाबाई साहेब यांस दत्तक देऊन चालविली. वे हे हल्लीं तिसरे सयाजीराव गादीवर आहेत. इ. स. १८७५ सालीं युवराज प्रिन्स आफ् वेल्स यांचें हिंदुस्थानांत आगमन झालें.

मल्हारराव यांस मद्रासेंत ठेवितात.

---

## भाग ३८.

## लार्ड लिटन् यांची कारकीर्द.

### १८७६–१८८०.

लॉर्ड लिटन् १९ वे गव्हरनर जनरल्.

तारीख१ जानेवारी इ.स. १८७७या वर्षी दिल्ली येथें मोठा दरबार होऊन **महाराणी** साहेबांनीं हिंदुस्थानची **चक्रवर्तिनी** असा किताब घेतला. यांनीं एतद्देशीय वर्तमानपत्रकर्त्यांचें स्वातंत्र्य नष्ट केलें इ.स. १८७७मार्च. ह्या वेळेस हिंदुस्थानांत दुष्काळ पडला. ह्यावेळेस सरकारास ११०००००० रुपये खर्च आला तथापि अगदीं उपासमारानें सुमारें साडेबावन लक्ष लोक मेले. असा दुष्काळ पुष्कळ दिवस पडला नव्हता.

इ. स. १८७८–८० पर्यंत अफगाणिस्थानचें युद्ध अफगाणिस्थानचा अमीर शेर अली, यानें इंग्रज सरकारच्या वकीलांचें आगतस्वागत न करितां, रशिअनच्या वकिलांचें केलें. यावरून रशियन लोकांचें व अमिरांचें सख्य आहे असें सिद्ध झालें; ह्मणून त्यांशीं युद्ध सुरू झालें. परंतु इंग्रजांचें सैन्य तेथें जातांच शेर अलि तुर्कस्थानांत पळून गेला, व तिकडेच मरण पावला. पुढें त्याचा मुलगा याकुबखान याच्याशीं इ. स. १८७९ च्या मे महिन्यांत तह केला व त्यांचा वकील सर लुई क्याबिन्नारा क़ाबुलमध्यें राहिला, परंतु थोड्याच दिवसांनीं, ह्मणजे सप्टेंबर महिन्यांत, यास त्याच्या बरोबरच्या लोकांसह याकूबखानानें ठार मारिलें इ. स. १८७९. यामुळें दुसरी लढाई करणें प्राप्त झालें. या लढाईंत याकुबखानास कैद करून हिंदुस्थानांत आणिलें व काबुल व कंदहार येथें सैन्य ठेवून अफगाण लोकांचें बंड फ्रेड्रिक् राबर्टस् यानें समूळ मोडून टाकिलें. इ. १८७९–८० लायसेन्स टॅक्सची सुरुवात. इ. स. १८७९ पुणेंप्रांतांत वासुदेव बळवंत फडके याचा दंगा. त्यास क्याप्टन डॅनियल यानें पकडून एडन् मध्यें ठेविलें. तेथें तो मरण पावला. इंग्लंडमध्यें पार्लमेंटांतील सभासदांची निवडणुक होऊन कान्सरव्हेटिव्ह पक्षाचें महत्व कमी झालें. ह्मणून लॉर्ड लिटन् यांनीं राजीनामा दिला.

अफगाणिस्थानचें युद्ध.

वा. ब. फडके याचा दंगा व मृत्यु. इ. १८७९.

## मारक्कीस आफ् रिपन् यांची कारकीर्द.
## १८८०–१८८४.

मार्किस आफ् रिपन, २० वे गव्हरनर जनरल्.

यांच्या कारकीर्दींत महत्वाच्या पुष्कळ गोष्टी घडल्या. त्यांत अफगाण लढाईची समाप्ति, एतद्देशीय वर्तमानपत्रांस विचार स्वातंत्र्यांची हक्कप्राप्ति, एजुकेशन् कमिशन्ची स्थापना, स्थानिक स्वराज्याचा प्रसार व इलबर्ट बिलाची धामधूम, ह्या पांच मुख्य होत.

महत्वाच्या गोष्टी.

१ अयुबखानाच्या हिरात येथील फौजेनें इंग्लिशांचा कंदाहार जवळ मायवान्ड येथें पराभव केला; परंतु जनरल् राबर्टस् ह्यानें त्याचा पुरा मोड करून दोस्त महंमदाच्या वंशांतील अबदुलरहिमान ह्यास अमीर केलें. व त्याच्या ताब्यांत काबूल देऊन इंग्लिश सैन्य परत आलें. इजिप्त देशांत आरबीपाशानें इंग्लिशांविरुद्ध वागून त्यांवर शस्त्र धरिलें ह्मणून अलेक्झांड्रियावर ॲड्मिरल सिमोर यानें तोफांचा भडिमार करून तें शहर जमीनदोस्त केलें व आरबीस पकडलें.या लढाईंत हिंदुस्थानांतील पलटणीनें आपलें काम शूरत्वानें बजाविलें(इ.१८८२).

व्हर्न्याक्यूलर प्रेस आक्ट रद्द.

२ एतद्देशीय वर्तमानपत्रांस आपले विचार उघडपणें प्रसिद्ध करण्याची मुभा मिळाली. पूर्वींचे गव्हरनर जनरलानीं हें वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य व्हर्न्याक्यूलर प्रेस आक्टानें नष्ट केलें होतें.

एज्युकेशन् कमिशन्.

३ विद्याखात्यांत सुधारणा करण्याच्या हेतूनें एजुकेशन् कमिशन् बसवून कोणत्या प्रकारें एतद्देशीयांस किती शिक्षण मिळावें याबद्दल चर्चा झाली. या चर्चेचा परिणाम अजून पुढें आला नाहीं.

४ स्थानिक स्वराज्याचा (लोकल् सेल्फ् गव्हर्मेन्टचा) हक्क एतद्देशीयांस मिळावा असें ठरविलें.

लोकल् सेल्फ् गव्हर्मेन्ट.

५ जातिभेदामुळें न्यायदानांत जें अंतर पडतें तें काढून टाकावें यासाठीं इल्बर्ट बिल् पुढें आलें; परंतु ऍंग्लोइंडियनांनीं त्यावर गिल्ला करून त्याचा उद्देश पूर्णपणें शेवटास जाऊं दिला नाहीं. वादविवादाअंतीं नेटिव्ह लोक मोठ्या हुद्यास पात्र आहेत असें ठरलें. इंग्लिश लोकांस जुरीचा ( पंचायतीचा ) हक्क मिळाला. तो हक्क नेटिवांसही असावा ह्याबद्दल खटपटी सुरू आहेत. यांनीं स्वदेशीय मालाचा उपयोग सरकारी खात्यांतून करावा असें ठरविलें.

इलबर्ट बिल.

यांच्या कारकीर्दींत म्हैसूर, बडोदें व हैद्राबाद येथील राजांस पूर्णपणें राज्याधिकार मिळाला. म्हैसूरचे राजेसाहेब यांस इ.स.१८८१मार्च ता.२५ रोजीं राज्याधिकार मिळाला. यांचे दिवाण मि. रंगाचार्लू हे होते. पुढें ते इ. स. १८८३जा. मध्यें वारले. बडोद्याचे तिसरे सयाजी महाराज यांस मोठ्या समारंभानें इ.स.१८८१ दि. ता. २४रोजीं राज्याधिकार देऊन राजे सर टी. माधवराव यांचे सल्लयानें काम चालवावें असें ठरलें. मल्हारराव गाईकवाड यांस इ.स.१८८२ जुलई ता. २६ रोजीं मद्रास येथें देवाज्ञा झाली. हैद्राबादचे दुसरे निजाम उल्मूलुख यांस इ. स. १८८४ फे. ता. ६ रोजीं मोठ्या समारंभानें राज्याधिकार दिला व माजी सर सालरजंग यांचे चिरंजीव छोटे सर सालरजंग यांस दिवाण नेमिलें. या समारंभास मार्किस आफ् रिपन् यांचें आगमन झालें होतें.

राजेरजवाड्यांस पूर्णाधिकार मिळतो.

माजी सर सालरजंग यांचा मृत्यु इ.स.१८८३ फे.८

कोल्हापूरचे महाराज ह्यांचा मृत्यु.

कोल्हापूरचे महाराज चौथे **शिवाजी** यांस वेड लागल्यामुळें त्यांस महाबळेश्वर, पुणें वगैरे ठिकाणीं ठेवून तेथून १८ जू.इ.स.१८८२त अहमदनगरास नेलें. तेथें असतां ता. २५ दि. १८८३ मध्यें ते परलोकवासी झाले. या राज्याची नवीन व्यवस्था झाली,त्यांत श्रीमंत जयसिंगराव आबा साहेब घाटगे कागलकर यांस इ. स. १८८२ मा. १६ रोजीं रीजंट नेमिलें. **शिवाजी** महाराज मरण पावल्यामुळें त्यांच्या गादीवर श्रीमंत घाटगे यांचे चिरंजीव यशवंतराव यांस शाहू महाराज हें नांव देऊन इ.स.१८८४मार्च ता. १७ रोजीं गादीवर बसविलें.

तिसरे राजपुत्र यांचें आगमन.

चक्रवर्तिनी व्हिक्टोरिया राणी साहेब यांचे तिसरे पुत्र ड्यूक ऑफ् कॅनाट हे ता. २८ नवं. १८८३ रोजीं लष्करी खात्यांत एका महत्वाच्या हुद्यावर हिंदुस्थानांत आले.

## लार्ड डफरिन यांची कारकीर्द १८८४-१८८८.

लार्ड डफरिन, एकविसावे गव्हरनर जनरल.

लार्ड रिपन आपलें काम सोडून इंग्लंडास परत जाण्याच्या सुमारास रशियन लोकांचें मध्य एशियांत दिवसें दिवस पाऊल पुढें येतां येतां अगदीं अफगाणिस्थानचे सरहद्दीपर्यंत त्यांची मजल येऊन ठेपली होती. पुढें पाठीमागें ते अफगाणिस्थान आपले हाताखालीं घालतील व त्यापासून हिंदुस्थानचे शांततेस खचीत धक्का बसेल अशी भीति होती. अशा गडबडीचे वेळीं हिंदुस्थानचे राज्यकारभाराचीं सूत्रें योग्य व माहितगार मुत्सद्याचे

च हातीं असणें फार आवश्यक होतें. अशा प्रकारचे मुत्सद्दी लार्ड डफरिन हेच यावेळीं मिळण्यासारखे होते, कारण हे रशियाचे बादशाहाचे दरबारांत इंग्लंड देशाचे राजाचेवतीनें फार दिवस वकील होते, यामुळें त्यांस त्या दरबारांतील राजकारस्थानाची चांगली माहिती होती व ते दूरदर्शी व हुशार मुत्सद्दी असल्यामुळें अशा प्रसंगीं यांची नेमणुक केली असतां फार उत्तम होईल असें इंग्लंडांतील प्रधानमंडळास वाटून यांची नेमणूक केली गेली.

लार्ड डफरिन यांसच ह्या वेळीं हिंदुस्थानाचे गव्हर्नर जनरलचे कामावर नेमण्याचें कारण.

अफगाणिस्थानचे हल्लींचे अमीर अबदुलरहिमान यांजबरोबर कांहीं महत्वाच्या राजकीय गोष्टींचा विचार करण्याकरितां रावळपिंडी येथें इ. स. १८८५ चे फेब्रुआरी महिन्यांत गव्हरनर जनरल यांनीं मोठें दरबार भरविलें. त्या प्रसंगीं आपण इंग्लिश लोकांचा पक्ष कधीं सोडणार नाहीं व जें इंग्लिश सरकारचें हित तेंच आपलें हित असें त्यांनीं भरदरबारांत बोलून दाखविलें. याप्रसंगीं रावळपिंडी येथें पुष्कळ सैन्य जमवून अमीरास कवाईत दाखवून इंग्लिशांनीं आपले सैन्याची तयारी दाखविली आणि अमीरास पुष्कळ नजरनजराणे देऊन व खूष करून परत पाठविलें.

रावळपिंडी येथील दरबार इ. स. १८८५.

दरबारचे प्रसंगीं इंग्लिश सरकाराविषयीं अमीरानें आपले प्रदर्शित केलेले अभिप्राय.

अमीराची स्वदेशीं परत रवानगी.

याचे सुमारास इंग्लिशसरकारचे मार्फत अफगाणिस्थान आणि रशिया या दोन राष्ट्रांची सरहद्द ठरविली. यामुळें रशियन लोकांबरोबर तंटा बखेडा होऊन लढाईचा प्रसंग टळल्या सारखा झाला.

इंग्लिश सरकारचे मार्फत अफगाणिस्थान आणि रशियाचें राज्य यांजमधील सरहद्दीचा ठराव होतो.

## ब्रह्मदेशाशीं शेवटचें युद्ध १८८५–८६.

ब्रह्मदेशाचा थीबा राजा इंग्लिश लोकांचीं "बांबे

या युद्धाचें मु-

ख्य कारण.

बरमा ट्रेडींग कंपनी " या नांवाचे व्यापारी मंडळीस फार त्रास देऊं लागला व त्या मंडळीशीं फार अन्यायाचें व जुलमाचें वर्तन करूं लागला. हा प्रकार बंद करून त्या व्यापारी मंडळीशीं गोडीगुलाबीनें वागण्याविषयीं लार्डडफरिन यांनीं थीबा राजास पुष्कळ प्रकारें सांगून पाहिलें, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. यास्तव युद्धावांचून दुसरा कांहीं उपाय राहिला नाहीं.

या युद्धाचें उपकारण.

याशिवाय पूर्व द्वीपकल्पांत फ्रेंच लोकांचें प्राबल्य दिवसोंदिवस फार वाढत चाललें होतें, यामुळें त्या प्रदेशांतील इंग्लिश लोकांचे व्यापारास धक्का बसण्याचा फार संभव होता. कदाचित् ब्रह्मदेशांतही फ्रेंच लोकांचें प्राबल्य होऊन त्यांच्याशीं लढाई होण्याचा प्रसंग येईल तो टाळण्याकरितां त्या देशाची आपणास अनुकूल अशी व्यवस्था करण्याचें इंग्लिशसरकारास अगत्य पडलें.

इंग्लिश लोकांचें सैन्य ब्रह्म देशाचे राजधानीवर चाल करितें इ. स. १८८५.

थीबा राजा इंग्लिशांचे स्वाधीन होतो.

या युद्धांत इंग्लिशांकडचा मुख्य सरदार जनरल प्रेंडरगाष्ट हा होता. युद्धास आरंभ होतांच इंग्लिश लोकांचे सैन्यानें एकदम ब्रह्मदेशाची राजधानी मंडालें याजवर चाल केली, तेव्हां थीबा राजा घाबरला आणि लढाई करण्याची कांहीं एक खटपट न करितां निमुटपणें इंग्लिशांचे स्वाधीन झाला. इंग्लिश लोकांचे स्वाधीन होण्यापूर्वीं थीबा राजास इंग्लिशांकडील मुख्य सरदारानें आपणास कोणत्याही प्रकारचें वचन देण्याचा अधिकार नाहीं असें स्पष्टपणें कळविलें. तें थीबा राजानें मान्य केलें. त्याला

ब्रह्म देशांतून काढून रत्नागिरीस आणून ठेविलें व संपूर्ण ब्रह्मदेश इंग्लिश राज्यास इ. स. १८८६ या वर्षी जोडिला.

थीबा राजास रत्नागिरीस आणून ठेवितात व संपूर्ण ब्रह्मदेश इंग्लिश राज्यास जोडितात. इ.स.१८८६

या युद्धास झालेला खर्च भागविण्याकरितां प्राप्तीवर जबर कर बसविला आणि मिठावरची जकात वाढविली.

पुढें पाठीमागें हिंदुस्थानांत शिरकाव होण्याकरितां जर रशियाचा बादशाहा गडबड करूं लागला, तर त्याचें कांहीं चालूं नये ह्मणून वायव्येकडील सरहद्दीचे बंदोबस्ताची योग्य व्यवस्था डफरिन साहेबांनीं केली. या व्यवस्थेस सैन्य व खर्च फार लागेल व तो एकट्या इंग्लिश सरकारास फार जड जाईल, याकरितां या उपयुक्त कामास आपणापासूनही पैशाची, सैन्याची व प्रसंग पडल्यास स्वतःची मदत स्वीकारावी अशी आपली स्वराज्यनिष्ठता दाखविण्याकरितां निजाम सरकारानें हिंदुस्थान सरकारास विनंति केली. याचा कित्ता इतर बहुतेक एतद्देशीय संस्थानिकांनीं वळविला. या एतद्देशिय संस्थानिकांनीं आपखुषीनें दिलेल्या सैन्याचा वायव्येकडील सरहद्दीचा बंदोबस्त करण्याचे कामीं कोणत्या प्रकारें उपयोग करितां येईल याचा विचार सुरू आहे.

वायव्येकडील सरहद्दीचा बंदोबस्त.

या व्यवस्थेस आपलें सैन्य व पैसा देण्याविषईं निजाम सरकारची विनंती.

एतद्देशीय स्त्रिया फार मर्यादशील व विनयसंपन्न असल्यामुळें आपल्यास झालेल्या रोगाची संपूर्ण माहिती पुरुषांस सांगण्यास फार संकोच करितात, यामुळें रोगाची चिकित्सा बराबर न होऊन योग्य औषधोपचार होत नाहीं.

याचे वारंवार भयंकर परिणाम घडून येतात. अशा प्रकारचे वारंवार घडणारे भयंकर परिणाम जर औषधोपचार करणाऱ्या स्त्रिया असतील तर टाळितां येतील, असें लार्ड डफरिन यांचे पत्नीस वाटलें. या परोपकाराचे कामास आरंभ करण्याचें त्यांनीं आपले मनांत आणिलें. या कामास पैशाची मोठी रकम जमविण्याची त्यांनीं मोठी खटपट केली. या रकमेस "लेडी डफरिन फंड" असें नांव दिलें आहे. या फंडास एतद्देशीय सर्व राजेरजवाड्यांनीं मनःपूर्वक पैशाची मदत केली. या पैशाचा विनियोग स्त्रियांना हल्लीं ज्याप्रमाणें वैद्यकी पाठशाळांतून पुरुषांनां वैद्यशास्त्राचें शिक्षण दिलें जातें तशा प्रकारचें शिक्षण स्त्रियांस देऊन त्यांचा उपयोग एतद्देशीय स्त्रियांचे रोगांची चिकित्सा करून त्यांस योग्य औषधोपचार करण्याचे कामीं करण्याचें ठरलें आहे. या लोकोपयोगी कृत्यानें या बाईचें नांव या देशांत चिरकाल राहील.

लेडि डफरिन फंड.

राष्ट्रीय सभा (न्याशनल कांग्रेस) इ. स. १८८५

इ. स. १८८५ या वर्षी राष्ट्रीय सभे (न्याशनल कांग्रेस) ची स्थापना झाली. या सभेस निरनिराळ्या इलाख्यांतून मुकत्यार दर वर्षी सभा भरविण्याचे ठरविलेले स्थळीं येतात. या सभेचा उद्देश, जे कायदेशीर रीतीनें सरकारापाशीं मागतां येतील व जे सरकारानें मोठ्या संतोषानें देण्यासारखे आहेत ते हक्क सरकारापाशीं विनयपूर्वक मागून आपल्या देशाचें व देशबांधवांचें कल्याण करून घेणें हा आहे. आज मिती-

पर्यंत मुंबई, कलकत्ता, मद्रास आणि अलाहाबाद या निरनिराळ्या ठिकाणीं अनुक्रमें प्रतिवर्षी सभा भरल्या.

लार्ड डफरिन साहेबांचें स्वदेशीं परत जाणे इ.स. १८८८.

लार्ड डफरिन साहेबांचे कुटुंबास या देशाची हवा मानवत नसल्यामुळें त्यांस आपले कामाची मुदत भरण्यापूर्वींच इ. स. १८८८ चे अखेरीस इंग्लडास परत जाणें भाग पडलें.

लार्ड ल्यांड्सडाऊन, बाविसावे गव्हरनर जनरल इ. स. १८८८.

लार्ड डफरिन यांचे मागून लार्ड ल्यांड्सडाऊन यांची हिंदुस्थानचे गव्हरनर जनरलचे जागीं नेमणूक झाली व ते हल्लीं कामावर आहेत.

## गव्हरनर जनरल् यांची याद. १७७४–१८८९.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | वारन् हेस्टिंग्झ. | १७७४-फे. ८५ | |
| | मिस्तर म्याक्फर्सन्. | १७८५ | आक्टिंग. |
| २ | लॉर्ड कॉर्नवालिस. | १७८६–९३ | |
| ३ | सर जान् शोअर (लॉर्ड टेनमौथ) | १७९३–९८ | |
| ४ | मार्क्विस् आफ् वेल्स्ली (लॉर्ड मार्निंगटन्. ) | १७९८–आग.१८०५ | |
| | लॉर्ड कॉर्नवालिस्. ( पुन:) | १८०५अक्टो. ५ | |
| ५ | सर जॉर्ज वार्लो. | १८०५–७ | |
| ६ | लॉर्ड मिंटो. | १८०७–१३ | |
| ७ | मार्क्विस् ऑफ् हेस्तिंग्झ. ( आर्ल आफ् मोहरा. ) | १८१४–२३ | |
| ८ | लॉर्ड आमहर्स्ट. | १८२३–२८ | |
| ९ | लॉर्ड वुइलियम् बेंटिक. | १८२८–३५ | |
| | सर चार्लस मेटकाफ्. | १८३६ | आक्टिंग. |
| १० | लॉर्ड ऑक्लंड. | मा. १८३६–४२ | |
| ११ | लॉर्ड एलेनबरो. | १८४२–४४ | |
| १२ | सर हेनरी हार्डिंज, | १८४४–४८ | |
| | मिस्तर बर्ड. | १८४८–१८४८ | आक्टिंग. |
| १३ | मार्किस आफ् डलहौसी. | १८४८–५६ | |
| १४ | व्हायकौंटक्यानिंग ( १ ले प्रतिनिधी. ) | फे.२९ १८५६–६२ | |
| १५ | लॉर्ड एल्जिन्. | १८६२–६३ | |
| १६ | सर जॉन् लारेन्स. | १८६३–६९ | |
| १७ | लार्ड मेयो, | १८६९–७२ | |
| १८ | लॉर्ड लिटन्. | १८७२–७६ | |
| १९ | लॉर्ड नार्थब्रूक. | १८७६–८० | |
| २० | लॉर्ड रिपन्. | १८८०–८४ | |
| २१ | लार्ड डफरिन. | १८८४–८८ | |
| २२ | लार्ड ल्यांडसडाउन. | १८८८ | |

ग्रं. क्र. १६२७२
ग्रंथ शाखा
REFBK-0016272